
# पुनर्जन्म
# हृदय



स्वामी श्री अड़गड़ानन्द जी महाराज

।। ॐ श्री सद्गुरुदेवाय नमः ।।

# पुनर्जन्म
# हृदय

लेखकः

**परमपुज्य श्री परमहंस महाराजांचा कृपाप्रसाद**
**स्वामी श्री अड़गड़ानन्दजी**
श्री परमहंस आश्रम,
ग्राम व पोस्ट शक्तेषगढ़, चुनार-मिर्जापुर (उ.प्र.), भारत,
फोन : (05443) 238040

प्रकाशक :

**श्री परमहंस स्वामी अड़गड़ानन्दजी आश्रम ट्रस्ट**
न्यू अपोलो ईस्टेट, गाळा नं. ५, मोगरा लेन,(रेलवे सब-वे च्या जवळ), अंधेरी पूर्व,
मुम्बई - ४०००६९ भारत

ॐ

अनन्तश्री विभूषित,

योगिराज, युगपितामह

परमपूज्य स्वामी श्री परमानन्दजी

श्री परमहंस आश्रम अनुसुइया

(चित्रकूट)

यांच्या परम पावन चरणी


सादर समर्पित

अन्तस्प्रेरणा

# गुरु-वन्दना

**।। ॐ श्री सद्गुरुदेव भगवान की जय।।**

जय सद्गुरुदेवं, परमानन्दं, अमर शरीरं अविकारी।
निर्गुण निर्मूलं, धरि स्थूलं, काटन शूलं भवभारी।।
सूरत निज सोहं, कलिमल खोहं, जनमन मोहन छविभारी।
अमरापुर वासी, सब सुखराशि, सदा एकरस निर्विकारी।।
अनुभव गम्भीरा, मति के धीरा, अलख फकीरा अवतारी।
योगी अद्वेष्टा, त्रिकाल द्रष्टा, केवल पद आनन्दकारी।।
चित्रकूटहिं आयो, अद्वैत लखायो, अनुसुइया आसन मारी।
श्री परमहंस स्वामी, अन्तर्यामी, हैं बड़नामी संसारी।।
हंसन हितकारी, जग पगुधारी, गर्व प्रहारी उपकारी।
सत्-पंथ चलायो, भरम मिटायो, रूप लखायो करतारी।।
यह शिष्य है तेरो, करत निहोरो, मोपर हेरो प्रणधारी।
जय सद्गुरु...............भारी।।




श्री श्री १००८ श्री स्वामी परमानन्दजी महाराज ( परमहंसजी )

जन्मः शुभ सम्वत् विक्रम १९६९ ( १९११ ई. )

महाप्रयाण ज्येष्ठ शुक्ल ७, २०२६, दिनांक २३/०५/१९६९ ई.

परमहंस आश्रम अनुसुइया, चित्रकूट



श्री स्वामी अड़गड़ानन्द जी महाराज

# पुनर्जन्म

*१७ ऑक्टोबर २००९ रोजी दिवाळीला संध्याकाळच्या सभेत परमपूज्य महाराजश्रींनी 'मृत्युनंतर जीवात्मा पुनर्जन्म घेतो का?' ह्या भक्तांच्या प्रश्नावर केलेले प्रवचन.*

जन्म-मृत्यू संबंधित मनुष्याला वाटणारी जिज्ञासा स्वाभाविक आहे. लोकांना कुतूहल असते की मृत्यूच्या पश्चात् पंचभौतिक स्थूल शरीराबरोबर, जन्मभर क्रियाशील असलेल्या जीवात्म्याचाही अंत होतो का? जर मृत्यूच्या पश्चात् जीवात्म्याचे अस्तित्व असते तर आयुष्यभर त्याच्या द्वारे केल्या गेलेल्या कर्मांचे समीक्षण केले जाते का? हे समीक्षण तत्काल केले जाते की, मृत्यूनंतर काही दिवसांनी, वर्षांनी अथवा युगांनी एखाद्या ठराविक तिथीला केले जाते? केलेल्या कर्माचे फळ अनंतकाळापर्यंत सुखमय वा दु:खमय जीवनाच्या रुपात मिळते का, पशु-पक्षी, कीटक, वनस्पती इत्यादि योनींमधून जीवात्मा येरझारा घालत राहतो? ह्या पृथ्वीवर जन्म घेऊनच हे फळ भोगावे लागते का इतर ग्रहांवर, दृश्य-अदृश्य लोकीही हे प्राप्त होते? कर्मानुसार जीवात्मा पुरुष, स्त्री वा नपुंसक देह धारण करू शकतो का? जन्म-मृत्यूचे हे चक्र चालतच राहते का त्याचा कधी शेवट होऊ शकतो? हा शेवट आपोआप होतो का निर्धारीत विधीने होतो? मनुष्य स्वत:च्या भविष्यातील पुनर्जन्मास नियंत्रित करू शकतो का? इत्यादि.

विश्वातील तर्कतीर्थांनी ह्या संदर्भात तीन तर्क मांडले आहेत.

पहिला तर्क - देहापासून भिन्न असलेल्या आत्म्याच्या अमरत्वावर व कर्मवादावर विश्वास न ठेवणाऱ्यांना वाटते की देहाबरोबर सर्वकाही नष्ट होते - **'भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमन कुत:?'** भस्म झालेल्या शरीराचे पुनरागमन होते का? परंतु जे लोक आयुष्यभर सदाचाराने वागतात, ते त्यांचे

सत्कर्म, फळ न देता लुप्त होईल का? म्हणूनच फार थोडे लोक देहाबरोबर सर्वकाही नष्ट होते ह्या मताचे आहेत.

दुसरा तर्क - अनंतकाळापर्यंत सुख-दु:ख भोगावयास लागणे-हा विचारही सुसंबद्ध वाटत नाही कारण आयुष्य तर मर्यादित असते. त्या मर्यादित अवधीमध्ये केल्या गेलेल्या सत्कर्माचे वा दुष्कर्माचे फळ म्हणून अनंतकाळापर्यंत स्वर्गात अथवा नरकात वास्तव्य करावयास लागणे हे तर्कसंगत वाटत नाही. जो जीव गर्भाशयात असतानाच अथवा शिशु अवस्थेतच मरण पावतो त्यास कोणत्या कर्माच्या आधारे स्वर्ग वा नरक मिळेल? जन्मापासूनच काही अपंग, मंदबुद्धीचे का असतात? कोणी श्रीमंत तर कोणी गरीब, कोणी सदाचारी तर कोणी दुराचारी अशा कुटुंबांमध्ये जन्म का घेतात? परमेश्वर तर पक्षपात करणे शक्य नाही! काहीजण म्हणतात की तो परीक्षा घेण्यासाठी एखाद्याला संकटात टाकतो व पहातो की त्या विषम परिस्थितीतही त्याची ईश्वरावर किती निष्ठा आहे? परंतु परीक्षा तर पाठ्यक्रम निर्धारीत केल्यानंतर काही नियमांनुसार घेतली जाते. येथे अभ्यास करावयास अवसरच मिळाला नाही तर परीक्षा कसली? ज्या जीवाने अजून आयुष्यच भोगले नाही, त्या जीवाची परीक्षा कसली?

तिसरा तर्क - जवळ-जवळ सर्व भारतीय दर्शन-शास्त्रे-सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, मीमांसा व वेदांत तसेच जैन, बौद्ध इत्यादि कर्म व कर्मानुसार पुनर्जन्म ह्या तिसऱ्या तर्काचा स्वीकार करतात, ज्यानुसार ह्या जन्मी केले गेलेले कर्म व आचरण माणसाचा पुढील जन्म निर्माण करते आणि वर्तमानातील जन्म हा त्या मनुष्याने आधीच्या जन्मांमध्ये केलेल्या आचरणाचे फळ असतो.

पुनर्जन्म तसेच पूर्वजन्म ह्या संदर्भात पूज्य गुरुदेव त्यांची जन्मभूमि रामकोला (आत्ताचे जनपद पडरौना, उत्तर प्रदेश) ह्या गावातील एक घटना सांगत असत. त्या गावात नत्थू खाँ नावाचा एक खाटीक राहत असे. बकऱ्यांना मारून त्यांचे मांस तो विकत असे. आजारपणामुळे एक दिवस तो

अंथरुणात अगदी मरणोन्मुख अवस्थेत पडलेला होता. सगळ्यांना वाटले की नत्थू खाँ मेला. त्यामुळे त्याच्या जवळच्या नातेवाईकांना बोलावण्यात आले. तेथे जमलेल्या लोकांना त्याच्या हाताच्या एका बोटामध्ये कंपन जाणवत होते. लोकांना संशय आला की हा खरच मेला आहे का नाही? थोड्या वेळाने नत्थू खाँ उठून बसला व म्हणाला - कोणीतरी जाऊन माहिती काढा की आपल्या गावातला नत्थू हरिजन मरण पावला आहे का? त्याबाजूनेच येणाऱ्या काही लोकांनी बातमी आणली की आत्ताच नत्थू चांभार (हरीजन) मरण पावला व घरचे सर्वजण शोकाकूल आहेत.

लोकांनी नत्थू खाँ ह्यास विचारले की नत्थू चांभाराबद्दल त्याने कसे काय विचारले? तेव्हा नत्थू खाँ म्हणाला की अंथरुणावर पडलेला असताना त्याच्या आजूबाजूला काळोखी येऊ लागली. काही क्रूर आकृत्या त्याला कोठेतरी घेऊन जाऊ लागल्या. वाटेमध्ये ज्या बकऱ्यांना त्याने मारले होते त्या जीभ चाटत त्याला खायला येत होत्या. घेऊन जाणारे लोक त्यांना म्हणाले की तुम्हाला सर्वांना संधी दिली जाईल, प्रथम ह्याची सुनावणी तर होऊ दे. मग ते लोक त्याला एका अजस्त्र व्यक्तीच्या दरबारात घेऊन आले. त्या व्यक्तीने नत्थू खाँला पाहताक्षणी म्हटले, ''ह्याला का आणलेत? वही बघा, ह्याचे आयुष्य तर अजून शिल्लक आहे.'' वही बघितली गेली व त्यावरून कळले की ज्याला आणायचे होते तो नत्थू खाँ नसून नत्थू चांभार होता.

मरणासन्न अवस्थेमध्ये नत्थू खाँला आणखीही एक अनुभव आला की त्याचे जमीनदार साहेब, ज्यांचा बऱ्याच वर्षांपूर्वी मृत्यू झाला होता, ते ह्या जन्मी मोतद्दार बनून गावातील पीर साहेबांकडे गेली २२ वर्षे घोड्यांची देखभाल करीत आहेत. जमीनदार साहेबांनी पीर साहेबांकडून सत्तर रुपये घेतले होते. घेणारे-देणारे दोघेही ही गोष्ट विसरले होते, परंतु प्रतिष्ठित जमीनदार साहेबांना ह्या जन्मी पीर साहेबांच्या घोड्याची निगा राखून ते ऋण चुकवावे लागत होते. नत्थू खाँ जमीनदार साहेबांच्या घरी गेला व त्यांच्या मुलाला पूर्वीच्या हिशोबाच्या वह्या पाहायला सांगितल्या व पीर साहेबांचे सत्तर रुपये

परत करायला सांगितले. दोन-तीन दिवसानंतर पीर साहेबांकडील मोतद्दाराचा मृत्यु झाला व त्यास मुक्ती मिळाली. असे हे मरणासन्न अवस्थेत नत्थू खाँला आलेले अनुभव आहेत. सृष्टीतील समस्त जीवांच्या चांगल्या-वाईट कर्मांचा हिशोब परमेश्वराकडे असतो. बऱ्याच युगांनंतरही तो जसाच्या-तसा प्रसारीत होतो. ह्या जीवाला ज्या पद्धतीने समजेल, त्याच भाषेत, त्याच संबोधनांनी व त्याच वातावरणाचे वर्णन करून परमेश्वर त्याला व्यवस्थित समजावतात. ह्या घटनेनंतर नत्थू खाँने कित्येक वर्षे मांस खाल्ले नाही व खाटिकाचा व्यवसायही सोडून दिला.

गुरूदेव (परमपूज्य परमानंदजी महाराज) म्हणत असत की जर त्यांनी त्यांच्याकडे आलेल्या सर्वांना त्यांचे शिष्य बनविले असते तर त्यांचे आजपर्यंत हजारो विरक्त शिष्य बनले असते. घरातील भांडणांमुळे, परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्यामुळे अथवा संसारातील कटकटींना कंटाळून लोक अनुसुइया आश्रमात येत असत. तेथील शांतता, एकांतवास व नैसर्गिक सौंदर्य पाहून, तपोधन महाराजश्रींचे दर्शन घेऊन व त्यांची मधुर वाणी श्रवण करून ते त्यांना म्हणत असत की भगवंत! आता घरी परत जावेसेच वाटत नाही, आम्हाला आपले शिष्य बनवा. तेव्हा महाराजश्री त्यांना समजावत असत की संसारात, समाजात असे होतच राहते, परिस्थिती बदलतच राहते. लोकांची समजूत काढून ते त्यांना घरी परत पाठवीत असत. तरीही एखादा परत गेला नाही तर त्यास रागावून बळजबरीने परत पाठवीत असत, कारण जो कोणी महाराजांकडे येत असे त्याचा भूतकाळ, वर्तमान व भविष्य महाराजांना ज्ञात असे. त्यावरून त्यांना कळत असे की त्या व्यक्तीमध्ये साधुत्वाची लक्षणे आहेत अथवा नाहीत. ज्या व्यक्तीबाबत परमेश्वराकडून निर्देश मिळत असे की हा पुण्यवान आहे, मागील कित्येक जन्मांचा पथिक आहे, ह्यास मार्गदर्शन करावे - केवळ अशा व्यक्तींचाच ते शिष्यरूपात स्विकार करीत असत. आमचे वडील गुरुबंधू स्वामी सच्चिदानंदजी महाराज (धारकुंडी महाराज) ह्यांच्या संदर्भात महाराजश्रींना अंत:प्रेरणा मिळाली की कोणीतरी भ्रष्ट योगी येत आहे, त्यास मार्गदर्शन करावे. आमच्या बाबतीतही महाराजश्रींना अनुभव आला, त्यांना

माझा चेहरा दिसला की एक सावळासा मुलगा अतिशय वेगाने वाहणाऱ्या नदीच्या काठी बसून जोरात रडत आहे. त्याला पैलतीराला जावयाचे आहे, परंतु पोहता येत नाही. महाराजश्री त्यास धीर देत म्हणाले - रडतोस काय? पैलतीरी जायचे आहे ना? मग अशा प्रकारे प्रयत्न कर. मी तुझ्या पाठीशी उभा आहे, तुला पाहतो आहे. त्याने थोडा प्रयत्न करताच महाराजश्री त्यास प्रोत्साहित करीत म्हणाले, 'घाबरू नकोस, असाच पोहत रहा. माझे तुझ्याकडे लक्ष आहे, तुझा नक्की उद्धार होईल.' अशा प्रकारे पूर्वजन्मींच्या संस्कारांच्या आधारेच पूज्य महाराजश्री साधकाला आश्रमात प्रवेश देत असत. 'जीवनादर्श एवं आत्मानुभूति' ह्या पुस्तकात पुज्यश्रींच्या जीवनातील अशा अनेक घटनांचा विस्तृत उल्लेख केलेला आहे. महापुरुषांच्या मते पुनर्जन्म हा बौद्धिक विषय नसून अनुभवामध्ये त्याचे प्रत्यक्ष दर्शन होते. सर्वसाधारण लोक मोहरूपी रात्रीमध्ये अचेत अवस्थेत असतात. त्यांच्यासाठी जन्म, पुनर्जन्म असे काहीही नसते. ते आपापल्या बुद्धीनुसार उलट-सुलट काहीतरी बोलत असतात.

भारतीय अध्यात्मिक ग्रंथांच्या अध्ययनातून हे सिद्ध होते की सृष्टीची प्रक्रिया ही जन्म, मृत्यु व परत जन्म ह्या सिद्धांतावर आधारलेली आहे. रावण मूळतः असूर नव्हता. आधीच्या जन्मी तो हिरण्यकश्यपू व त्याही आधीच्या जन्मी तो भगवान विष्णूचा द्वारपाल होता. ऋषींच्या शापामुळे तो असूर झाला. 'अ' म्हणजे 'नाही', 'सूर' म्हणजे 'देव' अशा प्रकारे 'असूर' तो आहे ज्यामध्ये परमेश्वराचे देवत्व साठविलेले नसते, जो प्रकृतीरुपी अंध:काराच्या दिशेने गतीमान असतो. देव व असूर ह्या वृत्ती आहेत व त्यांचे वर्णन आदिशास्त्र भगवद्गीतेमध्ये विस्ताराने केलेले आहे. (पहा अध्याय १६)

महर्षि पतंजलींच्या अनुसार **'संस्कार साक्षात्करणात् पूर्वजाति ज्ञानम्।'** - योग-साधनेच्या उन्नत अवस्थेमध्ये, पराकाष्ठेच्या स्थितीमध्ये संस्कारांचे ज्ञान होताच पूर्वजन्माबद्दलचे ज्ञान होते.

भगवान बुद्ध आधीच्या दोनशे जन्मांपासून परमेश्वर दर्शनाच्या ओढीने सत्कर्म करीत होते. एका जन्मी त्यांना हत्तीचे शरीर मिळाले तरीही त्यांच्या

ध्येयाचा विसर त्यांना पडला नव्हता. एकदा काशीचा एक पंडीत जंगलात वाट चुकला होता. हत्तीने पाहिले व तो पंडीताजवळ गेला. प्रथम पंडीत घाबरून पळून जाऊ लागला, परंतु नंतर त्या पंडीताला वाटले की तो हत्ती सौम्य नजरेने त्याच्याकडे पाहत आहे, मान हलवित आहे व खाली बसून त्याच्या पाठीवर बसण्यास सांगत आहे. पंडीत हत्तीच्या पाठीवर चढून बसला व हत्तीने त्यास परत काशीला नेऊन सोडले.

शेवटच्या जन्मी ते महाराज शुद्धोदनाच्या पुत्राच्या रुपात जन्मले होते. ज्याचे नाव सिद्धार्थ. ज्योतिष्यांनी महाराजांना सांगितले, ''हा मुलगा एकतर चक्रवर्ती सम्राट होईल अथवा अत्यंत मोठा महापुरुष होईल. जगाला एकाच धर्माचा संदेश देईल व भ्रांतींचे निवारण करेल.'' आपल्या पुत्राने चक्रवर्ती सम्राट बनावे, गृहत्याग करून साधु होऊ नये ह्यासाठी शुद्धोदनाने खूप प्रयत्न केले. उदासिनता, वैराग्य ह्या भावनांना प्रेरित करणारे एकही दृश्य राजकुमाराच्या दृष्टीस पडू नये ह्याबद्दल तो सतर्क असे. त्याला अशा गुरुकुलात शिक्षण दिले गेले की जेथील वृक्षांची पाने कधी गळून पडत नसत. सुकलेले वृक्ष व गळणारी पाने पाहून राजकुमाराच्या मनात वैराग्य निर्माण झाले तर? संत-म हात्मे राजकुमाराच्या नजरेस पडता कामा नयेत. वेगवेगळ्या ऋतुंना साजेसे असे निवासस्थान, दास-दासी, तरुण-तरुणी, नृत्य-संगीत, मनोरंजन अशा वैभव-संपन्न वातावरणात राजकुमाराचे पालन-पोषण केले गेले. त्या युगातील अतिशय सुंदर राजकुमारी यशोधरा हिच्याशी युवराज सिद्धार्थचा विवाह केला. त्यांना पुत्ररत्न झाले ज्याचे नाव राहुल. अशा प्रकारे शुद्धोदनाने युवराज सिद्धार्थ ह्यास भोग-विलासात गुंतविण्याचा खूप प्रयत्न केला, परंतु सिद्धार्थ शेवटी बुद्ध झाले. संस्कारांचा उदय होताच अशी काही दृश्ये समोर घडली की ज्यामुळे जीवन नश्वर आहे हे सत्य त्यास उलगडले. सर्व वैभवांचा एका क्षणात परित्याग करून त्यांनी साधनेचा मार्ग अवलंबिला.

युवराज सिद्धार्थला महालामध्ये बंदिस्त किती काळ ठेवणार? पुढे राज्यकारभारही युवराजालाच सांभाळायचा होता. जनताही युवराजाच्या

दर्शनासाठी बेचैन होती. एक दिवस रथात बसून युवराज नगरात फेरफटका मारावयास निघाले. महाराजांचा आदेश होता की त्याच्या मार्गात कोणी वयोवृद्ध, रोगी अथवा अंत्य-यात्रा येता कामा नये. नगरातील सर्व लोकांनी स्वच्छ कपडे घालून प्रसन्न मुद्रेने युवराजाला सामोरे गेले पाहिजे. कोणीही दु:खी कष्टी दिसता कामा नये. अचानक अपस्मार झालेला एक रोगी गटारात पडला व तेथून कसाबसा उठून तो बाजूला जाऊ लागला. युवराज सिद्धार्थ रथातून उतरून त्याच्याजवळ गेला. त्याने लोकांना विचारले - ह्यास काय झाले आहे? हा नाक का चोळत आहे? त्याला गटार आहे हे कसे कळले नाही? लोकांनी सांगितले - त्याला रोग झालेला आहे. युवराजाच्या मनात आले की ह्या सुंदर शरीरामध्ये इतका घातक रोग असू शकतो! त्यापासून वाचण्याचा काही उपाय नाही का? नगराचा फेरफटका अर्ध्यावरच सोडून खिन्न अवस्थेत युवराज महालात परतले.

सात दिवसांनी परत युवराज फेरफटका मारण्यास निघाले. एका अतिशय वृद्ध व्यक्तीने मुलांना विचारले - बाहेर कसलातरी मिरवणुकीचा आवाज येत आहे. सध्या लग्नांचे मुहूर्त तर नाहीत, मग हे बाजे कोण वाजवित आहे? मुलांनी सांगितले - युवराजांची मिरवणूक जात आहे. वृद्ध व्यक्तीला आनंद झाला व युवराजाला पाहण्यास तोही उठून जाऊ लागला. एका मुलाने त्यांना अडविले व म्हणाला - आजोबा तुम्हाला तेथे जाण्यास मनाई आहे. तसा राजाचाच आदेश आहे. त्या वृद्ध व्यक्तीला राग आला व म्हणाला - तुम्हा मुलांचे तर अजून बरेच आयुष्य शिल्लक आहे, युवराजाला तुम्ही कधीही पाहू शकाल. माझे आता फार कमी दिवस शिल्लक आहेत, तेव्हा मी त्याला कधी पाहणार? आमचे युवराज व आम्हीच त्यास पाहावयाचे नाही? असा कसा राजाचा आदेश? असे म्हणत तो वृद्ध युवराजाच्या समोर येऊन उभा राहिला. म्हातारपणामुळे त्याची मान लटपटत होती, हात कापत होते. युवराज त्याला पाहून रथातून उतरले व त्याच्याजवळ जाऊन त्याला विचारले - आपण मान का हलवित आहात? त्या वृद्ध व्यक्तीने सांगितले - ‘‘मी वृद्ध

झालो आहे म्हणून.'' युवराजांनी विचारले - ''वृद्ध होणे म्हणजे काय? मीही वृद्ध होईन का?''

त्या वृद्ध व्यक्तीने उत्तर दिले - ''युवराज! जो जन्म घेतो, तो वृद्ध होतो व एक दिवस त्याचा मृत्यूही होतो. परंतु आपण चिंता कशाला करता? आपण तर अजून बरेच वर्ष तरुण राहाल.'' युवराजांचे ह्या उत्तराने समाधान झाले नाही. शरीराच्या ह्या अपरिहार्य अवस्थेने ते खिन्न झाले. व्यक्ती इतका विवश होऊ शकतो की स्वत:च्या मानेवर व हातांवरही त्याचा ताबा राहू शकत नाही! इतकी असहाय्य अवस्था! रथ अर्ध्यावरच महालात परतला.

तिसऱ्या वेळेला जेव्हा युवराज निघाले तेव्हा मार्गात त्यांची दृष्टि एका अंत्ययात्रेवर पडली. त्यांनी विचारले की हे लोक काय घेऊन चालले आहेत? मंत्र्यांनी सांगितले - ह्या जगात असे काही न काही तरी होतच राहते. युवराज म्हणाले मला काय आहे ते पाहायचे आहे. जेव्हा त्यांनी प्रेत पाहिले तेव्हा ते दचकले व म्हणाले - हा तर जेमतेम तीस-पस्तीस वर्षांचा माणूस झोपलेला आहे. हा डोळे का उघडत नाही? तो श्वास का घेत नाही? त्याचे शरीर एवढे थंड कसे काय? लोकांनी सांगितले - हा मरण पावला आहे व आता त्याला जाळण्यात येईल. युवराज तेथूनच परत फिरले व विचार करू लागले की जग हे अतिशय दु:खमय आहे - जन्म-मृत्यु, वार्धक्य व व्याधि! ह्या दु:खांच्या पलिकडे जाण्याचा, त्यांच्यापासून सुटण्याचा काही उपाय नाही का? त्या उपायाचा शोध घेण्यासाठी मध्यरात्री युवराजाने महालाचा परित्याग केला. साधना करीत असताना चाळीस-चाळीस दिवस उपवास केले. शेवटी कैवल्य-ज्ञान, जन्म-मरणाच्या चक्रातून मुक्तता व परमेश्वराच्या दर्शनाने मिळणारी अनुभूति - असे सर्व काही प्राप्त करून गौतम बुद्ध म्हणून प्रतिष्ठित झाले. परमात्म-स्थिति प्राप्त होऊन त्यांचा तो अंतिम जन्म होता. वडिलांकडून अनेक वेळा अडथळे येऊनही वेळ येताच ते संत झाले.

म्हणून गीतेत म्हटले आहे -

**अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम्।** (गीता-६/४५)

अर्जुना! प्रयत्नांमध्ये शिथिल असलेला साधकही काही जन्मांच्या कालावधीनंतर तेथेच पोहोचतो ज्यास परमगति, मोक्ष म्हणतात. अर्जुना! ह्या मार्गामध्ये आरंभाचा, बीजाचा नाश होत नाही.

भगवान महावीरांच्या बाबतही असाच उल्लेख आहे. आधीच्या चोवीस जन्मांपूर्वीच त्यांच्या हृदयात साधना जागरूक झालेली होती व त्या जन्मी ते एक लाकूडतोड्या होते. जंगलात फिरत असताना त्यांना एक संत दिसले. त्या संतांकडे ते एकटक बघतच बसले. परंतु गरीब असल्याकारणाने त्यांच्याशी जाऊन बोलायची हिम्मत झाली नाही. संतदर्शनाच्या ह्या पुण्यामुळे पुढच्या जन्मी काही संतांना भोजन देण्याचे भाग्य त्यांस मिळाले. तिसऱ्या जन्मी सत्संग ऐकावयास मिळाला व ते विरक्त संन्यासी झाले. कधी कोठे चूक झाली तर त्यासाठी नरकातही जावे लागले. पुन्हा जन्म झाल्यावर साधना ज्या स्तरापर्यंत झालेली होती तेथूनच पुढे चालू झाली. एका जन्मात ते वाघ झाले तर एका जन्मात राजा. शेवटच्या जन्मी ते तीर्थंकर झाले. तीर्थंकर म्हणजे संसार सागरातून तारणारा. जो स्वतः तरुन गेलेला आहेच व दुसऱ्यांना तारण्याची क्षमता ज्याच्यामध्ये आहे असा. तीर्थंकर हा शब्द अर्ध-मागधी भाषेतील आहे व त्याचे समानार्थी शब्द आहेत सत्‌गुरु किंवा योगेश्वर, शिवस्वरूपामध्ये स्थित असा महापुरुष अथवा तत्त्वदर्शी. चोविसाव्या जन्मात त्यांना कैवल्यज्ञान प्राप्त झाले. अशी ही पुनर्जन्मांची शृंखला आहे. जर पुनर्जन्म मानला नाही तर 'नशीब' शब्दाला काहीच अर्थ नाही. मग आपण दैव, भाग्य, प्रारब्ध इत्यादींबद्दल का बोलतो?

पूज्य गुरुदेव महाराजांचा जन्म एका सामान्य परिवारात झाला होता. लोकमान्यता अशी आहे की शास्त्रांचे अध्ययन केल्याशिवाय कल्याण होणे संभव नाही, परंतु महाराजजींना जीवनात अध्ययन करण्याची संधीच मिळाली नाही. लहानपणी ते शाळेत असताना एक घटना घडली. शाळेतील गुरुजींना ते वर्गाच्या बाहेर इकडे-तिकडे फिरताना दिसले म्हणून गुरुजींनी त्यांना छडी मारली. जोरजोरात रडत ते घरी आले. अशिक्षितपणामुळे आईने उलट त्यांचीच

बाजू घेतली व म्हणाली - 'खड्ड्यात गेले असे शिक्षण. आजपासून माझ्या मुलाला मी शाळेत पाठविणार नाही.' अशा प्रकारे महाराजांचे शाळेत जाणे बंद झाले.

त्या काळी गावांमध्ये कुस्ती, कसरत, मल्लविद्या, दंड-बैठका ह्यांचे खूप प्रस्थ होते. महाराजजींच्या रामकोला गावात बारा विख्यात आखाडे होते. महाराजजी गावातील ख्यातनाम पहिलवान होते. ते सांगत असत की घरी ते अगदी सुखात होते, खायची-प्यायची चंगळ होती. रोज पाच लिटर दूध, हवे तेवढे तूप, बदाम-पिस्ते खायला मिळायचे. वेड होते ते फक्त व्यायाम व कुस्तीचे! वयाच्या अठ्ठावीसाव्या वर्षापर्यंत कोणाशीही कुस्तीत हरले नव्हते. त्यांची एकच इच्छा होती की भारतातील सर्वश्रेष्ठ पहिलवान 'गामा' ह्याच्याशी कुस्ती खेळायला मिळावी, म्हणजे त्याच्या व आपल्या शक्तीत किती फरक आहे ते कळेल.

तरुणपणीच्या दिवसांची आठवण काढत महाराजजी सांगत - 'हो, घर सोडण्यास मन जराही तयार नव्हते. प्रपंचाबद्दल प्रेम वाटत होते. साधू होण्याचा मनात कधी विचारही आला नाही.'' एकूण तीन वेळा आकाशवाणी झाली. पहिल्यांदा झाली तेव्हा ऐकू आले की ह्या महात्म्याला जेवण द्यावे. दुसरी आकाशवाणी तेव्हा ऐकू आली जेव्हा गावातील एका स्त्रीच्या बोलावण्यावरून तिला भेटायला जात होतो. जाताना रस्त्यात विचार आला की माझ्या हातून हे पाप तर होत नाही आहे? तेव्हाच जोरात आकाशवाणी झाली की अतिशय मोठे पाप करावयास जात आहेस, नरकात जाशील. मग आम्ही परत फिरलो. गावातील भग्नावस्थेत असलेल्या मंदिराजवळून जाताना परत आकाशवाणी झाली. ह्या मंदिरात तुझे गुरुमहाराज आहेत. मंदिरात जाऊन पाहिले, अंधारात कोणी दिसले नाही. बाहेर परत आलो. राग आला की कोण हे मस्तकात कधी जोरात तर कधी हळू बोलत आहे? मंदिरात गुरुमहाराज आहेत असे कोण सांगत आहे? मंदिरात तर कोणी नाही. तेवढ्यात आतून खोकण्याचा आवाज ऐकू आला. परत जाऊन बघितले तर एक संत बसलेले दिसले. त्यांना आदराने

नमस्कार केला व तेथे प्रकाशाची व्यवस्था केली. सतत तीन दिवस व तीन रात्र त्यांची सेवा केली. साधनेचा विधी जाणून घेतला व साधना आरंभ केली.

सहा दिवसानंतर गावातील लोकांना त्यांचा पत्ता लागला की ते झाडीमध्ये बसून साधना करीत आहेत. चार महिन्यांतच साधना जागृत झाली. इष्टदेव स्वतः त्यांस मार्गदर्शन करू लागले. परमेश्वर स्वतः त्यांना अत:करणातून निर्देश देऊ लागले, उठण्या-बसण्याची, चालण्याची आज्ञा देऊ लागले व साधना शिकवू लागले. गृहत्याग केल्यापासून स्वरूपस्थ होईपर्यंत त्यांना आठ वर्षे लागली. ह्या आठ वर्षांतील अधिकांश वेळ ते दिगंबर अवस्थेत, केवळ परमेश्वराच्या ध्यानामध्ये मग्न, शारीरिक सुख-दु:खाचे भान नाही व कोणाशीही काही संबंध नाही, अशा अवस्थेत असायचे. कधी दोन दिवस, कधी चार दिवस तर कधी चौदा दिवस सुद्धा उपवास घडायचा.

गुरु-महाराज शरीर-निर्वाहासाठी कधी भिक्षा मागावयाचे नाहीत. त्यांचे असे मानणे होते की साधू बनायचे नसतानाही त्यांना परमेश्वराने साधू बनविले होते. तेव्हा परमेश्वरच त्यांच्या जेवणाचाही प्रबंध करेल. महाराजांनी कशाला चिंता करावी? व त्याप्रमाणे जेवणाची सोयही होत असे. एक-दोन दिवस निघून गेले की तिसऱ्या नाहीतर चौथ्या दिवशी तरी कोणाला तरी प्रेरणा देऊन परमेश्वर त्यांच्या जेवणाची व्यवस्था करून द्यायचे. कोणाला आकाशवाणी होत असे नाहीतर कोणाला स्वप्न पडत असे की ह्या संताची सेवा करावी. कधी कोणी श्रद्धाळू असेच दर्शनाला येत असत व भोजन देत असत.

एकदा महाराज असेच निराधार विचरण करीत असता नदीकाठी असलेल्या बाभळीच्या वृक्षाखाली ध्यानाला बसले. एक शेतकरी तेथून जात असताना त्यांना म्हणाला - इथे कशाला बसलात? गावात चला म्हणजे भिक्षा मिळेल व आसराही मिळेल. इथे बसून काय मिळणार? साधना काय रात्री करा. महाराजजी काही बोलले नाहीत. थोडे पुढे गेल्यावर परत तो शेतकरी म्हणाला की इथे कशाला बसलात? गावात चला, भिक्षा मिळेल. तरीही महाराजजी काही बोलले नाहीत. जेव्हा त्याने तिसऱ्यांदा महाराजांना गावात

चलण्यास सांगितले तेव्हा महाराजजी म्हणाले - तू कशाला चिंता करतोस? परमेश्वर ज्यास छडी दाखवेल, प्रेरणा देईल तो स्वत: येऊन आम्हास भोजन देईल. तो शेतकरी ठीक आहे म्हणाला व निघून गेला. एका तासाने तोच शेतकरी चपाती वगैरे घेऊन परत आला. महाराजांनी विचारले - हे काय? तूच भोजन घेऊन आलास? तो शेतकरी म्हणाला - ''होय महाराज! परमेश्वराने मलाच छडी दाखविली.'' महाराजांची भाषा अशीच उद्धट होती. कोणाला आवडो अथवा नाही, मनाला वाटेल ते बोलायचे. आठ वर्षे असेच चालू होते. शेवटी अनुसुइया येथे स्वरूप प्राप्ति झाली. जन्म-मरणाच्या चक्रातून मुक्ति मिळाली. कैवल्य स्वरूपाची स्थिति मिळाली, सिद्धि प्राप्त झाली, सर्व काही मिळाले.

आम्ही महाराजांना एकदा विचारले - 'आम्हाला तर कधी आकाशवाणी ऐकू नाही आली? आपल्याला कशी काय आली?' त्यावर महाराज म्हणाले - 'हो! ही शंका आमच्याही मनात आली. पण परमेश्वराने आम्हाला आमच्या आधीच्या सात जन्मांचा इतिहास सांगितला. अनुभवामध्ये कळले की गेल्या सात जन्मांमध्ये मी साधू होतो. त्यातील चार जन्म अंगी साधुपण नसतानाही नुसताच इतर साधुंबरोबर राहत होतो. कधी कपाळाला टिळा लावून तर कधी अंगाला भस्म लावून, कधी नुसतीच लंगोटी नेसून व हातात कमंडलू घेऊन तर कधी भगवे वस्त्र धारण करून साधूचे ढोंग पांघरून इकडे-तिकडे फिरत होतो, साधना जागृत झाली नव्हती. महात्म्यांचा वेष व त्यांची भाषा जी परंपरागत चालत आलेली होती, त्याबद्दल सर्व माहिती होती. गेल्या तीन जन्मांपासून साधना चांगल्या प्रकारे जागृत झालेली होती, जशी व्हावयास हवी तशी होत होती. मागल्या जन्मी मुक्ति मिळणारच होती, परंतु मनामध्ये दोन-तीन गोष्टींबद्दल कुतुहल निर्माण झाले की लग्न-विवाह म्हणजे काय असते? व गांजा पिऊन लोकांना काय सुख मिळते? त्याबरोबरच जरासा देहाभिमानही शिल्लक होता. मी पण कोणीतरी आहे, अमूक कुळातील आहे. अशा प्रकारे संयम पक्का असला तरी मनात कुतुहल निर्माण झाल्यामुळे परत जन्म घेणे भाग पडले.

'कुठली वीट अन् कुठला दगड' अशा प्रमाणे गत झाली. परमेश्वराने असा जन्म दिला की अभिमान बाळगणार तरी कशाचा? लग्न करून त्याबद्दलचे कुतुहलही थोडक्यात मिटविले. दोन चापट्या मारल्या व सांगितले की 'हे तुझे गुरुमहाराज' व 'हा मार्ग'! 'हे पाप' व 'हे पुण्य'! आता कर साधना! हो परमेश्वराने आम्हाला कान पकडून साधु बनविले. आम्ही जेथे राहत होतो, तेथे परमेश्वर आमचे रक्षण करीत सतत आमच्याबरोबर राहात. स्मशानात बसलेले असलो तरी असे वाटायचे की परमेश्वराच्या मांडीवरच बसलेले आहोत. **'जाके रथ पर केसो ता कहँ कौन अँदेसो?'** परमेश्वरच आम्हाला अनुसुइया येथे घेऊन गेले. आम्हाला तर ते ठिकाण माहित नव्हते. आकाशवाणी झाली की ह्या शरीरात अजून राहवयाचे असेल तर चित्रकूटला जावे. चित्रकूटला जाऊन आम्ही परमेश्वराला विचारले. ''प्रभो! चित्रकूट तर एवढे मोठे आहे. चौऱ्याऐंशी कोस (जवळजवळ ३०० कि.मी.) क्षेत्रफळ असलेले. त्यामध्ये कोठे राहवे? अनुभवामध्ये परमेश्वराने सांगितले की सती अनुसुइया ह्या ठिकाणी जावे.

त्याकाळी अनुसुइया हे घनदाट जंगल होते. एक सपाट भाग बघून महाराजजी तेथे बसावयास लागले तर थोडे उत्तरेकडे जाण्याचा संकेत मिळाला. तेथे जाऊन बसण्याचा विचार करू लागले तर थोडे दक्षिणेकडे जाण्याचा निर्देश मिळाला. जेव्हा दोन्हीच्या मध्यभागी आले तेव्हा बसण्याचा आदेश मिळाला. महाराजजी तेथे बसताच संकेत मिळाला की आता जन्मभर येथेच राहवयाचे आहे. पाठीमागे दोन-तीन मोडकळीस आलेल्या घराच्या खोल्या होत्या व समोर मंदाकिनी गंगा नदी! चहूबाजूला घनदाट झाडी. दहा फूटांवरचे सुद्धा नजरेस पडत नव्हते इतकी झाडी. सहा महिन्यानंतर कळले की तिकडे एक विहीर आहे जी झाडाझुडपांमुळे झाकलेली होती. लांब-लांब साप तेथे होते! जवळच एका गुहेत वाघ राहत असे! जगंलात माकडे, अस्वलेही बरीच होती व त्यात डासांचा त्रासही होता. परंतु परमेश्वराचा आदेश की तेथेच राहवयाचे म्हणून महाराजजी तेथे बसून राहिले. चौदा दिवस त्यांना तेथे उपवास करावा

लागला, परंतु सर्व विभूति प्राप्त झाल्या. हे सर्व पुर्वजन्मीच्या संस्कारांवर निर्धारित असते.

युधिष्ठिर व इतर पांडव द्युतामध्ये राज्य व सर्वस्व हरल्यामुळे वनवासात जीवन व्यतीत करीत होते. एकदा युधिष्ठिर अतिशय व्यथित होऊन म्हणाला की तोच सर्व भावंडांच्या दु:खाचे कारण आहे. त्याचे सांत्वन करीत अर्जुन म्हणाला - 'राजन्! आपण चिंता करू नका. आपण पुन्हा महाराज व्हाल ह्यात शंका नाही, कारण भगवान श्रीकृष्ण आपणाबरोबर आहेत. मी देवर्षि नारदांकडून ऐकले आहे की भगवान श्रीकृष्ण गेल्या दहा जन्मांपासून संत आहेत. पहिल्या जन्मी ते 'यत्र सायं गृह मुनि' म्हणजे फिरता-फिरता ज्या ठिकाणी संध्याकाळ होईल तेथे रात्री वास्तव्य करायचे अशा पद्धतीने विचरण करीत होते. आजीवन मौन राहिले. त्यानंतरच्या एका जन्मी ते प्रभास क्षेत्री तेथील जनतेला धर्माचा उपदेश देत विचरण करीत होते. एका जन्मी पुष्कर क्षेत्री ते बारा वर्षे एका पायावर उभे राहून यज्ञ करीत राहिले. ह्या यज्ञामध्ये ते अतिशय दुर्बळ झाले होते. त्यानंतर एका जन्मी ते नर-नारायणाच्या रुपात बद्रीनाथ येथे ध्यानस्थ होते. अवस्था उन्नत होताच एका जन्मी ते विष्णुरुपामध्ये अवतारित झाले. एका जन्मी वामन रुपामध्ये अवतरले. त्यांना अवतार म्हटले गेले पण पूर्णत्वाची प्राप्ती झाली नव्हती. ह्या जन्मी ते पूर्णत्व प्राप्त करून परमात्म स्वरूपामध्ये स्थित असलेल्या भगवान श्रीकृष्णांच्या रुपात आपल्या बरोबर आहेत, म्हणून विजय आपल्यालाच मिळेल. ह्या जन्मी पूर्णत्वाच्या प्राप्तीसाठी त्यांना केवळ जन्म घेणे शेष होते, साधनेचे केवळ तीन दिवस शिल्लक होते.'' बद्रिकाश्रमात अर्जुनाबरोबर तीन दिवस ते ध्यानस्थ बसले व पूर्णत्व प्राप्त केले. त्यामुळे बालपणापासूनच त्यांच्या जीवनात अनेक चमत्कार घडले.

ह्या सृष्टीमध्ये पुनर्जन्माचा क्रम अबाधितपणे चालू आहे. कोणी साधनेच्या प्राथमिक अवस्थेमध्ये आहे तर कोणी स्वरूपाची प्राप्ति करवून देणाऱ्या जन्माच्या समीप आहे. चक्रवर्ती सम्राट ऋषभदेव हे चोवीस अवतारांपैकी चौथे

अवतार मानले जातात. जैन मतावलंबी त्यांना आदिनाथ असे म्हणतात. अर्थात त्यांच्यापासूनच जैन संप्रदायाचा जन्म झाला. त्यांच्या शंभर पुत्रांपैकी ऐक्याऐंशी पुत्र विरक्त ब्राह्मण झाले. जो ब्रह्मतत्त्वाच्या चिंतनात मग्न असतो तो ब्राह्मण. नऊ पुत्र योगेश्वर झाले, नऊ पुत्र क्षत्रिय झाले. शेवटचा पुत्र 'भरत' हा एकछत्र सम्राट झाला. त्याने एकदा त्याच्या मंत्र्यांना सांगितले की त्याची प्रशंसा महेंद्र पवर्ताच्या शिखरावर कोरून ठेवली जावी. मंत्री पर्वतशिखरावर जाऊन परत आले व राजाला म्हणाले राजन्! अशी एकही शिळा नाही ज्यावर राजा-महाराजांची यशोगाथा कोरलेली नाही. आदेश दिलात तर त्यातल्या एखाद्या शिळेवर कोरलेले यशोगान मिटवून तुमची यशोगाथा अंकित करवून घेतो. आश्चर्यचकित झालेल्या भरताने स्वतः शिखरावर जाऊन त्या सर्व शिळा पाहिल्या. एका पेक्षा एक श्रेष्ठ अशी प्रत्येक राजाची यशोगाथा होती. परंतु इतिहासात तर सोडाच पण लोकापवादातही त्या राजांचा कोठेही उल्लेख नव्हता. राजा भरताने विचार केला की अशी प्रशंसा कोरल्याने काय होणार? काही दिवसांतच समाज आपल्याला विसरून जाईल. तेव्हा यशाची कामना करणे ही पण एक भ्रांतीच आहे.

राजा भरतामध्ये वैराग्य निर्माण झाले. राज्याचा परित्याग करून ते संत झाले. नदीकाठी झाडाखाली बसून त्यांनी साधना केली. भक्तांनी तेथेच त्यांच्यासाठी एक पर्णकुटी तयार केली. एकदा त्या आश्रमाजवळच वाघाच्या डरकाळीने भयभीत झालेल्या एका गर्भवती हरिणीने पिल्लाला जन्म दिला व ती जंगलात पळून गेली. ते पिल्लू भरत ऋषींच्या अवती-भवती हिंडू लागले. ऋषींना त्याची दया आली व आश्रमात त्याचे पालन-पोषण होऊ लागले. थोडे मोठे होताच एक दिवस उड्या मारीत ते पिल्लू जंगलात निघून गेले. भरत ऋषी अस्वस्थ झाले, त्यांच्या साधनेत खंड पडला. पिल्लाच्या काळजीने ते व्याकुळ झाले. विचार करू लागले की पिल्लू इतके भोळे-भाबडे आहे की चित्त्याच्या किंवा शिकाऱ्याच्या जवळ सुद्धा जाईल. कोणी त्यास पकडले व खाऊन टाकले तर! आजही परत आले नाही. भरत ऋषींच्या आयुष्याचा तो

अंतिम काळ होता. सतत हरिणाच्या पिल्लाचे चिंतन करीत तो काळ गेला. मृत्युनंतर त्यांना हरिणाचाच जन्म मिळाला. मृगयोनीमध्येही त्यांना पूर्वजन्मीचे ज्ञान होते. त्यांच्या चुकीचा त्यांना बोध झालेला होता. आपल्या कळपाचा त्याग करून ते एका महात्म्याच्या कुटीमध्ये बेधडक शिरले. प्राण्यांबद्दल महात्म्यांना स्नेहभाव असतोच. तेथील प्रसन्न वातावरणात त्यांचे जीवन व्यतीत होऊ लागले. परंतु पशुदेहामध्ये साधना करणे कठीण हे पाहून इंद्रायणी नदीच्या पात्रात कमरेपर्यंत पाण्यामध्ये उभे राहिले व अन्न त्याग करून चार दिवसात शरीर सोडले.

पुढील जन्मी ते भरत मुनी झाले. त्यांचा जन्म ब्राह्मण कुळात झाला. त्यांच्या आई-वडिलांचे ते आठवे चिरंजीव होते. त्यांचे इतर सर्व भाऊ विद्वान होते. भरत मुनींना व्यावहारीक शिक्षणात रुची नव्हती. वडिलांच्या मृत्युनंतर भावांनी त्यांना शेतीचे काम पाहवयास सांगितले. चिमण्यांपासून शेताची राखण करण्याचे काम सोपविले परंतु भरत त्या कामातही असफल राहिले. शेवटी हताश होऊन भावांनी त्यांना घरातून बाहेर काढले. भरत ह्याच दिवसाची प्रतीक्षा करीत होते. स्वत:हून घर सोडले असते तर घरच्यांनी शोधून काढण्याचे भय होते. भावांनीच बाहेर काढल्यामुळे भरताला बरे वाटले व ते साधनेला लागले. निर्वाहाची व्यवस्था परमेश्वराद्वारे होऊ लागली.

ज्या जंगलामध्ये भरत मुनी ध्यानस्थ बसून तपस्या करीत होते, त्या जंगलात एके दिवशी काही दरोडेखोर देवीच्या मूर्तिसमोर एका तरुणाचा बळी देत होते. बळी चढविण्याची तयारी होत असतानाच अचानक तो तरुण पळून गेला. दरोडेखोरांचा म्होरक्या क्रोधित होऊन म्हणाला की बळी मिळाला नाही तर देवी कोपेल, तेव्हा दुसऱ्या कोणास तरी बळीसाठी पकडून आणा. भरत मुनी त्या जंगलात फिरत होते. दरोडेखोर त्यांना पकडून देवीसमोर घेऊन आले. भरत मुनींना बळी देणार तेवढ्यात देवीच्या मूर्तीमधून ज्वाळा निघू लागल्या. एक आकृती प्रकट झाली व तिने दरोडेखोरांच्या हातून तलवार हिसकाऊन घेतली. त्या तलवारीने सर्व दरोडेखोरांचा संहार केला. जेव्हा सर्व शांत झाले तेव्हा जडभरत हळूच उठले व चुपचाप पुढे निघाले.

ह्या घटनेनंतर काही दिवसांतच महाराज रहूगण गुरुंच्या शोधात गंगेच्या काठी पालखीमधून भ्रमण करीत होते. पालखी वाहणारा एक भोई आजारी पडला. राजाने कोणा दुसऱ्या भोयाची व्यवस्था करण्यास सांगितले. जडभरत जवळच होते म्हणून त्यांना पालखी वाहण्याच्या कामास लावले गेले. पालखी वाहताना मुंग्यांवर पाय पडू नये म्हणून जडभरत कधी उडी मारून पाय टाकत होते तर कधी डावीकडे वा उजवीकडे झुकत होते. त्यामुळे पालखीचे संतुलन बिघडत होते. राजा म्हणाला - ''कसे चालत आहात तुम्ही लोक? मला धक्के बसत आहेत.'' भोई म्हणाले - ''राजन! आम्ही तर नीट चालत आहोत. हा नवा भोई आमच्या बरोबरीने चालत नाही आहे.'' तेव्हा राजा नव्या भोयास म्हणाला- ''तू दुबळा तर दिसत नाहीस! तुझ्याने भार उचलवत नाही आहे का? थकला आहेस का?''

त्या वेळी जडभरताला स्वरूप प्राप्ति झालेली होती. जीवनात प्रथमच ते बोलले- ''राजन्! दुबळा व सशक्त तोच असतो ज्यास देहाध्यास असतो, थकतोही तोच जो चालतो. आणि भार वाहणे तर तुला काय कळणार?'' राजा रहुगणाला वाटले की गुरुंच्या शोधात निघालो होतो, तेव्हा हेच तर आपले गुरु नाहीत? पालखीतून उतरून त्याने सांष्टांग दंडवत घातला व निवेदन केले- ''भगवंत! कल्याण व्हावे ह्यासाठी मार्गदर्शन करावे.''

जडभरत म्हणाले- ''राजन्! एका परमात्म्याला शरण जा. तोच केवळ शाश्वत आहे. प्रकृति तर परिवर्तनशील आहे.'' राजाने विचारले, ''शरण जाण्याचा विधी कोणता?'' महात्मा म्हणाले- ''आत्मस्थित महापुरुषाच्या चरणांची धूळ ल्यायल्याशिवाय तो विधी, अर्थात परमात्म-दर्शन करविणारी साधना जागृत होत नाही.'' महाराज रहूगणाने अनेक देव-देवतांची मंदिरे उभारलेली होती. त्याने विचारले- ''भगवंत! ह्या देव-देवतांचे काय?'' म हात्मा भरत म्हणाले- ''राजन्! ह्या देव-देवता म्हणजे लावा पक्ष्याप्रमाणे भेदरट, कावळ्याप्रमाणे चांगले-वाईट सर्व भक्षण करणाऱ्या, बगळ्याप्रमाणे साफ-सुथऱ्या; बाहेरून ध्यानस्थ दिसणाऱ्या पण आतून घात करणाऱ्या व

घुबडाप्रमाणे अचेत आत्म्यांची हत्या करणाऱ्या आहेत, ह्यापेक्षा अधिक त्यांचे काहीही महत्व नाही.'' भरताला ह्या देव-देवतांचा अनुभव आलेला होता. ज्या दरोडेखोरांनी जन्मभर देवीला बळी चढविला त्या देवीने स्वत:चे प्राण संकटात येताच आपल्या भक्तांचे रक्षण केले नाही, त्यांना मारून टाकले.

पूज्य गुरुमहाराज नेहमी म्हणायचे की, ब्रह्मलीन महापुरुषावर जादु-टोणा, भूत-प्रेत ह्या गोष्टी प्रभाव पाडू शकत नाहीत - **'हरि भक्तन के पास न आवे, भूत-प्रेत पाखंड।'** भरत परब्रह्माशी संयुक्त असे महापुरुष होते म्हणून त्यांच्यावर ह्या गोष्टींचा प्रभाव पडला नाही. पशुयोनीमध्येही ते ऋषि असल्याचे त्यांच्या स्मरणात होते.

पूज्य गुरुमहाराजांच्या सती अनुसुइया येथील आश्रमात पुनर्जन्माशी संबंधित घटना रोज पाहवयास मिळत. आश्रमाजवळच माकडांची एक टोळी होती. त्या टोळीचे नेतृत्व करणाऱ्या माकडास महाराजजी 'महंत' म्हणत असत. महंत निर्देश करेल तेथे सर्व टोळी जात असे. एक धष्ट-पुष्ट माकड मात्र त्या टोळीपासून वेगळे राहायचे. महाराजजी त्या माकडाला ब्रह्मचारी म्हणत. महंताची एकट्याची त्याला हाकलण्याची हिम्मत नव्हती. महंताने संकेत करताच टोळीतील सर्व माकडे मिळून त्यास मारत व हाकलून देत असत. त्यामुळे ते उंच पर्वताच्या शिखरावर जाऊन राहत असे.

भल्या पहाटे महाराजजी जेव्हा ध्यानाला बसत तेव्हा ते ही डोंगरावरून उतरून महाराजजींच्या समोर थोड्या अंतरावर ध्यानस्थ बसत असे. महाराजजींप्रमाणे त्याच्याही पापण्या उघड्या असत. शांत, स्थिर जराही न हालता ते माकड बसून राहत असे. हां, कधी-कधी डोळे हालवून ते महाराजांकडे बघत असे व त्याच स्थितीमध्ये दोन-दोन तास बसून राहत असे. जेव्हा महाराज खोकत वा धुनी खोदत असत तेव्हा तेही इकडे-तिकडे बघत अंग खाजवावयास लागत असे. महाराजजी त्याच्यासाठी कणिक व कोंड्याची एक मोठी रोटी रात्रीच बनवून ठेवत व सकाळी त्यास देत असत. रोटी काखेत पकडून ते माकड तीन पायांनीच डोंगरावर चढून जात असे व

दुसऱ्या दिवशी बरोबर त्याच वेळेस अंधार असतानाच महाराजांच्या समोर येऊन बसत असे. चार-सहा महिने असेच चालू होते.

एके दिवशी महाराजांनी त्यास सांगितले की जर तू साधू आहेस तर तुझ्या भोजनाची व्यवस्था तूच कर. आश्रमातील इतर साधु पंधरा किलोमीटर लांब चित्रकूटपासून डोक्यावर गव्हाचे पीठ उचलून घेऊन येतात. त्यांनी रोटी बनवून तुला का द्यावी? त्याला रोटी देत महाराज म्हणाले- ''तुझ्या भोजनाची व्यवस्था ह्यापुढे तुझी तूच कर.''

दुसऱ्या दिवशी पहाटे पाच वाजायच्या आधीच एक शेतकरी अर्धा मण (जवळजवळ २० किलो) चणे घेऊन अनुसुइया आश्रमात आला. महाराजजींना नमस्कार करून तो म्हणाला - ''महाराजजी! येथे कोणी ब्रह्मचारी माकड आहे का?'' महाराजांनी विचारले, ''तू त्याला कसे काय ओळखतोस?'' शेतकरी म्हणाला, ''महाराजजी! गावापासून दूर जंगलालगत असलेल्या शेताची राखण करीत मी मचाणावर झोपलेलो होतो. माझ्या स्वप्नात येऊन त्या माकडाने माझा हात पकडला व म्हणाले - ''ऊठ, झोपतोस काय? मी ब्रह्मचारी माकड आहे. सती अनुसूइया आश्रमात राहतो. माझ्यासाठी चणे घेऊन ये.'' मी उठून उभा राहिलो व आवाज देऊन विचारले, ''कोणी माझा हात पकडला?'' आजूबाजूने कोठूनही उत्तर मिळाले नाही म्हणून अर्ध्या तासाने परत झोपून गेलो. झोप लागताच परत त्या माकडाने चापटी मारली व म्हणाले - ''मी काय सांगितले ते ऐकले नाहीस का? परत झोपलास काय?'' मी विचार केला, आता परत झोपलो तर त्या माकडाच्या हातचा मार खावा लागेल. म्हणून रात्रीच आंघोळ वगैरे आटोपून चणे घेऊन निघालो. कोठे आहे ते माकड?''

महाराज म्हणाले, ''आता येईलच एवढ्यात.'' तितक्यात ठराविक वेळेला ब्रह्मचारी माकड आले व महाराजांसमोर बसले. महाराज म्हणाले - 'बस बेटा ब्रह्मचारी! तू खरा साधू आहेस. तुझी साधना अचूक मार्गाने चालली आहे. आता तुला तुझ्या भोजनाची व्यवस्था करण्याची आवश्यकता नाही. तुला भोजन नियमित मिळेल. तू फक्त साधना कर.'' शेतकरी म्हणाला,

''नाही महाराज! जोपर्यंत मी आहे तोपर्यंत ब्रह्मचारीसाठी दर आठवड्याला अर्धा मण चणे मी पाठवित जाईन.''

असो, अशा प्रकारे पशुयोनीमध्ये सुद्धा काही आत्म्यांना पूर्ण ज्ञान असते. रामचरित-मानसमध्ये गोस्वामी तुलसीदासांनी कागभुशुंडि महाराजांबद्दल म्हटले आहे -

**सुधि मोहि नाथ जन्म बहु केरी।**
**सिव प्रसाद मति मोहँ न घेरी।।** (मानस १७/९५/१०)

महाराजजींना पशु-पक्ष्यांबद्दल अतिशय प्रेम वाटत असे. ते म्हणत जानकीनेही राघु-मैना पाळले होते-

**सुक सारिका जानकी ज्याये।**
**कनक पिंजरन्हि राखि पढ़ाये।।**
**ब्याकुल कहहिं कहाँ वैदेही।**
**सुनि धीरजु परिहरइ न केही।।** (मानस १/३३७/१-२)

सीतेने ज्या शुक-सारिकांना पाळले होते तीही शोकाकुल होऊन म्हणत होती- वैदेही कोठे गेली? सिया कोठे गेली?

**साधु आसाधु सदन सुक सारी।**
**सुमिरहिं राम देहिं गनि मारीं।।** (मानस १/६/१०)

सदाचारी माणसाने पाळलेला पोपट रामाचा जप करतो तर दुराचारी माणसाकडील पोपट अपशब्द बोलतो. महाराजांनीही एक मैना पाळलेली होती. त्यावेळी ब्रह्मचारीजी (धारकुंडी महाराज) गुरु महाराजांची सेवा करीत असत. ते महाराजांसाठी रोटी बनवित असत, आश्रमातील कचरा काढित असत. ब्रह्मचारींना पाहताच ती मैना डोळे पांढरे करून, पंजा काढून जोर-जोरात ओरडत असे व चिडत असे. ब्रह्मचारीजी तिला म्हणायचे की एके दिवशी मी तुझी मान मुरगळणार आहे. त्यावर ती ओरडायची व म्हणायची, ''महाराजजी! महाराजजी! ब्रह्मचारी म्हणतो की तुझी मानच मुरगळेन. त्यांना तुम्ही चांगला मार द्या.'' त्या मैनेला सर्व काही बोलता येत असे. महाराजजी

ब्रह्मचारींना म्हणायचे की गेल्या कोणत्यातरी जन्मी ती मैना तुझी बायको असावी. तू तिला सोडून पळून गेला असणार म्हणून ती तुझ्यावर नाराज असते. अशा प्रकारे ती मैना महाराजांचा विरंगुळा होती.

एक दिवशी ती मरण पावली. महाराजजी म्हणाले- ''हं! पिंजरा रिकामा झाला. प्रत्येक जीवाचे आयुष्य निश्चित असते. बिचारी मरून गेली. संतांच्या स्पर्श-सान्निध्याचा पशु-पक्ष्यांनाही काही लाभ होतो का नाही? इतके दिवस मी तिला माझ्या हातांनी खाऊ घातले, तिच्या पाठीवरून हात फिरविला, मांडीवर बसविले. साधूंच्या स्पर्शाचा ह्या जीवांना काही लाभ होतो का? कुठे गेली असेल आमची मैना?''

महाराजजींना अनुभवामध्ये दिसले की आश्रमापासून ७-८ कि.मी. दूर जंगलाजवळील सेमरिया गावात नवल पंडिताच्या घरी त्यांच्या कन्येच्या रुपात मैना जन्म घेईल. महाराजांनी दुसऱ्याच दिवशी त्या पंडिताला बोलावून विचारले, ''काय रे? तुला मुलगे किती?'' तो म्हणाला, ''चार मुलगे परंतु एकही मुलगी नाही. खूप इच्छा आहे की एखादी मुलगी असावी म्हणजे कन्यादानाचे पुण्य पदरात पडेल, असे म्हणतात की कन्यादानाशिवाय पित्याचे कल्याण होत नाही.'' महाराज म्हणाले, ''जा! आमची मैना तुझ्या घरी कन्येच्या रुपात जन्म घेईल.'' पंडित साष्टांग प्रणाम करीत म्हणाला, ''महाराजजी! सर्व काही पावले.''

नवल पंडिताच्या घरी कन्येचा जन्म झाला. तिचे नाव त्याने मैनाच ठेवले. त्या काळी बालविवाह होत असे. नवल पंडित मैनेच्या लग्नाचे आमंत्रण घेऊन महाराजजींकडे आला. मी ही तेथेच उभा होतो. तो म्हणाला, ''महाराजजी! आपल्या मैनेचे लग्न आहे. आपण चलावे व कृपया कन्यादान करावे.'' महाराजजी म्हणाले, ''नाही बेटा! आता ती मैना तुझी आहे. माझा संबंध केव्हाच संपला. मोठ्या थाटात तिचे लग्न कर व तिची पाठवणी कर''. महाराजजी म्हणत- बघा, एक सर्वसामान्य पक्षीण पण पंडिताच्या घरी जन्मली!

एकदा गुरु महाराजांनी एक कुत्रा पाळला होता. ज्याचे नाव होते 'भैरव'. जवळजवळ दहा इंच उंच व तीन फूट लांब, मजबूत असा चायनीज जातीचा तो कुत्रा होता. त्याचे पाय जेम तेम चार इंचाचे होते. तो टुकू-टुकू चालायचा तेव्हा पहावयास मजा यायची. तो बऱ्यापैकी चपळ होता व कोणत्याही कुत्र्याशी जाऊन भांडावयाचा. मोठ्या कुत्र्याच्या तर तो पायांखाली मावायचा परंतु तेथूनच तो त्याला चावायचा व पळवून लावायचा.

अनुसुइया आश्रमात एके ठिकाणी दरवाज्या ऐवजी शटर होते. त्या शटरजवळ तो कुत्रा रात्रंदिवस बसून असायचा. शटरला मध्य भागी एक फट होती. मध्य रात्री त्या फटीतून निसटून तो काही काळ जंगलात जायचा. गुरु महाराजांनी आम्हाला सांगितले की बरेच दिवस झाले हा कुत्रा रात्रीचा काही काळ जंगलात गायब होतो. जरा शोधून काढा की हा कोठे जातो?

एक दिवस कोणी तरी त्याला आश्रमापासून काही अंतरावर मांस खाताना बघितले. गुरु महाराजांनी विचारले, ''ह्याला मांस मिळते कोठून?'' लोकांनी पुन्हा त्याच्यावर पाळत ठेवून शोधून काढले व महाराजांना सांगितले की आश्रमाच्या मागे डोंगरावर एक वाघाची गुहा आहे. त्या गुहेतून हा मांस घेऊन येतो.

महाराजजी भडकले व म्हणाले - ''वाघाच्या गुहेत जातोस? कधी तरी वाघ गुहेत असला तर काय होईल? ह्याला वाईट सवय लागली आहे. एके दिवशी वाघ ह्यास पकडेल व मारून टाकेल.'' महाराजांनी भैरवची त्या दिवशी खूप पिटाई केली व म्हणाले- ''आता जाशील वाघाच्या गुहेत? संतांच्या संगतीत राहतोस तर अन्न खा, फलाहार कर, मांस कसले खातोस?'' त्यानंतर दहा दिवस तो गुहेपाशी गेला नाही, परंतु एक दिवस तो गायब झाला व परत आलाच नाही. महाराजजी म्हणाले- ''शोधून काढा, अजून तो मेलेला नाही, जिवंत आहे, कारण मला त्याचा श्वास ऐकू येत आहे. परंतु तो परत येत नाही आहे. कोठे आहे ते शोधून काढा.''

एकदा भल्या पहाटे डोंगराजवळील बागेच्या दिशेने जात असताना मला भैरव दिसला. डोंगराच्या वरच्या बाजूस असलेल्या झोपडीसमोर तो गपचूप

बसलेला होता. धारकुंडी महाराज त्या झोपडीत बसून साधना करीत असत. त्या दिवशी महाराज धारकुंडीला गेले होते व झोपडी रिकामी होती. मला पाहताच भैरव भुंकत माझ्याजवळ आला. माझ्या अजुबाजूला तो घुटमळत होता, जणू मला सांगत होता की झोपडीजवळ बसून मी राखण करीत आहे. मी गुरु महाराजांना येऊन सांगितले की भैरव लपून बसलेला आहे. आपल्याला घाबरून तो आश्रमात परत येत नाही. त्याला माफ करा. महाराजजी म्हणाले- ठीक आहे. आज त्याला माफ केले. परत त्याने जाता कामा नये.

त्याच दिवशी धारकुंडी महाराज गुरुमहाराजांच्या दर्शनास जीपने आलेले होते. मी गुरुमहाराजांना म्हणालो- ''मार खाऊनही वाघाच्या गुहेत जाण्याची भैरवची सवय अजून गेलेली नाही. ह्यास धारकुंडी महाराजांबरोबर पाठवून द्यावे. तेथील वाघाची गुहा ह्यास माहीत नाही. इथे राहिला तर एक दिवस ह्यास वाघ पकडेल. तेथे तो सुरक्षित राहील.'' त्यावर गुरुमहाराज काही बोलले नाहीत. धारकुंडी महाराज जावयास निघाले तेव्हा भैरवला उचलून आम्ही त्यांच्या जीपमध्ये टाकले.

जीप निघून जाताच गुरु महाराज म्हणाले- ''काय रे? भैरवला तू का पाठवून दिलेस? भैरव माझा विरंगुळा होता, छंद होता.'' मी म्हणालो- ''महाराजजी! त्यास गुहेत जायची सवय लागली होती, एखादे दिवशी वाघाने पकडले असते तर? आपणाला विचारले तर आपण काही बोलला नाहीत. आपले मौन परवानगी समजून मी त्याला गाडीत बसविले.''

गुरु महाराज मग गंभीर होऊन म्हणाले- ''इथे राहिला असता तर काय वाघाने खाल्ले असते? मी जिवंत असताना वाघाने खाल्ले असते का? व सहितानंदांची (स्वामी सच्चिदानंद) क्षमता आहे का त्याला वाघापासून वाचविण्याची?'' गुरु महाराजांनी आमची खूप कान उघाडणी केली, परंतु जीप तर निघून गेलेली होती.

ह्या घटनेनंतर जवळ जवळ एक वर्षाने स्वामी सच्चिदानंदांनी त्रिशूळ स्थापनदिनाच्या उत्सवाप्रित्यर्थ गुरुमहाराजांना धारकुंडीला बोलाविले.

गुरु महाराज तेथे गेले. आम्हीही त्यांच्याबरोबर होतो. तेथे जाताच भैरव कुत्रा महाराजांना बिलगला. आमच्या सर्वांच्याही जवळ आला. त्याला खूप आनंद झाला होता. त्रिशूळ स्थापनेच्या उत्सवात भंडाऱ्याचे आयोजन केलेले होते. स्थानिक भक्तांबरोबर गावातील काही कुत्रेही आलेले होते. भैरव त्या कुत्र्यांना पाहून भुंकत होता, गळ्यातील साखळी सोडविण्याचा प्रयत्न करीत होता. कोणीतरी त्याची साखळी सोडली. भैरव जोरजोरात भुंकत त्या कुत्र्यांवर तुटून पडला. ती कुत्री घाबरून पळून गेली. भैरव त्या कुत्र्यांना आश्रमाच्या परिसराच्या बाहेर पळवूनच परत आला. जमलेल्या लोकांना ह्या गोष्टीची मजा वाटत होती. ते लोक टाळ्या वाजवायचे व परत भैरवला बांधून ठेवायचे. कुत्रेही भैरवला पाहून पळून जायचे, त्यांना वाटायचे हा कोणता प्राणी आहे कोण जाणे?

एकदा असाच भैरव सुटला. एका कुत्र्याच्या पाठी धावत गेला व परत आलाच नाही. संध्याकाळ झाली व गुरुमहाराजांना निरोप देण्याची वेळ आली. महाराजांनी भैरवबद्दल विचारले. लोकांनी सांगितले- ''महाराजजी! तो तर साखळीसकट एका कुत्र्याचा पाठलाग करीत पळाला.'' महाराजांनी त्यास शोधावयास सांगितले. सर्वांनी जंगलात इकडे-तिकडे शोधले परंतु मिळाला नाही तेव्हा लोकांना वाटले की भैरव कुत्र्यांचा पाठलाग करीत-करीत गावात पोहोचला असेल. महाराज म्हणाले- ''बघा कोणा रानटी प्राण्याने त्यास खाल्ले तर नाही ना!''

गुरुमहाराज धारकुंडीहून परत निघाले. आश्रमापासून पाच-सहा किलोमीटरवर आश्रमाचीच एक बाग आहे. त्या बागेजवळ गाडी येताच एका वाघाने दहा फूट उंचावरून गाडीच्या एका बाजूकडून दुसऱ्या बाजूकडे उडी मारली. महाराज म्हणाले- ''ओह! हा आपल्याला सांगण्यास आला आहे की मी भैरवला खाल्ले. गेला आपला भैरव. ह्या वाघाने भैरवला खाल्ले.'' कोणाचा विश्वासच बसेना की जवळ जवळ दहा हजार लोकांच्या गर्दीत वाघाने भैरवला खाल्ले असेल.

धारकुंडी महाराजांनी भैरवचा खूप शोध घेतला. तीन दिवसानंतर वाघाच्या गुहेच्या समोर भैरवची साखळी व पायाचे हाड सापडले. त्यांनी गुरुमहाराजांना संदेश पाठविला की भैरवला वाघाने खाल्ले. आम्हाला लगेच गुरु महाराजांच्या शब्दांची आठवण झाली की सहितानंद भैरवला वाघापासून वाचवू शकणार आहे का? मी जिवंत असताना त्याला वाघ खाणार नाही.

वास्तविक आश्रम जंगलाजवळच असल्या कारणाने आश्रमात जेव्हा बरेच लोक जमत तेव्हा वन्य प्राणी जवळच दबा धरून बसत. कोणी एकटा-दुकटा लांबवर आला तर त्याला पकडून खायचे. भैरव असाच पकडला गेला. पळताना त्याची साखळी झुडपांत अडकली व वाघाने त्यास पकडले. गावातील कुत्र्यांच्या गळ्यात साखळी नसल्या कारणाने ते निसटले.

भैरवच्या मृत्यूने गुरुमहाराज उदास झाले होते. त्यांना त्याची आठवण येत असे. तो महाराजांच्या हातून दूध प्यायचा. तो दूध पीत नसे तेव्हा महाराज त्याच्या दुधाच्या वाडग्यात बत्तासा टाकायचे. मग तो थोडे दूध प्यायचा व परत तसाच बसून राहायचा. मग महाराज पुन्हा बत्तासा टाकायचे. दुध पिण्यासाठी त्याची खूप मनधरणी करावी लागायची.

भैरवच्या दुधाच्या वाडग्यात जवळजवळ दिड लिटर दूध मावायचे. जेव्हा तो ते दूध पीत नसे तेव्हा मंगलदादा नावाचे आश्रमात काम करणारे (गावच्या अहीर परीवारातील सदस्य) सेवक महाराजांना म्हणायचे, ''सरकार, हा काही आता दूध पिणार नाही, मीच तो वाडगा साफ करून टाकू का?'' व वाडगा उचलून ते दूध पिऊन टाकायचे.

आम्ही त्यांना चेष्टेने म्हणायचो की कुत्र्याचे उष्टे दूध प्यायले. परंतु ते अतिशय साधेपणाने म्हणायचे - 'स्वामीजी! कुत्र्या-माजरांचे उष्टे कधी अशुद्ध असते का?' अशा प्रकारे मंगलदादा हे एक वेगळेच व्यक्तिमत्त्व होते.

गुरु महाराज विचार करायचे की भैरव कोठे गेला असेल? कोणती गति त्यास प्राप्त झाली असेल? इतके दिवस मी त्यास खाऊ-पिऊ घातले, त्याच्यावरून हात फिरविला, माझ्या आसनावरही तो बसायचा, संतांच्या सान्निध्याचा प्राणिमात्रांना काही लाभ होतो का नाही?

एके दिवशी महाराजांना अनुभवामध्ये दिसले की एक देवदूत कार्यालयातील अनेक खुर्च्यांपैकी एका उंच खुर्चीकडे बोट दाखवून सांगत आहे- ''महाराज! तुमचा भैरव ह्या खुर्चीवर बसेल.'' महाराजांना दिसले की काही लोक खुर्च्यांवर बसले परंतु सर्वात उंच खुर्ची रिकामी होती. नंतर एक सावळी स्थूल व्यक्ति त्या खुर्चीवर येऊन बसली. देवदूताने महाराजांना सांगितले, ''हाच तुमचा भैरव. तुमच्या दर्शनाने व स्पर्शाने ह्यास मानवी शरीर प्राप्त झाले व तो मोठा पदाधिकारी झाला.'' महाराज प्रसन्न झाले व आम्हास म्हणाले, ''अहो आपला भैरव मोठा साहेब झाला. परमेश्वरानेच मला अनुभवामध्ये दाखविले.''

महात्म्यांच्या सान्निध्याने जीवांचे कल्याण होते. रामचरित मानसमध्ये म्हटले आहे -

**जड चेतन मग जीव घनेरे।**
**जे चितए प्रभु जिन्ह प्रभु हेरे।।**
**ते सब भये परम पद जोगू।**
**भरत दरस मेटा भव रोगू।।** (मानस २/२१६/१-२)

ज्या महापुरुषाच्या देहामध्ये परमेश्वर कार्य करतो, परमेश्वराच्या मार्गदर्शनाखाली जो साधना करीत असतो अशा महापुरुषाच्या दर्शनाने जीव परमपदाच्या योग्य होतो व त्यातही जो जीव साधनेस प्रवृत्त होतो, भावपूर्ण हृदयाने साधनेस प्रारंभ करतो (भाव म्हणजेच 'भरत') त्याची जन्ममृत्यूच्या चक्रातून मुक्ति होते. क्रमाक्रमाने विकास होत हे शक्य होते, परंतु तो पर्यंत पुनर्जन्माचा क्रम चालूच राहतो.

महाभारतातील एक गोष्ट आहे. कौरवांकडून नि:शस्त्र झालेल्या अभिमन्यूच्या हत्येची बातमी ऐकताच अर्जुन व्याकुळ झाला. भीमासहीत सर्व भावांना दोष देत तो म्हणाला, ''एका बालकाचे रक्षण तुम्हास करता आले नाही. काय उपयोग तुमच्या शौर्याचा?'' भीम म्हणाला - ''आम्ही प्रयत्नांची पराकाष्ठा केली, परंतु जयद्रथामुळे आम्ही चक्रव्यूहामध्ये प्रवेश

करू शकलो नाही.'' अर्जुन म्हणाला, ''ज्या जयद्रथाची मान पकडून तू भ्राताश्रींच्या चरणांवर त्यास घातले होतेस, ज्यास आपण दास बनविले होते, त्याच्यामध्ये इतकी शक्ति कोठून आली?''

श्रीकृष्णाने सांगितले की, जेव्हा युधिष्ठिराने जयद्रथाला दास्यत्वातून मुक्त केले, त्यानंतर त्याने शंकराची आराधना केली. शंकर प्रसन्न झाले व त्यास वर मागण्यास सांगितले. जयद्रथाने वर मागितला की मी पांडवांचा वध करू शकेन. शंकर म्हणाले पांडव अवध्य आहेत. भगवान श्रीकृष्णांचा वरदहस्त त्यांना लाभलेला आहे म्हणून ते सुरक्षित आहेत. त्यांना कोणीही मारणे शक्य नाही. हा! ज्या दिवशी रणांगणामध्ये अर्जुन नसेल त्या दिवशी इतर चार भावांना तू नामोहरम् करू शकशील. हे वरदान जयद्रथाला मिळाले होते व आज तोच दिवस होता. अर्जुन चिडून म्हणाला, ''जयद्रथ! तोच कारणीभूत आहे ह्या घटनेला. उद्या सूर्यास्तापर्यंत मी जयद्रथाचा वध नाही केला तर अग्नीप्रवेश करेन.''

श्रीकृष्ण अर्जुनास रागावून म्हणाला, ''तुम्ही भरतवंशीय न विचार करता का प्रतिज्ञा करता? प्रतिज्ञेपायीच भिष्म बाणांच्या शय्येवर पडलेले आहेत व आता तूही प्रतिज्ञा केलेली आहेस.'' अर्जुन म्हणाला, ''हे केशव! प्रतिज्ञा तर मी करून बसलो.'' श्रीकृष्ण म्हणाले, ''प्रतिज्ञा करण्यापूर्वी विचार करायचास. ह्या समस्येचे आणखी चांगल्या पद्धतीने निराकरण करता आले असते.'' अर्जुन म्हणाला, ''नाही केशव! आता माझी प्रतिज्ञा पूर्ण झाली पाहिजे. कृपया रथ रणांगणाकडे घेऊन चला.''

भगवान श्रीकृष्णांनी पाहिले की जयद्रथाचा वध करणे ह्या शुल्लक गोष्टीपायी अर्जुन हटून बसलेला आहे तेव्हा असा उपाय करूया की जेणेकरून जयद्रथ स्वतःच अर्जुनापाशी येईल. उगाच घोड्यांना कशाला धावायला लावू. दिवसाचा तिसरा प्रहर संपत आला होता. अर्जुन अत्यंत वेगाने कौरव सेनेचा विध्वंस करीत व एकीकडे सूर्याकडे पाहत पुढे जात होता. अकस्मात श्रीकृष्णाने रथ थांबविला. अर्जुनाने विचारले, ''भगवंत! काय झाले? रथ

का थांबविलात?'' श्रीकृष्ण म्हणाले ''पार्थ! घोडे दमले आहेत. त्यांना पाणी पाहिजे आहे व थोडी विश्रांती हवी आहे.'' अर्जुनाने बाणांचे रिंगण तयार केले, पाण्याची व्यवस्था केली व स्वत: रिंगणाचे रक्षण करीत उभा राहिला. दुर्योधनाने ते पाहिले व म्हणाले ''ज्याच्या पुत्रास आपण सात महारथींनी मिळून मारले तो अभिमन्यु तर रथावर होता. आज त्याचा पिता रथविहीन आहे. सर्वांनी मिळून त्यास मारा.'' पूर्ण कौरवसेना त्याच्यावर तुटून पडली. परंतु अर्जुनाने दिव्यास्त्रांचा उपयोग करून सर्वांची दाणा-दाण उडविली. थोड्या वेळात श्रीकृष्ण म्हणाले की रथ तयार आहे व युद्ध परत आरंभ झाले.

थोडे पुढे जाताच श्रीकृष्णाने रथ पुन्हा थांबविला. अर्जुनाने रथ थांबविण्याचे कारण विचारताच श्रीकृष्ण उदास होऊन म्हणाले, ''अर्जुना! सूर्य अस्ताला गेला.'' चिता रचली गेली व अर्जुन चितेवर बसला. वृक्षाची लाकडे एकमेकांवर घासून अग्नि प्रज्वलित करण्यासही सुरवात झाली. निराश झालेला अर्जुन श्रीकृष्णास उपहासाने बोलू लागला, ''मला म्हणाला होतात **'निमित्तमात्रं भव सव्यसाचिन।'** - अर्जुना! तू फक्त निमित्त मात्र हो. कर्ता-धर्ता मी आहे. विजय तुम्हालाच मिळेल. माझ्या द्वारा मारले गेलेल्यांना तू मार व यश मिळव. काम मी करेन, यश तू घे! माझ्या हातून मोठी चूक झाली की मी आपणावर विश्वास ठेवला.''

अर्जुनाच्या ह्या बोलण्याने श्रीकृष्णाची मान आणखीनच खाली गेली. शकुनीची खात्री पटली की अर्जुनरूपी काटा आता कायमचा दूर होणार. त्याने दुर्योधनास म्हटले- ''प्रिय भाच्या! ह्या गवळ्याकडे बघ, कसा मान खाली घालून उभा आहे. असे कर, जयद्रथालाही बोलाव. त्यालाही पाहू देत हे दृष्य. पुत्र प्राप्तिमध्ये जे सुख असते त्यापेक्षा हजारो पट सुख शत्रुला मरताना पाहण्यात असते.''

जयद्रथही त्या ठिकाणी आला व अर्जुनाला उपहासाने म्हणाला- ''गांडिवधारी अर्जुना! दिव्यास्त्र प्राप्त असलेल्या अर्जुना! द्रोणशिष्य अर्जुना! प्रतिज्ञा पूर्ण कर! लवकर अग्निप्रवेश कर. ह्या गवळ्याच्या जीवावर उड्या मारीत होतास ना?''

श्रीकृष्णाने पाहिले की जयद्रथ बरोबर नेम धरण्याच्या कक्षेत उभा आहे. त्याने अर्जुनास सांगितले- ''अर्जुना! तू हे ही विसरलास की शूरवीर चितारूढ कसे होतात? ज्या बाणाने शत्रुचा वध करावयाचा होता तो बाण धनुष्याला लावून, प्रत्यंचा खेचून, शत्रुकडे नेम धरून विरासनात चितारूढ व्हावयाचे असते'' कौरवांना खूप हसू आले, अर्जुन बिचारा अग्निप्रवेश करीत आहे व श्रीकृष्ण त्यास अगदी अंतिम काळापर्यंत उपदेश देत आहे.

अर्जुनालाही वाटले की मरायचेच आहे तेव्हा शवासन काय किंवा विरासन काय? परंतु लहानपणापासून तो परमेश्वराचा सेवक होता, आज्ञाधारक होता म्हणून त्याने श्रीकृष्णाच्या आदेशाचे पालन केले. अंत:प्रेरणेने अर्जुनाने नेम धरला. तेवढ्यात श्रीकृष्ण म्हणाले, ''अर्जुना! हा बघ सूर्य व हा जयद्रथ.'' सूर्य अस्तास गेलाच नव्हता केवळ ढगाआड लपलेला होता. अर्जुनाने बाण सोडला व जयद्रथाचा वध केला. अशा प्रकारे अर्जुनाची प्रतिज्ञा पूर्ण झाली, परंतु पुढे त्यास त्याचे परिणाम भोगावे लागले.

महाभारताचे युद्ध समाप्त झाले. एके दिवशी भगवान श्रीकृष्ण म्हणाले, '' अर्जुना! तुझ्या प्रमाणेच माझा आणखीही एक भक्त आहे. चल, तुला त्याचे दर्शन करवितो.'' अर्जुनास घेऊन श्रीकृष्ण राजा मोरध्वजाकडे आले. दोघांनीही साधुवेष धारण केलेला होता. हातात कमंडलू होता व बरोबर एक वाघही होता. संतांना आलेले पाहून राजा अतिशय प्रसन्न झाला. सादर प्रणाम करून म्हणाला, 'हे प्रभो! काय सेवा करू?'' साधु म्हणाले की आम्हाला फक्त भोजन दे व हा वाघही भोजन करेल. राजा म्हणाला की वधशाळेतून वाघाच्या आहाराची व्यवस्था करतो. त्यावर एक साधु म्हणाला की आमचा वाघ वधशाळेतील मांस खात नाही. तेव्हा तू तुझी स्वत:ची असलेली अशी वस्तु त्यास दे.

राजा म्हणाला मी माझे डोके कापून देतो. त्यावर साधुवेषातील श्रीकृष्ण म्हणाला, ''नाही तसे चालणार नाही. कारण तू मरण पावलास तर आमचे स्वागत कोण करील? आम्हास निरोप कोण देईल? असे कर, तू तुझा पुत्र दान कर.'' राजा म्हणाला की पुत्रावर अर्धा हक्क पित्याचा असतो तो तर

मी सोडला. उरलेला अर्धा हक्क मातेचा असतो तेव्हा महाराणी साहेबांची परवानगी घ्यावयास लागेल. महाराणी म्हणाली की आपण हक्क सोडलेला आहे तेव्हा मीही माझा हक्क सोडते. साधु म्हणाले की तुझ्या पुत्रालाही तो तयार आहे का ते विचार. पुत्र खूप प्रसन्न होऊन म्हणाला- 'माझे अहोभाग्य की माझे हे नश्वर शरीर माता-पित्यांच्या उपयोगास येत आहे.'

राजकुमाराचा वध मांगाने करणे बरोबर नाही. साधु वेषधारी श्रीकृष्ण म्हणाले, ''राजन्! हा वाघ केवळ डाव्या बाजूच्या अंगाचेच मास खातो. तुम्ही व महाराणी दोघांनी करवतीने राजकुमाराच्या शरीराचे दोन भाग करा.'' करवत हातात घेताच महाराणीच्या डोळ्यात अश्रु आले, शेवटी आईचे हृदय! अश्रू पाहून साधु म्हणाले, ''असे रडून दिलेली भिक्षा माझा वाघ ग्रहण करीत नाही.'' तेव्हा महाराणी म्हणाली, ''प्रभो! पुत्र तर नष्ट होणारच आहे परंतु आता धर्मही नष्ट होऊ पाहत आहे. तेव्हा अशी कृपा करावी की जेणेकरून माझे अश्रु जमिनीवर सांडणार नाहीत.'' अश्रुंना डोळ्यातच रोखून दोघांनी पुत्राचे दोन भाग केले. डावा भाग वाघाला अर्पण केला व उजवा भाग महालात पलंगावर ठेवला.

नंतर साधुंना भोजन दिले गेले. साधु म्हणाले की राजकुमारासाठीही पान वाढ. तेव्हा राजाने असे नाही विचारले की काही वेळापूर्वी तर त्याचा वध करावयास लावलात व आता पान वाढावयाला का सांगता? राजा निस्सीम भक्त होता. परमेश्वरावर त्याचा दृढ विश्वास होता. त्याने राजकुमाराचेही पान वाढले. साधुवेषातील श्रीकृष्ण राजास म्हणाला की, आता राजकुमारास हाक मार. हाक मारताच राजकुमार महालातील त्याच्या दालनातून बाहेर आला. करवतीचा स्पर्शही त्याच्या शरीरास झालेला दिसत नव्हता. पानावर येऊन तो बसला व साधुंबरोबर भोजन करू लागला. मात्र ह्या घटनेने साधुवेषातील अर्जुनाची तहान-भूक हरपली. चकित होऊन तो म्हणाला- हे प्रभो! आपणामध्ये इतकी क्षमता? ज्याचे अर्धे शरीर वाघाने खाल्ले आहे त्यालाही मी जिवंत झालेला पाहत आहे. मग तुम्ही माझ्या अभिमन्यूला का नाही जिवंत केलेत?

श्रीकृष्ण म्हणाले- ''अर्जुना! ह्यामध्ये माझा काहीही दोष नाही. तूच माझे ऐकण्यास तयार नव्हतास. धनुष्य सरसावून उभा होतास. मी तुला म्हटले होते की घाई करू नकोस, विचार कर, ह्यापेक्षाही काहितरी चांगला मार्ग सापडेल. परंतु तू प्रतिज्ञा पूर्ण करावी म्हणून हटून बसलास. मला रथ युद्धभूमीकडे नेण्यास सांगितलास. तुझी प्रतिज्ञा पूर्ण झाली. आता त्यामध्ये मी काय करणार?''

संत कबीरांनी साधकास सावधान करण्यासाठी म्हटले आहे -

**गुरु की आज्ञा लंघि के, जो नर कतहूँ जाय।**
**जहाँ जाय तहँ काल है, कह कबीर समुझाय॥**

सतगुरुंच्या आज्ञेचे उल्लंघन करून एखादा साधक वाटचाल करीत असेल, भले तो त्याच्या बुद्धिप्रमाणे सुरक्षित स्थळी जात असेल, वास्तविक बाणासारखा सरळ तो काळाच्या गर्तेत जात असतो.

अर्जुनाला पश्चात्ताप झाला की त्याच्या हातून मोठीच चूक झाली. पण आता त्यावर काही उपाय आहे का? श्रीकृष्ण म्हणाले, ''पार्था! त्या गोष्टीला आता खूप काळ लोटला आहे. अभिमन्यू आता जिवंत तर होऊ शकत नाही. परंतु तू त्यास पाहू शकतोस. अर्जुन म्हणाला - ''हे प्रभो! कृपा करून मला दाखवा माझा अभिमन्यू कोठे आहे ते.''

श्रीकृष्णाने रथ एका दिशेस फिरविला. एका दिव्य वायुचक्रातून रथ गेला व भव्य सिंहासनावर बसलेला अभिमन्यू अर्जुनास दिसला. त्यास पाहताच अर्जुनाच्या हातून परत चूक झाली. श्रीकृष्णाची अनुमती न घेताच तो अभिमन्यूकडे धावत गेला. श्रीकृष्णास हसू आले. अर्जुनाचे परमेश्वरावर प्रेम होते परंतु पुत्रमोह त्याहीपेक्षा अधिक होता. तो अभिमन्यूला हाक मारू लागला. अभिमन्यूने त्यास विचारले- ''आपण कोण आहात?'' अर्जुनाला वाटले की सात-सात महारथींनी केलेल्या भीषण प्रहारामुळे त्याची स्मृति नष्ट झाली असावी. जर त्याला त्याच्या आईचे नाव सांगितले तर तो कदाचित ओळखेल म्हणून अर्जुन म्हणाला- ''सुभद्रापुत्र अभिमन्यू! तू मला ओळखले

नाहीस का?'' अभिमन्यू म्हणाला, ''हे बघा, ना मी सुभद्रापुत्र आहे ना तुमचा पुत्र आहे. गेल्या सात जन्मी मी पिता व तुम्ही पुत्र होतात. केवळ एकदाच मागल्या जन्मी तुम्ही पिता व मी पुत्र होतो. गेल्या आठ जन्मांपासून हे चक्र चालत आलेले आहे व न जाणो आणखी किती जन्म चालत राहिले असते. भगवान श्रीकृष्णांच्या कृपेने मला स्वरूपाची प्राप्ति झालेली आहे. तुम्हीही त्यांचीच आराधना करा नाही तर आणखी हजारो जन्म 'माझा पुत्र! माझा पुत्र' म्हणत शोक करीत बसावे लागेल.'' अर्जुनाला वास्तविकतेचा बोध झाला. त्यास खेद वाटू लागला की ज्या पुत्रासाठी मी चितेवर चढलो तो गेल्या आठ जन्मांचा शत्रु निघाला व स्वत:च्या वाट्याला आलेले भोग पूर्ण करीत होता. पुत्रमोह हा मोहाचा अंतिम बिंदू असतो. अर्जुनाचा तो मोहही नष्ट झाला व त्या दिवसापासून अर्जुन चित्ताला सर्व बाजूंनी समेटून साधनेमध्ये प्रवृत्त झाला. झोपेमध्येसुद्धा त्याच्या श्वासामधून 'ओम्'चा ध्वनि प्रवाहित होऊ लागला. हनुमानसुद्धा ह्या स्थितीपर्यंत पोहोचलेले होते. मूर्च्छितावस्थेतही त्यांच्या मुखातून 'राम-राम' असा ध्वनि निघत असे. त्यांच्या रोमा-रोमामध्ये व हृदयामध्ये सदैव श्री राम विराजमान होते. संसारामध्ये असलेली माता, पिता, पत्नी, पुत्र इत्यादि सर्व नाती ही पुनर्जन्म व भोग ह्या गोष्टींवर आधारित आहेत. सृष्टि ह्या गोष्टींवरच टिकून आहे. आत्मे अनेक जन्मांपासून एकमेकांचा पाठलाग करीत असतात.

साधना चालू होती त्या काळात आम्हालाही असे अनेक अनुभव आले. गुरुमहाराजांना शरण आल्यानंतर एक-दीड वर्षांनी एकदा आम्ही आजारी पडलो होतो. महाराजांच्या धुनीजवळील कोठडीच्या दरवाजाच्या आतल्या बाजूस आम्ही पडलेलो होतो. डोळे उघडेच होते. डोक्याखाली उशीऐवजी तांदूळाचे पोते घेतले होते. आम्हाला दिसले की आमच्या आजुबाजूला नातलग व मित्र मिळून जवळ-जवळ पन्नास लोक उभे होते. त्या सर्वांचे हात एकाच वेळी आमच्या डोक्यावर आपटले व डोके फुटून गेले. त्या सर्वांनी डोक्यासकट पोत्यातील तांदूळ एकमेकांमध्ये वाटून घेतले व निघून गेले. आमचा श्वास बंद झाला. आम्हाला खूप त्रास झाला. आम्ही विचार केला की

डोके शाबूत आहे का नाही ते पाहूया. हात वर उचलून आम्ही डोक्याला स्पर्श केला तर डोके जसेच्या तसे होते. आम्ही उठून बसलो. खूप ताप आलेला होता. आम्हाला वाटले तापामुळे असे स्वप्न दिसले असेल. मग आम्ही परत झोपलो. भीति वाटत होती की ते लोक परत आले तर.

थोड्या वेळाने ते लोक परत दिसले. क्रेनने उचलले जावे तसे आमचे डोके परत वर उचलले जात होते. तांदूळासारख्या पांढऱ्या दिसणाऱ्या धान्याचा ढिगही होता. एकदम पन्नास हात आमच्या डोक्यावर आपटले व मानेसहित डोके गायब झाले. श्वास थांबला. तरीही आम्ही पाहू शकत होतो व विचारही करू शकत होतो. डोके कापून आपसात वाटून घेणाऱ्यांना आम्ही ओळखत होतो - एकीकडे काका होते तर दुसरीकडे आणखी कोणीतरी! सर्व नंतर निघून गेले. आम्ही परत आमचा हात वर उचलून डोके चाचपडून पाहिले तेव्हा आमच्यामध्ये चेतना परत आलेली आम्हाला जाणविली.

आमचे अवसान गळाले. आम्ही तेथून उठून गुरुमहाराजांकडे गेलो, प्रणाम केला व सांगितले- ''महाराजजी! आम्हाला असे स्वप्न पडत आहे की डोके कापले जात आहे व नातलगच ते कापून वाटून घेत आहेत. श्वास बंद पडत आहे. असे दोन वेळा दिसले.''

महाराज म्हणाले, ''बेटा! त्या लोकांचे कर्ज बाकी आहे. ऋण होते म्हणून तर तुला जन्म घेणे भाग पडले. ऋण बाकी होते म्हणून तर तुला ताप आला. हेच लोक तुला त्रास देत-देत तुझ्याकडून त्यांचे ऋण वसूल करीत आहेत. साधना वाढव म्हणजे ऋणही चुकते होईल व तापही येणार नाही. आम्ही म्हटले, ''महाराजजी! श्वास थांबलेला तसाच राहणार नाही नां?'' महाराजजी म्हणाले, ''नाही रे! ते लोक सूड घेत आहेत. धुनीला प्रणाम कर व विभूति खा.'' प्रणाम करून विभूति खाताच महाराजांनी मला एक चापटी मारली व म्हणाले, 'चल झाले, आता ते लोक तुला स्पर्शही करू शकणार नाहीत.'' त्यानंतर पुन्हा तसे दृश्य दिसले नाही. आम्हालाही खूप खेद वाटला की ज्यांच्यासाठी आपण कष्ट करीत होतो तेही आपला सूड घेत होते.

**रामचन्द्र के भजन बिनु, जो चह पद निर्बान।**
**ग्यानवंत अपि सो नर, पसु बिनु पूँछ विषान।।**

(रामचरित मानस ७/७८ क)

जो एका परमात्म्याच्या साधनेशिवाय कल्याण होईल अशी इच्छा धरतो, जो अन्य कोणत्याही मार्गाने परमपदाची प्राप्ति इच्छितो तो जणू शेपटी व शिंग नसलेला पशूच आहे. अशा माणसात व पशूमध्ये काहीही फरक नसतो. केवळ शेपटी व शिंग नाही अन्यथा तो बैलच! ह्यापेक्षा आणखी किती कठोर शब्दांत महापुरुषांनी सांगावे? ह्यापेक्षा आणखी कसे त्यांनी स्वजनांना समजवावे? पुढे म्हटले आहे,

**बारि मथे घृत होय बरू, सिकता ते बरू तेल।**
**बिन हरि भजन न भव तरिअ, यह सिद्धान्त अपेल।।**

(मानस, ७/१२२ क)

वाळू रगडल्यावर भले तेल निघेल, पाणी घुसळल्यावर भले लोणी निघेल, ह्या असंभव गोष्टीही कदाचित संभव होतील परंतु **'बिन हरि भजन न भव तरिअ'** - एक मात्र परमेश्वराच्या साधनेशिवाय कोणीही भवसागर पार करू शकत नाही - हे अबाधित सत्य आहे. भव म्हणजे जन्म! हा पुनर्जन्मवाद नाही तर काय आहे? एक ईश्वरवाद नाही तर काय आहे?

आपणा सर्वांचे आदिशास्त्र असलेल्या गीतेमध्ये भगवंत म्हणतात - विधाता व त्याच्यापासून उत्पन्न झालेली सृष्टि नश्वर आहे. अर्जुना! योग्य वेळ येताच ब्रह्माही आपल्या लोकासहित म्हणजेच शरीरासहित शांत होतो. दिति-आदितीची मुले - दानव, देवता, मानव इत्यादि सर्व पुनरावर्ति स्वरूपाचे आहेत, परंतु अर्जुना! माझा भक्त कधी नष्ट होत नाही. तो कायम राहणारे जीवन, सतत टिकणारी शांति व मोक्ष प्राप्त करतो. असो, तेव्हा साधना एका परमात्म्याची केली पाहिजे - हा गीतेचा संदेश आहे.

गीतेनुसार त्या परमात्म्यास प्राप्त करण्याचा एक निर्धारित विधि आहे, त्या साधनेची एक विशिष्ट पद्धत आहे, ज्याचे नाव आहे 'योगविधि',

त्यास गीतेमध्ये भगवान श्रीकृष्णांनी 'यज्ञ' म्हटले आहे. ह्या यज्ञामध्ये अग्नि प्रज्वलित केला जात नाही किंवा त्यात तीळ, जव, तूप इत्यादींचे हवनही केले जात नाही. श्वास-प्रश्वासाचे हवन करणे, इंद्रियांच्या बहिर्मुखी प्रवाहास संयमित करणे- **'संयमाग्निषु जुह्वति'** असे ह्या साधनेचे चित्रण केलेले आहे. ज्ञानाग्नि, योगाग्नि, ब्रह्माग्नि, इंद्रियाग्नि इत्यादि बऱ्याच अग्नींचा उल्लेख गीतेच्या चौथ्या अध्यायात केलेला आहे. ह्या सर्वांचा आशय एकच की चहुबाजूंनी चित्तवृत्तींना एकत्रित करून परमात्म्याकडे उन्मुख करणे व चिंतन करीत धारावाहिक श्वास-प्रश्वासाचे यजन करणे.

प्राणांचा व्यापार जेव्हा संथ होतो म्हणजेच जेव्हा खळबळ होणे, संकल्प करणे, परत-परत विचार करणे, निर्णय घेणे इत्यादि अंतःकरणातील क्रिया संथ गतीने चालतात तेव्हा प्राणांच्या व्यापाराला विराम लागतो. ह्या अवस्थेस प्राणायाम असे म्हणतात. प्राणायाम साध्य होताच यज्ञाचे फळ दिसून येते. जेव्हा मनात (अतःकरणात) कोणताही चंचलपणा वा संकल्प नसतो, तेव्हा तीच मनाची निरोधावस्था असते, कारण संकल्पाचेच दुसरे नाव 'मन' होय. संकल्प-विकल्प शांत होणे ह्याचा अर्थ मनाला स्थैर्य येणे. मन विलीन होताच यज्ञाचे फळ म्हणजे सनातन ब्रह्मामध्ये स्थिति व अमृताची प्राप्ति होते.

**यज्ञशिष्टामृतभुजो यांन्ति ब्रह्म सनातनम्।।** (गीता ४/३१)

ज्या क्षणी मनाची निरोधावस्था साध्य होते त्या क्षणी यज्ञ करून जे शेष राहते ते (चार पोती गहू वा दहा डबे तूप अशा भौतिक गोष्टी नसून) अमृत असते - मृत्यूच्या पलिकडे जो अमृत तत्त्वरूपी आत्मा आहे त्याचे प्रत्यक्ष दर्शन होते व त्यास जाणणे शक्य होते. साक्षात्कारामुळे मिळणाऱ्या ह्याच जाणीवेस 'ज्ञान' असे म्हणतात. त्या ज्ञानामृताचे सेवन करणारा योगी सनातन ब्रह्मामध्ये स्थिति, सदा रहाणारे जीवन, शाश्वत शांति व मोक्ष प्राप्त करतो. म्हणून योगविधि म्हणजेच यज्ञ होय व ह्या यज्ञास कार्यान्वित करणे म्हणजे कर्म होय. कर्म म्हणजे आराधना. अशा प्रकारे गीतेमध्ये निर्धारित कर्माचा आशय आहे 'चिंतन'.

ह्या आराधनात्मक कर्मास प्रोत्साहन देत भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनास समजाविले की एकाच कर्म-पथाचे पालन दोन पद्धतीने करता येते - ज्ञानयोग ज्यास सांख्ययोग असेही म्हणतात व कर्मयोग ज्यास निष्काम कर्मयोग म्हणजेच भक्तियोग असेही म्हणतात. ज्ञानयोगी स्वत:ची योग्यता आजमावित मार्गक्रमण करीत असतो की आज मला अमूक स्थिति प्राप्त झाली आहे, पुढे हा स्तर मला प्राप्त होईल व शेवटी मी परमात्म्याचे स्वरूप प्राप्त करेन जे माझेच स्वरूप असेल. अशा प्रकारची जाणीव ठेवत जे स्वावलंबी होऊन मार्गक्रमण करतात ते ज्ञानमार्गी होत. त्यांना मार्गामध्ये दोन प्रकारचे फळ प्राप्त होते-

**हतो वा प्राप्स्यसि स्वर्ग जित्वा वा भोक्ष्से महीम्।।** (गीता २/३७)

अर्जुना! ह्या युद्धामध्ये जर तू विजयी झालास तर तुला महामहिम स्थिति प्राप्त होईल व हरलास तर देवत्व अर्थात दैवी संपदा तरी नक्कीच धारण करशील. दोन्ही बाजूंना तुझा फायदाच आहे. अशा प्रकारे ज्ञानयोगामध्ये प्राप्त होणाऱ्या फळांबद्दल सांगितले आहे.

त्यानंतर भगवंतांनी सांगितले की ह्याच साधनेस आता तू निष्काम कर्मयोगास लागणाऱ्या बुद्धीने ऐक, ज्या बुद्धीने युक्त होऊन तू कर्म-बंधनाचा चांगल्या प्रकारे नाश करू शकशील, कर्म-बंधनातून मुक्तता मिळेल व हेच निष्काम कर्म-योगाचे पहिले फळ आहे. ह्याच्या दुसऱ्या फळाबद्दल भगवंत म्हणतात-

**नेहाभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते।।** (गीता २/४०)

अर्जुना! ह्या निष्काम कर्मयोगामध्ये आरंभाचा नाश होत नाही. ह्या साधनेमध्ये दोन पावले पुढे चाललास तर पुढच्या जन्मी आधी ज्या स्तरापर्यंत साधना झालेली असते त्या स्तरापासून पुढे चालू होते. विषयांमध्ये आकंठ बुडालेला असलास तरी मागल्या जन्मी ज्या स्तरापर्यंत साधना झालेली असते, विनासायास त्या बृद्धि-संयोगास प्राप्त करून, साधना त्याच स्तरापासून पुढे आरंभ होते व काही एक जन्मांच्या कालावधीनंतर क्रमश: तेथेच पोहोचवते ज्यास 'परमगति' म्हणतात. ह्या निष्काम कर्मयोगात आरंभाचा नाश होत

नाही, हे दुसरे फळ होय. पुढे तिसरे फळ असे सांगितले आहे की, निष्काम कर्मयोगामध्ये मर्यादित कर्मफळाचा दोष नसतो म्हणूनच स्वर्गाचे प्रलोभन दाखवून वा रिद्धि सिद्धींमध्ये अडकवून तुम्ही केलेला अभ्यास नष्ट केला जात नाही. म्हणून ह्या कर्मरुपी धर्माचा स्वल्प अभ्यासही जन्म-मरणाच्या महान भयातून आपला उद्धार करणारा असतो. ह्याच्या थोड्याशा अभ्यासानेही भले, आज मोक्ष मिळाला नाही तरी मोक्षाचे आरक्षण हमखास होते. प्रकृतीमध्ये इतकी क्षमता नसते की ती तुमची साधना नष्ट करेल. प्रकृती केवळ आवरण घालू शकते, साधना नष्ट करू शकत नाही. शेवटी भगवंताने सांगितले की कोणतेही कर्म करणे म्हणजे गीतोक्त कर्म नव्हे -

**व्यवसायात्मिका बुद्धिरेकेह कुरुन्दन ।**
**बहुशाखा ह्यनन्ताश्च बुद्धोयोऽव्यवसायिनाम् ।।** (गीता २/४१)

अर्जुना! ह्या निष्काम कर्मयोगामध्ये एकच बुद्धि आहे व एकच निर्धारित क्रिया आहे. काहीही करणे म्हणजे कर्म नव्हे. पुढे स्पष्ट केले आहे की **'यज्ञार्थात्कर्मणो...'** यज्ञास कार्यरूप देणे म्हणजे कर्म होय. स्वाभाविकपणे प्रश्न पडतो की जे बऱ्याच क्रिया करतात ते साधना करीत नाहीत का? भगवंत म्हणतात- अर्जुना! नाही, ते साधना करीत नाहीत. अविवेकी लोकांच्या बुद्धीला अनंत फाटे फुटलेले असतात. त्यामुळे ते अनंत क्रिया निर्माण करतात, ज्याप्रमाणे मनात कल्पनेचे तरंग उठतील त्याप्रमाणे ते क्रिया रचतात. ते स्वर्गालाच सर्वोच्च मानणाऱ्या (काही ग्रंथांमध्ये स्वर्ग व नरकाचे चित्रण केलेले आहे.) व ज्यामध्ये कर्म फळाची प्रशंसा केली आहे अशा वेदांमधील वचनांमध्ये ते अनुरक्त राहतात. त्यास दिखाऊ शोभायुक्त वाणीच्या आधाराने ते व्यक्तही करतात. त्यांच्या वाणीची छाप ज्यांच्या-ज्यांच्या चित्तावर पडते, त्यांचीही बुद्धि नष्ट होते व त्यांना काहीही प्राप्त होत नाही.

अर्जुना! असे लोक जन्म व मृत्यू, पुन्हा जन्म व मृत्यू अशा अनंत फळास प्राप्त होतात. म्हणजेच अन्य मार्गांनी साधना करणाऱ्यांचे कधीही कल्याण होत नाही, जन्म-मरणाच्या चक्रात ते भटकत राहतात.

सारांश, निष्काम कर्मयोगाच्या प्रभावाने जन्म-मरणाच्या चक्रातून मुक्तता होते. अशा प्रकारे येथे जन्म-मरणाचे चक्र, मुक्ति, जन्म-मृत्युरूपी अनंत फल ह्यांचा उल्लेख केलेला आहे. ह्यालाच पुनर्जन्म म्हणतात.

भगवान श्रीकृष्णांनी गीतेमध्ये म्हटले आहे - अर्जुना! मी हा अविनाशी योग आरंभी सूर्याला सांगितला, सूर्याने महाराज मनुला सांगितला. मनुपासून जन्मल्यामुळे आपल्याला 'मनुज' म्हटले जाते. सृष्टीतील सर्व मानव हे मनुच्या औरस पुत्रांच्या वंश परंपरेतील आहेत. पृथ्वीच्या उत्तर गोलार्धात, दक्षिण गोलार्धात सर्वत्र मनुचीच संतति आहे. मनु आदिपुरुष होते व त्यांच्यापासून जन्मल्यामुळे आपणास 'आदमी' म्हटले जाते. आदि हा शब्द संस्कृतमधील आहे- जसे 'त्वमादिदेवः...' इत्यादि. थंड प्रदेशातील मनुष्यांचा रंग गोरा झाला, उष्ण कटिबंधातील मनुच्या पुत्रांचा रंग काळा झाला तर भारतासारख्या समशीतोष्ण देशात निवास करणाऱ्यांचा रंग गव्हाळ झाला. ही तर हवामानाची देणगी आहे, वेगळ्या जाती नव्हेत. वाळवंटातील मेंढ्यांचा रंग पिवळा असतो तर हिरवे गवत खाणाऱ्या मेंढ्यांचा रंग हिरवा होतो. अशा प्रकारे सर्व मानव मनुच्या वंश परंपरेतील आहेत.

सूर्याने तोच अनिवाशी योग मनुला सांगितला व मनुकडून क्रमशः इक्ष्वाकु व इतर राजर्षींनी जाणला. त्या महत्वपूर्ण काळानंतर हा अविनाशी योग पृथ्वीतलावरून लुप्त झाला. योग अविनाशी आहे त्यामुळे त्याचा विनाश तर होऊ शकत नाही, फक्त मनुष्याच्या चित्तातून विस्मृत झाला. तोच पुरातन योग अर्जुना मी तुला सांगत आहे.

अर्जुनाला आश्चर्य वाटले. तो म्हणाला - भगवंत! आपला जन्म तर वर्तमान काळात झाला व सूर्याचा जन्म तर बराच आधी झालेला आहे. तेव्हा आरंभी आपणच हे ज्ञान सूर्याला सांगितलेत ह्यावर मी कसा विश्वास ठेऊ? त्यावर भगवंत म्हणाले-

**बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तव चार्जुन।**<br>**तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परन्तप।।** (गीता ४/५)

परंतप अर्जुना! माझे व तुझे बरेच जन्म होऊन गेले. त्या सर्वांना तू जाणत नाहीस परंतु मी जाणतो. असो, पुनर्जन्माचे रहस्य सर्वांना जाणणे शक्य नसते पण योगेश्वर, ते रहस्य जाणतात, त्यांच्यापासून काहीही लपत नाही व एखाद्याला त्याचा बोधही करून देऊ शकतात. पुनर्जन्म अनिवार्य आहे.

कुरुक्षेत्रावरील रणांगणात समोरचे सैन्य पहाताच विचलित झालेला अर्जुन धनुष्य बाणाचा त्याग करून रथाच्या मागील बाजूस गलितगात्र होऊन खाली पडला. तो म्हणाला - हे गोविंद! मी हे युद्ध करणार नाही. ह्यामुळे सनातन धर्म लोप पावेल. **'कुलमर्धः सनातनाः'**, **'जातिधर्माः कुलधर्माश्च शाश्वताः'** - जातिधर्म, कुलधर्म हेच शाश्वत धर्म आहेत. त्यांचा लोप होईल. पिंडोदक क्रिया, वर्णसंकर व पाप-पुण्य ह्या गोष्टींबद्दल त्याला काळजी वाटू लागली. भगवंत म्हणाले - हे अज्ञान तुझ्या ठिकाणी कोठून उत्पन्न झाले? कोणत्याही गोष्टीला सनातन म्हटले की ती खरच सनातन होते का? ना हे कृत्य कीर्ति वाढविणारे आहे, ना कल्याण करणारे व ना त्याचे आचरण चुकूनही कोणा वरिष्ठ महापुरुषांनी केलेले आहे. **'अनार्यजुष्टम्'** - हे अनार्यांसारखे आचरण तू कोठून शिकलास?

अर्जुनाची मनःस्थिती द्विधा झाली. जन्मभर ज्या गोष्टींचे त्याने अनुसरण केले त्यास श्रीकृष्णांनी अज्ञान म्हटले. त्याने भगवंतांना सादर प्रणाम केला. शिष्यभावाने समर्पित झाला व म्हणाला- हे केशवा! जर हे सर्व अज्ञान आहे तर ह्यापेक्षा अधिक मी काहीही जाणत नाही. भगवंत! तेव्हा आपणच सांगा की सत्य काय आहे की ज्यामुळे मला परमश्रेयाची प्राप्ति होईल. त्यावर भगवंत म्हणाले-

**नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः।**
**उभयोरपि दृष्टोऽन्तस्त्वनयोस्तत्त्वदर्शिभिः॥** (गीता २/१६)

अर्जुना! सत्य वस्तूचा तिनही काळांमध्ये अभाव नसतो, त्यास नष्ट करता येत नाही व असत्याला अस्तित्व नसते. त्यास थांबविताही येत नाही. असे हे सत्य कोणते? अर्जुना! हा आत्माच ते सत्य आहे, शाश्वत

आहे, अमृततत्व आहे, काळाच्या पलिकडे असलेला अकाल पुरुष आहे, अपरिवर्तनशील व सनातन आहे. आपण कोण आहोत? सनातनधर्मी. सनातन कोण आहे? आत्मा. तेव्हा जर आपण आत्म्याची जागृति करण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील नसाल तर आपणास सनातनधर्मीही म्हणता येणार नाही. आपण आहात सत्यशोधक. सत्य केवळ आत्मा आहे. जर आत्म्याच्या ठिकाणी तुमची श्रद्धा नसेल तर तुम्ही कसले सत्याचे पुजारी?

आत्मा, परमात्मा, ईश्वर, ब्रह्म इत्यादि एकाच परमात्म्याची विविध दृष्टिकोनांमधून ठेवलेली नावे आहेत. तो सर्वांच्या हृदयात म्हणजेच अंत:करणात सदा निवास करतो म्हणून त्यास आत्मा म्हटले जाते. सर्व ठिकाणी असूनही सर्वांपासून अलिप्त असतो म्हणून परमात्मा, सर्व विभूतींनी युक्त असतो म्हणून विभु, सर्वांचे भरण-पोषण करतो म्हणून प्रभु, सर्वत्र व्यापलेला आहे, बृहद् आहे म्हणून ब्रह्म. जन्मभर आपण असेच नामकरण करीत राहतो परंतु त्या परमेश्वराचे संपूर्ण नाव एकही नाही. ही सर्व नावे म्हणजे विविध दृष्टिकोनांमधून परमात्म्याच्या विभूतींचे केलेले वर्णन आहे.

अशा प्रकारे आत्माच सनातन आहे व प्राणिमात्रांचे शरीर नाशिवंत आहे म्हणून तू युद्ध कर. अर्जुन म्हणाला होता की तो युद्ध करणार नाही. म्हणून संपूर्ण गीतेत एकच कारण सांगितले आहे की शरीर नाशिवंत आहे म्हणून अर्जुना, तू युद्ध कर. आता असा प्रश्न पडतो की जर मारल्याने शरीर नष्ट होते तर पांडवांचे शरीर अविनाशी होते का? दोन्ही बाजूला पांडवांचे भाऊबंध, नातलगच तर होते व सर्व शरीरधारीच होते. जेथे शरीर दिसेल तेथे बाण चालव! कारण शरीर नाशिवंत असते. ह्या आदेशावरून हे स्पष्ट होत नाही की पांडव पक्षातील योद्ध्यांवर बाण चालवावयाचा नाही. दोन्हीबाजूस शरीरेच तर होती.

मारण्याने शरीर नष्ट होत नाही. गीतेत भगवंत म्हणतात-

**वासांसि जीर्णानि यथा विहाय**
**नवानि गृह्णाति नरोऽपराणि।**

**तथा शरीराणि विहाय जीर्णा,**

**न्यन्यानि संयाति नवानि देही।।** (गीता २/२२)

ज्याप्रमाणे जीर्ण झालेल्या वस्त्राचा त्याग करून मनुष्य नवीन वस्त्र धारण करतो त्याचप्रमाणे प्राणिमात्रांचा स्वामी असा हा आत्मा जीर्ण शरीररूपी वस्त्राचा त्याग करून दुसरे नवीन शरीररूपी वस्त्र धारण करतो. जेव्हा एक शरीररूपी वस्त्र त्यागले जाते तेव्हा दुसरे शरीर तयार असते. वृद्धावस्थेतील अशक्त, सुरकुतलेले शरीर त्यागताच लहान बालकाचे बागडणारे शरीर प्राप्त होते. जीर्ण शरीराचे परिवर्तन होते तर मग काही अजाण बालके का मृत्युमुखी पडतात? त्या शरीराचा विकास तर अजून व्हावयाचा असतो. वास्तविक संस्कार ही शरीराची जीवनशक्ति आहे ज्याच्या आधारावर हे शरीर टिकून असते. संस्कार जर दोन दिवसांचा असेल तर तेवढ्याच कालावधीत शरीर जीर्ण होऊन जाते.

पुज्य गुरु महाराजांनी त्यांच्या जीवनातील एक घटना सांगितली होती. गृहत्याग केल्यानंतर महाराजजी अयोध्या येथील उत्तर मनकापूर ह्या ठिकाणच्या मधवापूर गावाजवळ निराधार विचरण करीत होते. परमेश्वराने आदेश दिला की तेथेच चातुर्मासाचे पालन करावे. संत-महात्मे वर्षातील चार महिन्यांचा काळ एकाच ठिकाणी वास्तव्य करून साधनेमध्ये व्यतीत करतात त्यास चार्तुमास म्हणतात. महाराजजी तेथे एका बेलाच्या झाडाखाली ध्यानास बसले.

संध्याकाळी जंगलालगतच्या रस्त्यावरून ध्यान मुद्रेतच महाराजजी फिरावयास जात असत. रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला ठाकुर राम पदारथ सिंह याचे घर होते. संतांबद्दल त्याना खूप आदर होता. त्या घराच्या समोरून जाताना महाराजजींना असे वाटायचे की जणू ते त्यांचेच घर आहे. त्या घराबद्दल मनात खूप आकर्षण वाटायचे, पटकन घराच्या अंगणात जावेसे वाटायचे. महाराजजी विचार करायचे की असे वाटण्याचे कारण काय असावे? ते भराभर चालत पुढे जायचे. त्या वातावरणातून बाहेर पडताच ते सर्व संकल्प समाप्त व्हायचे.

दोन-चार दिवसानंतर महाराजजी पुन्हा त्या रस्त्यावरून जात होते. जसे ते घर जवळ आले तसे परत तेच विचार मनात यावयास लागले की घर आपलेच आहे, पटकन घरात जावे. महाराजजींनी परमेश्वराला विचारले - प्रभो! त्या घराच्या जवळ येताच इतके आकर्षण का वाटते? ध्यानामध्ये मग्न होऊन चालत असलो तरी न चुकता पाय त्या घरापाशी का घुटमळतात? परमेश्वराने सांगितले की तुझा आधीचा जन्म ह्याच घरात झाला होता. त्या जन्मी तू फक्त अडीच महिने जिवंत होतास कारण तेवढाच संस्कार होता. तो संपताच शरीर सुटले. तुला जन्म देणारी माता अजूनही जिवंत आहे.

दुसऱ्या दिवशी प्रात:काळी भाविक व श्रद्धाळू लोक महाराजांच्या दर्शनाला व सत्संगासाठी येऊ लागले. महाराजांनी त्या लोकांकडे विचारपूस केली की रस्त्याच्या बाजूस असलेल्या घरात दोन अडीच महिन्यांचा बालक कधी मरण पावला होता का? हे कळताच त्या घरातील सर्व सदस्य महाराजजींकडे आले. त्या बालकाची वृद्ध माताही आली. ती रडत सांगू लागली - महाराजजी! इतके छान, सुंदर बालक होते माझे. दैवाने त्यास माझ्यापासून हिरावून घेतले. त्यानंतर मला संततीही झाली नाही. परिवारातील सर्वजण खिन्न होऊन बसले होते. परंतु महाराजांनी त्यांना सांगितले नाही की ते स्वत:च मागल्या जन्मी त्या मातेचे बालक होते. तसे सांगितले असते तर नवीनच आपत्ति ओढवली असती, उगाचच नवीन ऋणानुबंध जोडले गेले असते. काही संस्कार शिल्लक होते म्हणून महाराजजींना काही दिवसांसाठी तेथे राहावे लागले. ह्या घटनेवरून प्रेरणा घेऊन महाराजजी आणखी दृढतेने साधना करू लागले. न जाणो कोठे-कोठे भटकत हा जीवात्मा शरीरांची यात्रा करीत आलेला आहे. ह्या शरीराने न जाणो किती मातांना रडविले आहे, तेव्हा आता अशी साधना केली पाहिजे की पुन्हा शरीर धारण करण्यास लागता कामा नये.

भगवान श्रीकृष्ण म्हणतात-

**ममैवांशो जीवलोके जीवभूत: सनातन:।**
**मन:षष्ठानीन्द्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति।।** (गीता १५/७)

अर्जुना! ह्या देहामधील जीवात्मा माझा सनातन अंश आहे. तो तितकाच पवित्र आहे जितके स्वयं भगवंत पवित्र आहेत. मनासहित इंद्रियांच्या क्रियाकर्मांची छाप घेऊन आत्मा एक शरीर त्यागतो व त्याच क्षणी नवीन शरीर धारण करतो. ह्या शरीर परिवर्तनामध्ये नरकासारखा असा कोणताही खड्डा नसतो ज्यामध्ये पूर्वज पडलेले आहेत व त्यांना भोजन देण्याची जबाबदारी त्यांच्या भावी पिढीच्या डोक्यावर आहे. अर्जुन हेच म्हणाला होता की पिंडोदक क्रिया लुप्त होतील; परंतु भगवंत म्हणतात की हे अज्ञान तुझ्याठायी कोठून उत्पन्न झाले. जीवात्मा एका शरीराचा त्याग करून दूसरे शरीर धारण करतो. त्या नवीन शरीरात मनासहित पाचही इंद्रियांच्या माध्यमातून तो पुन्हा विषयांमध्ये प्रवृत्त होतो. हे रहस्य उलगडताना योगेश्वर श्रीकृष्ण म्हणतात-

**उत्क्रामन्तं स्थितं वापि भुञ्जानं वा गुणान्वितम्।**
**विमूढा नानुपश्यन्ति पश्यन्ति ज्ञानचक्षुषः।।**

(गीता १५/१०)

शरीर सोडून जाणाऱ्या, पुन्हा नवीन शरीर धारण करणाऱ्या व पुन्हा विषयांमध्ये प्रवृत्त होणाऱ्या जीवात्म्यास '**विमूढा नानुपश्यन्ति**'- मूढलोक जाणू शकत नाहीत; '**पश्यन्ति ज्ञान चक्षुषः**'- ज्ञानरुपी नेत्र असणारे चांगल्या प्रकारे जाणतात की कोठे काय बदल झाला, काय मिळाले. आमच्या गुरुमहाराजांकडे ज्ञानरूपी चक्षू होते म्हणून त्यांना पूर्वजन्मीच्या घटना स्पष्टपणे दिसल्या. सामान्य लोक हे समजू शकत नाहीत की पुनर्जन्म असतो की नाही. ही अनुभवाची गोष्ट आहे. कोणी तर्काने, गणिताच्या सहाय्याने वा ज्योतिषशास्त्राच्या सहाय्याने ह्याचे अनुमान लावू शकत नाही. क्षूद्र बुद्धीमध्ये एवढी क्षमता कोठे आहे? मन, बुद्धि, चित्त, अहंकार व इंद्रिये ही शरीराची केवळ यंत्रे आहेत. केवळ प्रकृति पर्यंत मर्यादित आहेत- '**गो गोचर जहँ लगि मन जाई। सो सब माया जानेहु भाई।।**' इंद्रिये व इंद्रियांच्या विषयांमध्ये मन जेथपर्यंत भरकटते, ती सर्व माया आहे. बुद्धि निर्णय घेते ती ही मायाच आहे. कितीही सूक्ष्म निर्णय असला तरी तो प्रकृतीच्या कक्षेतलाच छोटा-मोठा निर्णय

असतो, ते सत्य कधीही नसते. अंध:कारामध्ये सापडलेली व्यक्ति केवळ अनुमान लावू शकते. त्या सत्यास **'पश्यन्ति ज्ञान चक्षुषः'** - ज्ञानरूपी दृष्टि असणारेच प्रत्यक्ष पाहू शकतात की ते आधी कोण होते, आता काय आहेत व भविष्यात काय होतील? किती संस्कार नष्ट झालेले आहेत, अजून किती बाकी आहेत व मोक्ष प्राप्ति कधी होईल? योग-साधनेचा विशिष्ट स्तर येताच आपणालाही पूर्वजन्माचे ज्ञान प्राप्त होईल की तो का व कसा होतो? भगवंत म्हणतात -

**अन्तकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम्।**
**यः प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशयः॥** (गीता ८/५)

अंतकाळी जो माझे स्मरण करीत शरीराचा त्याग करतो, तो माझ्या अविनाशी स्वरूपास प्राप्त होतो, जेथून तो परत मागे जन्म-मरणाच्या फेऱ्यांमध्ये भटकत नाही. (ह्या स्तरावर जन्म-मरणाचे फेरे संपतात.) तो माझ्या सहज स्वरूपास प्राप्त होतो. परंतु अंतिम क्षणी परमेश्वराचे स्मरण झाले नाही, कोणत्या दुसऱ्या गोष्टीचे झाले तर काय होते? ह्यावर म्हणतात-

**यं यं वापि स्मरन्भावं त्यजत्यन्ते कलेवरम्।**
**तं तमेवैति कौन्तेय सदा तद्भावभावितः॥** (गीता ८/६)

अर्जुना! जो ज्या वस्तूचे, ज्या भावाचे स्मरण करीत शरीर त्यागतो त्याला तीच योनि प्राप्त होते. (ह्यावरून स्पष्ट होते की नवीन शरीर धारण करावयास माता-पित्याच्या गुणसुत्रांची (जीन्स्‌ची) आवश्यकता नसते. ते तर संकल्पांवर व स्मृतिवर आधारित आहे) जो माझे स्मरण करीत शरीर त्यागतो तो माझ्या सहज स्वरूपास प्राप्त होतो. तर मग खूप सोपे आहे. आम्ही आजपासूनच कशाला नामस्मरण व इंद्रिय संयम करायचा? जेव्हा अंत:काळ जवळ येईल तेव्हा परमेश्वराचे स्मरण करू. परंतु भगवंत म्हणतात- अर्जुना! तसे होत नाही. **'सदा तद्भाव भावितः'**- मनुष्य सदैव त्याच भावनेने ओतप्रोत राहतो ज्याचा आयुष्यभर अभ्यास केलेला असतो. मृत्युसमयी बुद्धि विकल होऊन जाते की जिच्या सहाय्याने आपण निर्णय घेऊ शकतो, स्मृति

भ्रमित होते की ज्या स्मृति पटलावर काहीही धारण केले जाते. अशा प्रकारे ही दोन्ही यंत्रे बिघडून जातात. मग आपण धारण कसे काय करणार? अशा वेळी आयुष्यभर ज्याप्रमाणे आचरण केलेले असते तेच दृश्य हमखास समोर येते. म्हणून अर्जुना! उद्यावर न टाकता, आजपासून, आत्तापासून निरंतर तू माझे चिंतन कर व युद्ध कर. तू मला प्राप्त करशील. (गीता ८/७)

आता निरंतर चिंतन व युद्ध एक साथ कसे शक्य आहे? का एकीकडे 'जय श्रीराम', 'हर हर महादेव' म्हणायचे व दुसरीकडे शस्त्र चालवित राहायचे, परंतु पुढच्याच श्लोकात योगेश्वर श्रीकृष्णांनी निरंतर चिंतनाच्या विधीवर प्रकाश टाकला आहे. ते म्हणतात योग-साधनेस, गीतोक्त साधनेच्या पद्धतीस अंतःकरणात धारण करून, वैराग्यामध्ये स्थिर राहून, एकांताचे सेवन करीत चिंतन कर व युद्ध कर. आपणच विचार करा - एकांतात राहायचे, आपल्या शिवाय तेथे दुसरा कोणी नाही, मग युद्ध कोणाशी करायचे? वैराग्यामध्ये स्थिर राहावयाचे. वैराग्य म्हणजे पाहिलेल्या, ऐकलेल्या गोष्टींबद्दलच्या आसक्तीचा त्याग. पाहिलेल्या गोष्टि म्हणजे प्रापंचिक, भौतिक वस्तू व ऐकलेल्या गोष्टी म्हणजे स्वर्ग-वैकुंठाचा महिमा. ह्या गोष्टींबद्दल आसक्ति असेल तरच संघर्षाची भावना जागृत होते. ह्या पाहिलेल्या-ऐकलेल्या वस्तूंबद्दल आसक्ति बाळगायची नाही तर मग युद्ध कसले? कोणासाठी लढायचे? योगविधिने ह्या निर्धारित कर्माला हृदयात धारण करावयाचे आहे. इष्टाशिवाय अन्य कोणत्याही विषय-वस्तूचे चिंतन न करणारा कोणाशी व का युद्ध करेल? मग हे युद्ध म्हणजे कोणते युद्ध?

वास्तविक सगळ्या बाजूंनी चित्ताला एकत्रित करून, वैराग्यामध्ये चांगल्या प्रकारे स्थिर राहून जेव्हा त्या परमेश्वराच्या ठायी चित्त लावले जाते तेव्हा मायिक प्रवृत्ति बाधा निर्माण करतात. चिंतन करीत असताना काम-क्रोध, लोभ-मोह, राग-द्वेष, मद-मत्सर इत्यादिंचे तरंग उठावयास लागतात. कधी कोणी साधना करावयास बसले की लगेच त्याचे मन वर्तमानातीलच नव्हे तर भूतकाळातल्या घटनांचीही फाईल उघडून त्याच्यासमोर ठेवते. शरीर

तर ध्यानाला बसले आहे परंतु मन भूतकाळाचे चिंतन करीत असते अथवा भविष्यकाळाच्या योजना आखित असते. असे ध्यानामध्येच होते, तेव्हा वर नमूद केलेले युद्ध हे अंत:करणातील युद्ध आहे. ही क्षेत्र-क्षेत्रज्ञाची लढाई आहे, प्रकृति व पुरुषाची लढाई आहे ज्यामध्ये एकदा विजय मिळाला की तो शाश्वत असतो, त्यानंतर कधी हार नसते. परिणामी शाश्वत जीवन, शाश्वत शांति व मोक्ष प्राप्त होतो, अन्यथा ज्या गोष्टीचे आयुष्यभर चिंतन केलेले असते, तीच योनि प्राप्त होते व क्रम चालू राहतो- **'पुनरपि जननम् पुनरपि मरणम् पुनरपि जननी जठरे शयनम्।'** योगेश्वर श्रीकृष्णांनी पुन्हा जोर देऊन तीच गोष्ट सांगितली आहे की-

**अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः।**
**तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः।।** (गीता८/१४)

'अनन्य' अर्थात 'अन्य न', माझ्या व्यतिरिक्त अन्य कोणाचेही स्मरण न करता जो निरंतर माझे स्मरण करतो, त्यास मी सहजपणे प्राप्त होतो. आपणास प्राप्त करून काय लाभ होतो? ह्यावर योगेश्वर म्हणतात-

**मामुपेत्य पुनर्जन्म दुःखालयमशाश्वतम्।**
**नाप्नुवन्ति महात्मानः संसिद्धिं परमां गताः।।** (गीता ८/१५)

मला प्राप्त करून महात्मा जनांना दु:खाचे आगर असणारा व क्षणभंगूर असा पुनर्जन्म प्राप्त होत नाही. प्रश्न स्वाभाविक आहे की पुनर्जन्माच्या कक्षेत कोण-कोण येते? पुनर्जन्माची सीमा कोठपर्यंत मर्यादित आहे? त्यावर म्हणतात-

**आब्रह्मभुवनाल्लोकाः पुनरावर्तिनोऽर्जुन।**
**मामुपेत्य तु कौन्तेय पुनर्जन्म न विद्यते।।** (गीता ८/१६)

स्वयं सृष्टीचा निर्माणकर्ता ब्रह्मदेव व त्यापासून उत्पन्न झालेले जग पुनरावर्ती स्वभावाचे आहे. योग्य वेळ येताच ब्रह्मा सुद्धा आपल्या लोकासहित शांत होतो. विधाता व त्यापासून उत्पन्न झालेली सृष्टि, दिति-अदितीची मुले, देव-दानव आणि मानव हे सर्व पुनर्जन्म पावणारे आहेत. परंतु मला प्राप्त झालेल्या व्यक्तीचा विनाश होत नाही, पुनर्जन्म होत नाही. तो माझ्या सहज

स्वरूपास प्राप्त करतो. म्हणुनच नामस्मरण एका परमात्म्याचे केले पाहिजे, बाकी सर्व नश्वर, पुनरावर्ती स्वभावाचे असतात. सृष्टि पुनर्जन्मावरच टिकून आहे. कधी पिता-पुत्राच्या रुपात तर कधी इतर नात्यांच्या रुपात हे चक्र चालतच राहते.

गीतेनुसार जीवात्मा एका शरीराचा त्याग करून दुसरे शरीर धारण करतो. हे शरीर सुटले की दुसऱ्या शरीरात प्रवेश होतो. जी व्यवस्था ह्या शरीरात विद्यमान असते तीच दुसऱ्या शरीरातही मिळते. भगवान श्रीकृष्णांच्या अनुसार तामसी गुणांचे बाहुल्य असलेला पुरुष पशु-पक्षी इत्यादि अधम योनि प्राप्त करतो. राजसी गुण कार्यरत असताना मृत्यू पावलेला पुरुष मनुष्य शरीर प्राप्त करतो व सात्विक गुणांच्या कार्यकाळात मृत्यू पावलेला पुरुष देवत्वाने युक्त असलेली उन्नत योनि प्राप्त करतो. प्रत्येक दशेमध्ये तो शरीर धारण करतोच.

संस्कृत शब्दकोषात 'भूत' ह्या शब्दाचा अर्थ आहे 'प्राणी'. आपण सर्व सजीव प्राणी, भूत आहोत. गतकाळालाही 'भूत' काळ म्हटले जाते. परंतु आजकाल 'भूत' हा शब्द कुप्रसिद्ध झालेला आहे. लोक समजतात की मनुष्य मेल्यावर त्याचे 'भूत' होते जे स्मशानात पिंपळाच्या झाडावर वा जुन्या, भग्नावस्थेतील घरांमध्ये आढळते व कोणाच्याही मानेवर येऊन बसते. हा एक भ्रम आहे. मृत शरीराला गिधाडे, कुत्रे, कावळे खातात, भूतांचा मृत शरीराशी काहीही संबंध नसतो, परंतु सर्व मानवजातीला भूतांचे भय वाटते. ज्या घरामध्ये 'गीता' व त्याचे भाष्य 'यथार्थ गीता' ह्याचे वाचन होते तेथे भूतांचे भय कायमचे नाहीसे होते कारण **'ईश्वरः सर्वभूतानां....'** ह्या श्लोका द्वारे भगवद्गीता उत्तम प्रकारे बोध करविते की भूतांचे अस्तित्व नसते.

इस्लाम विचारधारेचे प्रवर्तक हजरत मुहम्मद साहेबांना परमेश्वराकडून (अल्लाहकडून) संदेश प्रसारित केला गेला की एक ईश्वरच सत्य आहे. त्याचा भागीदार कोणी नाही. सृष्टीच्या आरंभीच भगवान श्रीकृष्णांनी म्हटले की - आत्माच सत्य आहे, त्याच्याशिवाय दुसऱ्या कोणाचेही अस्तित्व

नाही. त्याच्यासारखा दुसरा कोणी नाही, ब्रह्माही मरणधर्मी आहे. परमेश्वर स्वत: सांगत आहेत तेव्हा एकाच अर्थाची गोष्ट सांगितली जाणार. जे कोणी महात्मे साधना करून त्या स्तरापर्यंत पोहोचतील, त्यांना परमेश्वराकडून एक सारखाच निर्णय दिला जाईल. परमेश्वर आपल्या विभूतींचा परिचय करवून त्यास स्वत:मध्ये स्थान देतील. हजरत मुहम्मद साहेबांनीही हेच सांगितले की 'अल्लाह' शिवाय कोणीही पूजनीय नाही.

ते महापुरुष तर त्यांच्या परीने बोध करून गेले. त्यांच्यानंतर समाजाने काय वाचले व त्यातून काय अर्थ काढला हे तो समाजच जाणे. आजकाल लोक म्हणतात की कुराणाच्या अनुसार पुनर्जन्म नसतो, परंतु आमचा असा विचार आहे की कुराण हे पुनर्जन्मावरच टिकून आहे. मुहम्मद साहेबांनी जेव्हा उपदेश करण्यास आरंभ केला, तेव्हा त्यांना विरोध होऊ लागला. मंदिरे-देवालये ह्यांवर अवलंबून असलेल्या लोकांनी त्यांना खूप विरोध केला. त्यांच्यामध्ये खूप लढाया झाल्या, कधी हार तर कधी जीत. एकदा मुहम्मद साहेबांच्या पक्षातील लोक हरले. खूप नुकसान झाले, बरेच लोक मारले गेले. हरल्यानंतर वाचलेले लोक जेव्हा घरी परत आले तेव्हा घरातील वडीलधारी मंडळी त्यांना म्हणाली - 'त्या मुहम्मदाच्या भानगडीत पडण्यास आम्ही मनाई केली होती. आमचे ऐकले असते तर आपल्या कुटुंबातील इतके जण मारले गेले नसते. ऐकले नाहीत त्याचा काय परिणाम झाला बघा!' तेव्हा मुहम्मद साहेबांना अनुभूति झाली की- 'ऐ पैगंबर! त्यांना सांगा की ते लोक मेलेले नाहीत, जिवंत आहेत, स्वर्गात श्रेष्ठ कार्य करीत आहेत.' (सूरा-३-आले. इमरान-पारा ४, आयत १६८ ते १७०). विचार करा पन्नास-शंभर प्रेतांना पुरले जात आहे, त्यांची मुले-बायका रडत आहेत, आई-वडील दु:ख करीत आहेत व मुहम्मद साहेब म्हणतात की ते मेलेले नाहीत, स्वर्गात थोर कार्य करीत आहेत. त्यांच्या त्या कार्याचा लाभ त्यांच्या ह्या परिवाराला मिळेल का? मेलेल्यांचे शरीर येथे गाडले जात आहे व दुसरे शरीर तेथे कार्य करीत आहे. ह्यास पुनर्जन्म नाही तर आणखी काय म्हणायचे?

इस्लाम विचारधारेनुसार पुनर्जन्म नक्कीच असतो. कुराण सुरेह अलवकर २/२८ मध्ये आहे- ''तुम्ही परमेश्वर नसतो असे कसे म्हणू शकता? जेव्हा तुम्ही निर्जीव होतात तेव्हा त्याने तुम्हाला जीवन प्रदान केले, मग त्याने तुम्हाला मृत्यू दिला, परत जिवंत केले, व त्याच्याचकडे तुम्ही परत जाणार आहात.'' सूरए नूह, ७१/१७-१८ मध्ये म्हटले आहे- ''परमात्म्याने तुम्हाला पृथ्वीवर वनस्पतीच्या रुपात उगविले, मग तोच तुम्हाला परत ह्या मातीत मिसळून टाकेल व परत तुम्हाला तेथून बाहेर काढेल.'' सूरए ताहा २०/५५ मध्ये आहे- ''ह्या मातीतून मी तुला उत्पन्न केले. त्याच मातीतून मी तुझी पुनरावृत्ति करेन.'' सूरए वाकेआ ५६/५८-६२ मध्ये असे म्हटले आहे की - ''कधी तू विचार केला आहेस का की जे वीर्य तू सांडतोस ते तू उत्पन्न करतोस का ते वीर्य मी उत्पन्न करतो? मी तुला मृत्यू देऊ शकतो तसेच माझ्यामध्ये अशी शक्ति आहे की मी तुझी योनी बदलून अशा एखाद्या रुपामध्ये तुला जन्म देऊ शकतो ज्यास तू जाणत नाहीस. तुझा प्रथम जन्म तर तू जाणतोस, मग का उपदेश ग्रहण करीत नाहीस?

सततुल हज्जि २२/१०३ मध्ये म्हटले आहे- ''हे मनुष्यांनो! आपल्या ईश्वराला घाबरा. महाप्रलय होणे, धरणी कंप होणे ही नक्कीच एक भायनक गोष्ट आहे. ज्या दिवशी तुम्हाला त्यास सामोरे जावे लागेल, तेव्हा सर्व दूध पाजणाऱ्या माता आपल्या तान्हुल्यांना विसरून जातील, गर्भवती स्त्रिया आपला गर्भपात होणे थांबवू शकणार नाहीत व सर्व लोक उत्मत्त झालेले दिसतील. ती उन्मत्तता नसून ती अल्लाने केलेली कठोर शिक्षा आहे.'' काही लोक असेही असतात जे दुष्ट सैतानांचा आसरा घेऊन अल्लाशी झगडतात. अशा लोकांबद्दल लिहीले आहे की जो कोणी त्यांचा दोस्त बनतो त्यास ते बहकवितात व नरकात घेऊन जातात. पुन्हा जन्म होण्याबद्दल तुम्हाला शंका असली तरी मी तुम्हाला मातीतून, रक्तामांसातून उत्पन्न केले आहे, कधी पूर्ण तर कधी अधूरे. मला हवे त्यास मी एखाद्या मातेच्या पोटामध्ये ठराविक काळापर्यंत ठेवतो व बाळाच्या रुपात त्यास जन्माला घालतो की पुढे तो

त्याचे तारुण्य गाठेल. तुमच्यामधील काहींना तर वृद्धत्वापर्यंत नेतो; इतक्या अनुभवानंतरही त्यांस खरे ज्ञान होत नाही. पाण्याअभावी जमीन जेव्हा कोरडी होते तेव्हा मीच तिच्यावर पाऊस पाडतो व ती परत हिरवीगार होते, धन-धान्य पिकवीते. हे सर्व दाखले अशासाठी की 'अल्ला' हेच एक सत्य आहे. तो मृतांना जिवंत करू शकतो व सर्व गोष्टी करण्यास तो समर्थ आहे. ह्याबद्दल शंकाच नाही. जे लोक कबरींमध्ये गाडलेले आहेत त्यांना तो जिवंत करू शकतो. असेही काही लोक आहेत की जे अल्लावरून भांडतात. वास्तविक ना त्यांच्याजवळ ज्ञान आहे, ना समज आहे व ना ह्या गोष्टीवर प्रकाश टाकणारे एखादे पुस्तक आहे. अशा लोकांना यातना भोगाव्या लागतात व महाप्रलयदिनी मी त्यांना अग्नीमध्ये जळण्याचा दंड देतो. ते त्यांच्याच कर्माचे फळ असते कारण अल्ला तर त्याच्या दासांवर अन्याय करणे शक्य नाही.

अग्नीमध्ये कातडे आंकुचित होते व जळून भस्म झाल्यावर अल्ला त्यांस अग्नीमधून बाहेर काढून नवीन शरीर प्रदान करतो व पुन्हा त्याच अग्नीमध्ये टाकतो.

शरीर भस्म झाल्यावर बाहेर काढणे व परत अग्नीमध्ये टाकणे! हा पुनर्जन्मच नव्हे का? भगवान श्रीकृष्ण म्हणतात की जुने वस्त्र टाकून नवीन शरीररूपी वस्त्र धारण केले जाते. इस्लाममध्ये हेच आणखी स्पष्टपणे सांगितले आहे की कातडे आकुंचित होऊन नष्ट झाल्यावर परत नवीन कातडे प्राप्त होते व त्यास नरकाच्या अग्नीमध्ये फेकले जाते. म्हणजेच "**पुनरपि जननम् पुनरपि मरणम् पुनरपि जननी जठरे शयनम्**" पुन्हा पुन्हा गर्भवासाच्या यातना, प्रकृतीरुपी ज्वाळा भोगणे म्हणजेच अग्नीमध्ये फेकले जाणे होय. सत्कर्म व दुष्कर्म ह्यांनुसार फळ मिळणे हेच जन्मो-जन्मींच्या कर्मांचे बंधन आहे. अल्ला आपल्या मर्जीनुसार कोणाला स्वर्ग व कोणाला नरकवास देत नाही. त्याच्याजवळ आपल्या सर्व कर्मांचा हिशोब असतो व त्यानुसार तो पुरस्कार अथवा दंड देतो. असो, तर इस्लाममध्येही पुनर्जन्म असतो असेच सांगितले गेले आहे; परंतु शास्त्र तर एखादाच महापुरुष जाणतो व त्याच्या

मार्गदर्शनाखाली विरळच एखादा अधिकारी शिष्य ते वाचू शकतो. इतर लोक ते वाचतात व स्वतःच्या बुद्धीला जेवढे समजेल तेवढेच सत्य मानतात; परंतु संपूर्ण सत्य तर केवळ महापुरुषच जाणतात.

हेच कारण आहे की समाजात जवळ-जवळ सर्व विचार-पद्धतींमध्ये भूत-प्रेत-खवीस ह्या गोष्टींची परंपरा चालू आहे. काही प्रेतांना महाप्रलय होताच जर परत शरीर प्राप्त करून उभे रहायचे आहे तर मग काही दिवसांपूर्वी गाडलेले प्रेत आज कोणाला का त्रास देईल? कोणाचे डोके दुखत असेल तर म्हणतात की भूताने पछाडले असेल. जर एखादे शरीर योग्य वेळ येण्या आधी उभेच राहू शकत नाही तर ते कोणाचे डोके कसे पछाडेल? रोज कोणाची तरी प्रेतबाधा उतरवली जात आहे व कोणाला तरी बाधा होत आहे. हे सर्व निरर्थक आहे, असे काही नसते. महाप्रलय होणे ह्या प्रश्नावर नंतर कधी तरी चर्चा केली जाईल.

सत्कर्म व दुष्कर्म! ज्याने जसे कर्म केले असेल त्यानुसार स्वर्गात अथवा नरकात स्थान मिळते. स्वर्गामध्ये रमणीय वातावरण, निर्मळ पाण्याचे झरे, फळाफुलांनी बहरलेले वृक्ष, मनपसंत पक्वान्ने व डेरेदार वृक्षाच्या सावलीत छान घर असे सर्व मिळते. वाळवंटात ह्या सर्व गोष्टी दुर्लभ असतात. डेरेदार वृक्षांची वानवाच असते. एखादा असा वृक्ष दिसला की तेथील लोकांना स्वर्गसुख मिळाल्यासारखे वाटते. फळांनी बहरलेला वृक्ष अथवा रखरखाट असताना सावलीमध्ये घर किंवा गोड पाण्याचा झरा ह्या गोष्टी तेथील लोकांना स्वर्गाप्रमाणे वाटतात. ह्याउलट तिबेटमध्ये राहणाऱ्यांना सूर्याचे कडक ऊन मिळणे स्वर्गसुखाप्रमाणे वाटते. जे लोक बर्फाळ प्रदेशात राहतात व जेथे तापमान शून्यापेक्षाही कमी असते, त्यांच्यासाठी स्वर्ग असाच असणार. स्वर्ग अथवा नरक मिळणे हा आपल्या कर्माचा परिणाम असतो. आपल्या भविष्याचे लेखक तर आपण स्वतः असतो परंतु जन्माच्या आधीचे लेखक कोण असते? कारण एखादा राजा-महाराजांच्या महालात जन्म घेतो, ऐश्वर्यात वाढतो असे का? मोठे झाल्यावर तीनशे अप्सरा त्याच्या मनोरंजनासाठी तैनात असतात.

इतिहासात कित्येक राजा-महाराजांनी शेकडो राण्या केलेल्या आहेत, पण मरणानंतर हे सर्व संपते. स्वर्गात अप्सरा मिळाल्या तरी त्या कमीच असतील.

वस्तुतः सृष्टि अनादि आहे. ती सदैव होती व सदैव राहील. जीवनात उत्कर्ष व पतन हे आधी केलेल्या कर्मानुसार होत राहते. पुढेही आपल्याला आपल्या कर्मानुसार फळ भोगावे लागते.

ख्रिस्ति लोकांचाही असा विश्वास आहे की येशू ख्रिस्ताने भूताला पळवून लावताच आजारी माणूस बरा होतो व ते भूत मेंढ्या-बकऱ्यां मध्ये जाते. मेंढी भले घाबरून पळाली असली तरी लोकांना वाटे भूतामुळे पळाली. मांत्रिक लोक असाच जादू-टोणा करीत असतात. येशू ख्रिस्त शरीर त्यागल्यानंतर तीन दिवसांनी पुन्हा जीवित झाले. कबरीत गाडल्यानंतर त्याच शरीरात पुन्हा जिवंत झाले - ते त्यांचे भूत तर नव्हते? त्यानंतर चाळीस दिवस आपल्या भक्तांच्या सहवासात राहिले व नंतर निघून गेले. वस्तुतः येशू ख्रिस्त महापुरुष होते. महापुरुष स्वतःचे शरीर त्याच दिवशी त्यागतो ज्या दिवशी तो स्वरूपप्राप्ति करतो. स्वरूप प्राप्त झाल्यानंतर महापुरुषाचे स्थूल शरीर हे लोकहितासाठी असते. ह्या स्तरावर पोहोचलेल्या महापुरुषाचा स्वतःच्या शरीराशी कोणताही स्वार्थ-संबंध राहत नाही. ते केवळ लोककल्याणाकरीता असतात. असे महापुरुष मृत्यूच्या पश्चातही त्यांना पाहिजे त्या भक्ताला दर्शन देऊ शकतात. येशू ख्रिस्त हे त्याच स्तरावरचे महात्मा होते. मृत्यूनंतरही त्यांनी त्यांच्या शिष्यांना दर्शन दिले.

आमच्या गुरुमहाराजांनीही शरीर सुटल्यावर आम्हाला दर्शन दिले होते. गुरु महाराजांचे महाप्रयाण झाल्यावर आमच्या मनात चिंता निर्माण झाली की घोर जंगलात आश्रम आहे. आमचे मोठे गुरुबंधू व छोटे गुरुबंधूही एक-एक करून आश्रमातून अन्य ठिकाणी निघून गेले होते. आश्रमाच्या आजूबाजूच्या जंगलात दरोडेखोरांचे साम्राज्य होते. आश्रमाचे संरक्षण कसे होणार? तेव्हा आसनस्थ होऊन गुरुमहाराजांनी आम्हाला दर्शन दिले व म्हणाले- ‘‘आसनावर बसून मी सर्व पहात आहे. तू कशाला चिंता करतोस? तू आपली

साधना कर.'' जसे गुरुमहाराज जिवंत असताना दिसले तसेच महाप्रयाणानंतर त्या वेळी आम्हाला दिसले. असो, महापुरुष शरीर त्यागण्याच्या पश्चात् जिवंत होत नाहीत तर ते जिवंतच असतात. वास्तविकता अशी आहे की जीवन तर केवळ महापुरुषांशीच असते व बाकी सर्वांकडे वस्त्र-परिवर्तन असते. केवळ महापुरुषांकडे अनंत जीवन असते. श्रद्धेने कोणी त्यांना हाक मारली तर ते अवश्य दर्शन देतील. आजही वेळोवेळी कित्येक लोकांना गुरु-महाराजांचे दर्शन घडते. श्रद्धेने हाक मारलीत तर तुम्हालाही घडेल. गुरुमहाराज म्हणायचे- ''हो! मी कधीही मरणार नाही. सूक्ष्म स्वरूपात सदैव विद्यमान राहीन. जो श्रद्धेने हाक मारेल त्याचे कल्याण करीत राहीन.''

अशा प्रकारे पुनर्जन्म अनिवार्य आहे, परंतु भगवंताच्या वरदहस्ताखाली आल्यावर पुनर्जन्म होत नाही. भगवान श्रीकृष्ण म्हणतात-

**यो मामजमनादि च वेत्ति लोकमहेश्वरम्।**
**असम्मूढः स मर्त्येषु सर्वपापैः प्रमुच्यते।।** (गीता १०/३)

अर्जुना! जो मला जरामरणरहित, आदिअन्तरहित व सर्व लोकांचा महान ईश्वर असे साक्षात्कारासह जाणतो तो पुरुष मर्त्य मानवांमध्ये ज्ञानी आहे. तो सर्व पापांपासून मुक्त होतो. त्याला पुनर्जन्म प्राप्त होत नाही. हे केवळ कैवल्यप्राप्ती झालेल्या महापुरुषांचे लक्षण आहे की त्यांचा पुनर्जन्म होत नाही, बाकी इतरांसाठी नरकातील क्लेश अथवा स्वर्गिय ऐश्वर्य असतेच. गीतोक्त साधना केल्यावर काही काळातच आपल्या मनाचा लगाम परमेश्वर स्वतःच्या हातात घेतात. ते साधकाला मार्गदर्शन करू लागतात. त्यांच्या वरदहस्ताखाली जेव्हा साधना होऊ लागते तेव्हा भले मोक्ष मिळाला नाही तरी प्रकृतीमधील कोणतेही संकट केलेली साधना नष्ट करू शकत नाही. परमेश्वराच्या संरक्षणाखाली तो साधक अतिशय सुरक्षित राहतो.

उदाहरणार्थ महाभारतातील एक गोष्ट आहे. एकदा शकुनी दुर्योधनास म्हणाला - ''पितामह भिष्मांच्या वरचढ असा एकही योद्धा दोन्ही सैन्यांमध्ये नाही, परंतु ते पांडवांना मारणार नाहीत, कारण पांडव त्यांना प्रिय

आहेत. तेव्हा असे काही तरी केले पाहिजे जेणेकरून पितामह भिष्म चेतविले जातील व पांडवांवर प्रहार करतील.'' शकुनीच्या सांगण्यावरून दुर्योधन मान खाली घालून, उदास असल्याचे दाखवीत भिष्मांकडे गेला. भिष्म म्हणाले, ''दुर्योधना! तुला उदास व्हावयाचे काहीच कारण नाही. जोपर्यंत माझ्या हातात धनुष्य आहे तोपर्यंत तुझी हार होऊच शकत नाही. मी दर दिवशी दहा हजार महारथींचा वध करीत राहीन.''

दुर्योधन म्हणाला- ''हेच तर दु:ख आहे. तुम्ही माझ्याबाजूने युद्ध करीत नाही आहात. तुम्ही ज्या दहा हजार महारथींचा वध करीत आहात त्यातला एकही माझा शत्रू नाही. त्या महारथींना मी ओळखतही नाही. तुम्ही केवळ वेळ दवडीत आहात. माझ्या विजयामध्ये बाधा टाकीत आहात. माझे शत्रु केवळ पाच पांडव आहेत. शक्य असेल तर त्यातल्या एकाला तरी मारा अन्यथा धनुष्यबाण खाली ठेवा. सेनापती पद कर्णाला द्या.''

पितामह भिष्म रागावून म्हणाले- ''मुर्खा! मी जिवंत असताना तो सूतपुत्र सेनापती होणे शक्य नाही. मी माझ्या पूर्ण शक्तीनीशी युद्ध करीत आहे तरी तू माझा आज अपमान केलेला आहेस. पांडव अवध्य आहेत. त्यांच्यावर भगवंताचा वरदहस्त आहे. त्यांना कोणी मारू शकत नाही. मारले जाल तुम्ही सर्व. पांडवांचाच विजय होईल. परंतु आज तू माझ्यावर मोठा दोष लावलेला आहेस. तेव्हा जा, उद्या सृष्टीमध्ये एकतर अर्जुन राहील अथवा मी.''

पितामह भिष्मांनी प्रतिज्ञा केली. शकुनी खूप आनंदित झाला. तो म्हणाला - ''दुर्योधना! आपले कार्य साध्य झाले. अर्जुन मारला गेला की इतर पांडवांना हरविणे सहज शक्य होईल. विजय तर आपल्याला आता नक्की मिळेल तेव्हा आनंद साजरा कर.'' कौरव सेनेमध्ये नगारे वाजू लागले. तर पांडवांच्या शिबिरात शांतता पसरली. ते म्हणू लागले की पितामह भिष्मांना काय झाले आहे? आम्ही त्यांचे शत्रू केव्हापासून झालो? त्यांनी अशी कशी प्रतिज्ञा केली?

भगवान श्रीकृष्ण सर्वांचे सात्वन करीत एका छावणीतून दुसऱ्या छावणीत फिरत होते. कोणीतरी म्हणाले- ''प्रभो! सांत्वन तर प्रथम अर्जुनाचे

केले पाहिजे. त्याची झोपच उडून गेली असेल, कारण मृत्यूचे भय हे सर्वात भयानक असते. ज्याच्या मृत्यूची प्रतिज्ञा भिष्मांनी केलेली असेल त्याला झोप लागणेच शक्य नाही. अर्जुन घाबरला असेल, तेव्हा प्रथम त्याचे सांत्वन करा.''

श्रीकृष्ण अर्जुनाच्या शिबिरात गेले. तेथे काही औरच दिसले. अर्जुन त्याच्या बिछान्यावर गाढ झोपलेला होता. त्यास जागे करून श्रीकृष्ण म्हणाले- अर्जुना! तुला झोप कशी लागू शकते? तू भिष्मांनी केलेली प्रतिज्ञा ऐकली नाहीस का? तुला तुझ्या प्राणांची चिंता नाही का?'' अर्जुन म्हणाला- ''प्रतिज्ञा मला कळली. परंतु प्रभो, माझ्या प्राणांची ज्यास चिंता आहे ते स्वयं आपण तर जागे आहात. मग भला मी कशाला माझी झोप बिघडवू? कर्ता-धर्ता तर आपण आहात. माझ्या करण्याने काही होणार नाही आहे. आपण जसे ठरवाल तसेच होणार आहे.''

दुसऱ्या दिवशी तुंबळ युद्ध झाले. भिष्मांनी शौर्याची पराकाष्ठा केली. परंतु सूर्यास्तापर्यंत त्यांना शर-शय्येवर निजावे लागले. तेव्हा, ज्यांच्यावर परमेश्वराचा वरदहस्त आहे त्यांचे कधी काही अनिष्ट होऊ शकत नाही.

म्हणून आपण सर्वांनी आदिशास्त्र श्रीमद्‌भगवत्‌गीतेचे भाष्य 'यथार्थ गीता' केवळ तीन-चार वेळा वाचलेत तर आपल्याला सारे रहस्य कळेल की साधना कोणाची केली पाहिजे? कशी केली पाहिजे? आपण पवित्र आहोत की अपवित्र? साधना करण्याचा अधिकार कोणाला आहे? पुनर्जन्म म्हणजे काय? ह्या सर्व प्रश्नांची उत्तरे सापडतील व भविष्यातही कोणती शंका रहाणार नाही.

ईश्वर एक आहे. त्यास प्राप्त करण्याचा विधि एक आहे व त्या विधिप्रमाणे आचरण करणे हेच धर्माचरण होय, ज्यामुळे मोक्षप्राप्ति होते-

**न तद्‌भासयते सूर्यो न शशांको न पावकः।**
**यद्‌गत्वा न निवर्तन्ते तद्‌धाम परमं मम ।।** (गीता १५/६)

ज्या परमपदास सूर्य, चंद्र किंवा अग्नी प्रकाशित करू शकत नाहीत, त्या परमपदाला प्राप्त केल्यानंतर मनुष्य पुन्हा संसारात परत येत नाही, तेच माझे परमधाम आहे. म्हणूनच त्याचा पुनर्जन्म होत नाही. या पदाची प्राप्ती करून घेण्याचा सर्वांना समान अधिकार आहे.

**॥ ओम् ॥**

**आवहि जाँहि अनेक मरि मरि जनमते।**
**बिनु बूझे सभु बादि जोनि भरमते॥**
**खात पीत खेलत हसत, भरमे जनम अनेक।**
**भव जल ते काढ्हु प्रभु, नानक तेरी टेक॥**

(अमृत कीर्तन)

# हृदय

*५ जून २००९ रोजी शक्तेषगड येथील श्री परमहंस आश्रमात संध्याकाळच्या सभेत 'शरीरातील कोणत्या भागास हृदय म्हणतात की जेथे परमेश्वराचा निवास असतो?' ह्या भक्तांच्या प्रश्नावर पूज्य महाराजश्रींनी केलेले प्रवचन -*

परमेश्वर खरोखरीच हृदयात असतो. लोक न जाणो कोठे-कोठे त्यास शोधत असतात, परंतु ज्याला कोणाला तो सापडला आहे, हृदयातच सापडला आहे. स्वयंवराच्या वेळी सीतेने तेहतीस कोटी देवी-देवतांना आळविले की श्रीरामालाच मला वरमाला घालावयाची आहे, परंतु काही उपयोग झाला नाही. शेवटी सगळीकडून निराश झाल्यावर हृदयस्थ ईश्वराला जेव्हा ती शरण गेली, त्याच वेळी सफलता मिळाली.

सीतेचे स्वयंवर चालू होते. मोठ-मोठे राजे-महाराजे धनुष्याला प्रत्यंचा लावायचा प्रयत्न करीत होते. रावण व बाणासुर ह्यांनीही प्रयत्न करून पाहिला पण त्यांनाही ते साध्य झाले नाही. मग राजा-महाराजांनी ठरविले की सगळ्यांनी मिळून प्रयत्न करूया. एकदा धनुष्य उचलले गेले की आपसात युद्ध करून विजयी झालेल्या राजाला सीता माळ घालेल. परंतु धनुष्य जराही हलले नाही.

**तब रामहि बिलोकि वैदेही।**
**सभय हृदय बिनवति जेहि तेही।।** (मानस १/२ ५६/४)

सीतेची दृष्टि जेव्हा श्रीरामांवर पडली तेव्हा फुलाच्या पाकळीसमान कोमल असे ते तिला दिसले. ज्या धनुष्याला उचलण्याच्या प्रयत्नात विशाल बाहू असलेले राजे-महाराजे खाली कोसळले, त्यास कोमल शरीर असलेले श्रीराम कसे काय उचलू शकणार? श्रीरामाला पाहून व्याकुळ हृदयाने ती **'बिनवति जेहि तेही'**- सर्व देवी-देवतांची विनवणी करू लागली - हे ग्राम देवता, हे संकटमोचन.... ज्यांची नावे आठविली त्या सर्वांना विनविले. परंतु सफलता मिळण्याचे लक्षण दिसेना.

**मनही मन मनाव अकुलानी।**
**होहु प्रसन्न महेस भवानी।।**
**करहु सफल आपनि सेवकाई।**
**करि हितु हरहु चाप गरुआई।।** (मानस १/२ ५६/६)

हे शंकर-पार्वती! आजपर्यंत मी तुमची सेवा केली. त्याच्या बदल्यात आज जेव्हा श्रीरामांची बोटे धनुष्याला स्पर्श करतील तेव्हा धनुष्य हलके करण्याची कृपा करा. आधीच हलके करू नका नाहीतर कोणीही सामान्य राजासुद्धा ते उचलू शकेल. सफलता मिळेल अशी शाश्वती वाटली नाही तेव्हा श्री गणेशाची आळवणी करू लागली -

**गणनायक वरदायक देवा।**
**आजु लगे कीन्हिउँ तुअ सेवा।।**
**बार बार बनती सुनि मोरी।**
**करहु चाप गुरुता अति थोरी।।** (मानस १/२ ५६/७-८)

सीता म्हणाली - हे गजानना! आपण तर वर देण्यात प्रवीण आहात. माझी विनंती आहे की धनुष्याचा चाप हलका करा. तरीही सफलता मिळेल अशी खात्री वाटली नाही तेव्हा -

**देखि देखि रघुबीर तन, सुर मनाव धरि धरि।**
**भरे बिलोचन प्रेम जल, पुलकावली सरीर।।** (मानस १/२५७)

सीतेने तेहतीस कोटी देवी-देवतांची विनवणी केली परंतु काही उपयोग झाला नाही. तेव्हा सीता त्या परमेश्वराला शरण गेली ज्यास सर्वांनी शरण गेले पाहिजे -

**तन मन बचन मोर पनु साचा।**
**रघुपति पद सरोज चितु राचा।।**
**तौ भगवानु सकल उर बासी।।**
**करिहि मोहि रघुवर कै दासी।।** (मानस १/२५०/५)

जर तन, मन व वचनाने माझा पण सच्चा असेल, रामाच्या चरणी जर माझी भक्ति असेल तर हे भगवंत, (कोणते भगवंत? - **'सकल उर बासी'**- जे सर्वांच्या हृदयात निवास करतात ते) मला रघुवरांची दासी बनवा. **'कृपा**

**निधान राम सबु जाना'**- भगवंतांनी जाणले की सीता आता मला हाक मारत आहे, मला शरण आलेली आहे -

**तेहि छन राम मध्य धनु तोरा।**
**भरे भुवन धुनि घोर कठोरा।।** (मानस १/२६०/८)

ज्या क्षणी सीता हृदयस्थ ईश्वराला शरण गेली त्या क्षणी धनुष्य तुटले. प्रार्थना सफल झाली. तेव्हा एका परमेश्वराचीच साधना केली पाहिजे. जेव्हा कधी फळ मिळेल ते त्यामुळेच मिळेल. सीतेने इतक्या देवी-देवतांची प्रार्थना केली ह्याचे तात्पर्य काय? वस्तुतः गोस्वामी तुलसीदासांच्या काळी भारतातील लोकांची बुद्धी ह्यामध्येच गुरफटलेली होती. तुलसीदासांनी ह्या कथेच्या माध्यमातून देवी-देवतांची योग्यता सांगितली आहे. फळ मिळते ते एका परमेश्वरामुळे ('सकल उर बासी' मुळे)!

श्रीमद्भगवद्गीतेचाही हाच संदेश आहे - **'ईश्वरः सर्वभूतांना हृद्देशेऽर्जुन तिष्ठति।'** (१८/६१) ईश्वर सर्व प्राणिमात्रांच्या हृदयात निवास करतो.

**तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत।**
**तत्प्रसादात्परां शान्तिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम्।।**

(गीता १८/६२)

अर्जुना! त्या हृदयस्थ ईश्वराला संपूर्ण भावाने शरण जा. थोडा-थोडा भक्तिभाव इतर देवी देवतांमध्ये ठेवला तर आपण भरकटत जाऊ, म्हणून संपूर्ण भक्ति-भावाने एका परमात्म्याला शरण गेले पाहिजे. त्याच्या कृपा-प्रसादाने तुम्हाला परमशांति प्राप्त होईल. **'स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम्'** - ते स्थान प्राप्त होईल जे शाश्वत आहे, अजरामर आहे. आपण रहाल, आपले स्थान राहील, सतत राहणारी शांति व समृद्धि आपल्याला प्राप्त होईल. अशाप्रकारे आपल्या शास्त्रांमध्ये भगवंताच्या पूजेचे साधन केवळ हृदयात आहे असे सांगितले आहे.

रामचरितमानसमधील मंगलाचरणामध्ये म्हटले आहे -

**भवानीशंकरौ वंदे श्रद्धाविश्वासरुपिणौ।**
**याभ्यांविनानपश्यन्तिसिद्धाःस्वान्तःस्थमीश्वरम्।।२।।**

गोस्वामी म्हणतात - मी शंकर-पार्वतींना वंदन करतो. शंकर हे आदि सद्‌गुरु आहेत. असे सद्‌गुरु जे सर्व शंकांच्या पलिकडे गेलेले आहेत, कल्याण तत्त्वामध्ये स्थित आहेत, त्यांना मी वंदन करतो. त्यांच्या कृपेशिवाय सिद्धपुरुषही हृदयामध्ये स्थित असलेल्या ईश्वराला ओळखू शकत नाहीत, मग जनसामान्यांची तर गोष्टच सोडा. अशाप्रकारे तुलसीदासांच्या रामचरितमानस मध्ये म्हटले आहे की ईश्वर हृदयामध्ये राहतो. वेद-उपनिषदांमध्येही तेच म्हटले आहे -

**अंगुष्ठमात्रः मुरूषोऽन्तरात्मा सदा जनानां हृदये सन्निविष्ठः।**

(कठोपनिषद २/३/१७)

तेव्हा सर्व शास्त्रांमध्ये हेच सांगितले आहे की प्रार्थनेचे स्थळ हृदय असते व साधना एका परमेश्वराची केली पाहिजे. ही जितकी देवळे आहेत, ती परमेश्वराच्या पाठशाळा आहेत, पूजाघरे आहेत, प्रार्थना-स्थळे आहेत. नाम-स्मरणाची स्थळे आहेत. परमेश्वराची मूर्ति एकामध्येही नाही, कारण -

**बिनु पद चलइ सुनइ बिनु काना।**
**कर बिनु करम करइ विधि नाना।।** (मानस १/११७/५)

परमेश्वर अमूर्त आहेत, अरूप आहेत तर त्यांची मूर्ति कोठून येणार? आपल्या पूर्वजांपैकी ज्या कोणी परमतत्त्वास प्राप्त केले, त्या महापुरुषांच्या मूर्ति बनविल्या गेल्या व ह्या मंदिरांमध्ये ठेवल्या गेल्या. ही सामुदायिक प्रार्थना स्थळे परमेश्वराच्या समीप पोहोचण्याचे माध्यम आहेत. रामलीला, रासलीला, कथा-कथन, नाम-जप, तीर्थाटन, पर्व-उत्सव हे सर्व धर्माचे प्राथमिक स्तर आहेत, परंतु योग्य मार्गावर येताच परमेश्वराची साधना व ध्यान हृदयामध्येच केले जाते.

परदेशामधून एक प्रश्न आम्हाला विचारला गेला की परमेश्वर हृदयात राहतात म्हणजे शरीराच्या कोणत्या भागात राहतात? परमेश्वराचा निवास मस्तकात असतो का छातीमध्ये वा छातीमधील जो भाग धक्-धक् करतो त्या भागात असतो? हृदय म्हणजे काय?

जीवशास्त्रामधील सिद्धांतांपेक्षाही उच्च स्तरावरील शोध आपल्या आर्ष-ग्रथांमध्ये आहेत, ज्यांच्यानुसार हृदय हे एक असे यंत्र आहे ज्यामध्ये फक्त परमेश्वरच स्थित नसून सृष्टीचे संपूर्ण कार्य तेथून संचालित केले जाते.

**व्यापकु एकु ब्रह्म अविनासी।**
**सत चेतन घन आनंद रासी।।** (मानस १/२२/६)

ते एक ब्रह्म कणा-कणामध्ये व्यापलेले आहे. विशाल (बृहद्) आहे म्हणून ब्रह्म म्हटले जाते व ते अविनाशी आहे - म्हणजे त्याचा कधी विनाश होत नाही. तेच सत्य आहे, चेतन आहे व असीम आनंदाची रास आहे. असा हा परमेश्वर राहतो कोठे? **'अस प्रभु हृदयँ अछत अबिकारी।'** (मानस १/२२/७) असा हा परमात्मा सर्वांच्या हृदयात निवास करतो.

रावणाची निंदा करीत गोस्वामी म्हणतात-

**फूलइ फरइ न बेत जदपि सुधा बरषहिं जलद।**
**मूरूरव हृदयँ न चेत जौं गुर मिलहिं बिंरचि सम।।**

(मानस ६/१६ ख)

म्हणजेच मुर्खाच्या हृदयात ज्ञानाचा उदय होत नाही. मानस मध्ये आणखी काही ठिकाणी 'हृदय' शब्दाचा उल्लेख आलेला आहे. भगवंत पंचवटीमध्ये राहत असताना सीतेचे हरण होते. राम व लक्ष्मण तिचा शोध घेण्यासाठी निघालेले असतात. भगवान शंकर तेथून जात असतात-

**हृदयँ बिचारत जात हर, केहि बिधि दरसनु होई।**
**गुप्त रूप अवतरे प्रभु, गएँ जान सबु कोई।।**

(मानस १/४८ क)

भगवान शंकर हृदयामध्ये विचार करीत जात होते. म्हणजे हृदय हे असे स्थळ आहे की जेथे विचार-मंथन चालू असते.

गुरू-वंदना प्रकरणामध्ये आहे -

**श्रीगुरु पद नरव मानि मन जोती।**
**सुमिरत दिव्य द्दष्टि हियँ होती ।।** (मानस १/५/५)

गुरू महाराजांच्या चरणांच्या नखाची ज्योत ही माणिक-मोत्यांच्या तुलनेची असते. ह्या चरण नखांचे स्मरण करताच हृदयात दिव्य-द्दष्टीचा संचार होतो.

भगवान शंकरांचे म्हणणे पहा -

**जाके हृदयँ भगति जसि प्रीती।**
**प्रभु तहँ प्रगट सदा तेहिं रीती।।** (मानस १/१८४/३)

ज्याच्या हृदयात जशी भक्ति व प्रीति असते, परमेश्वर त्याच्यासाठी त्या रूपात प्रकट होतात. अर्थात हृदयात भक्ति व प्रीतीचाही निवास असतो.

गुरू वशिष्ठ श्रीरामाला म्हणाले -

**सब के उर अंतर बसहु, जानहु भाउ कुभाउ।**
**पुरजन जननी भरत हित, होइ सो कहिअ उपाउ।।**

(मानस २/२५७)

आपण सर्वांच्या हृदयात निवास करता. कोणाच्या हृदयात कसा भाव आहे ते आपण जाणता. म्हणजेच हृदय हे असे स्थान आहे जेथे चांगला व वाईट असे दोन्ही भाव निवास करतात.

'मानस' मध्ये महर्षि वाल्मीकींनी परमेश्वराचे निवास-स्थान खालीलप्रकारे सांगितले आहे -

**जिन्ह के श्रवन समुद्र समाना।**
**कथा तुम्हारि सुभ्ग सरि नाना।।**
**भरहिं निरन्तर होहिं न पूरे।**
**तिन्ह के हिय तुम्ह कहुँ गृहरु रे।।** (मानस २/१२७/४-५)

समुद्राप्रमाणे ज्यांचे कान आपल्या मनमोहक कथारूपी नद्यांनी निरंतर भरूनही तृप्त होत नाहीत, त्यांचे हृदय हे आपले राहण्याचे सुंदर घर आहे.

बिभीषण जेव्हा शरण आले तेव्हा भगवंत म्हणाले -

**कहु लंकेस सहित परिवारा।**
**कुसल कुठाहर बास तुम्हारा।।** (मानस ५/४५/४)

हे लंकेश! आपला परविार व आपण कुशल आहात का ते तरी सांगा. आपला निवास वाईट ठिकाणी आहे.

**खल मण्डली बसहु दिनु राती।**
**सखा धरम निबहइ केहि भाँति।।** (मानस ५/४५/५)

दिवस-रात्र आपण दुष्ट मंडळींच्या सान्निध्यात असता, आपल्याला धर्माप्रमाणे आचरण करणे कसे शक्य होते? बिभीषण म्हणाला -

**तब लगि कुसल न जीव कहुँ, सपने हुँ मन विश्राम।**
**जब लगि भजन न राम कहुँ, सोक धाम तजि काम।।**

(मानस ५/४६)

प्रभो! जीवमात्रासाठी सृष्टीमध्ये कोठेही कुशल नाही, जोपर्यंत तो दु:खाचे आगर असलेल्या काम वासनेचा त्याग करून आपले स्मरण करीत नाही. जोपर्यंत तो साधना करीत नाही तोपर्यंत हृदयात काय होत असते? -

**तब लगि हृदयँ बसत खल नाना।**
**लोभ मोह मच्छर मद माना।।** (मानस ५/४६/१)
**ममता तरुन तमी अँधिआरी।**
**राग द्वेष उल्क सुखकारी।।**
**तब लगि बसति जीब मन माहीं।**
**जब लगि प्रभु प्रताप रबि नाहीं।।**

(मानस ५/४६/३,४)

अशाप्रकारे हृदयात फक्त परमेश्वरच राहत नाहीत तर तेथे दुष्ट वृत्तीही निवास करते. तेव्हा विचार करण्यासारखी गोष्ट आहे की हृदय म्हणजे काय?

उत्तराकांडामधील ज्ञानदीप प्रकरणामध्ये आहे -

**जीव हृदयँ तम मोह बिसेषी।**
**ग्रंथि छूट किमि परइ न देखी।।** (मानस ७/११६/७)

जीवाच्या हृदयात मोहरूपी अंध:कार प्रबळ असतो. ह्या अंध:कारात अविद्येची पकड दिसतच नाही, मग ती सुटणार तरी कशी?

नंदिग्राममध्ये भरत रोज काय करीत असे ते पहा -

**नित पूजत प्रभु पाँवरी, प्रीति न हृदयँ समाति।** (मानस २/३२५)

परमेश्वराच्या प्रति भरताला इतके अगाध प्रेम होते की त्याचे हृदयही छोटे पडले.

सुतीक्ष्णाचा प्रसंग असा आहे की -

**अतिसय प्रीति देखि रघुबीरा।**
**प्रगटे हृदयँ हरन भव भीरा।।** (मानस ३/९/१४)

सुतीक्ष्ण मुनींचे अतिशय प्रेम पाहून भगवंत त्यांच्या हृदयात प्रकट झाले.

बिभीषणाच्या शरणागतीनंतर सुग्रीवाला समजावून सांगताना भगवंत म्हणतात -**''जौं पै दुष्टहृदय सोइ होई। मोरें सनमुख आव कि सोई।।''** (मानस ५/४३/४) जर रावणाचा भाऊ दुष्ट हृदयाचा असता तर माझ्या समक्ष येऊ शकला असता का? अर्थात हृदयामध्ये दुष्टपणाही राहतो.

सुंदरकांडाच्या आरंभीच म्हटले आहे -

**जामवंत के बचन सुहाए।**
**सुनि हनुमंत हृदय अति भाए।।** (मानस ५/१/१)

जांबूवंतांनी दिलेला उपदेश हनुमानाला खूप आवडला, त्याच्या हृदयाला तो भावला. अर्थात हृदय उपदेशही ग्रहण करते. लंकेचे संरक्षण करणाऱ्या लंकिनीने हनुमानास सुचविले की-

**प्रबिसि नगर कीजै सब काजा।**
**हृदयँ राखि कोसलपुर राजा।।** (मानस ५/४/१)

हृदयामध्ये कोशलपुर नरेशाचे स्वरूप धारण करून लंकेत प्रवेश कर व सर्व कार्य कर. हनुमानाने लंकेत सीतेचे दर्शन घेतले-

**कृस तनु सीस जटा एक बेनी।**
**जपति हृदयँ रघुपति गुन श्रेनी।।** (मानस ५/७/८)

हनुमानाने तिचे सांत्वन खालीलप्रमाणे केले -

**कह कपि हृदयँ धीर धरू माता।**
**सुमिरू राम सेवक सुखदाता।।** (मानस ५/१४/९)

म्हणजे धैर्यही हृदयच धारण करते. सृष्टीमधील समस्त क्रिया हृदय करते

किष्किन्धाकांड अध्यायात असे वर्णन आहे -

**बहु छल बल सुग्रीव कर, हियँ हारा भय मानि।**
**मारा बालि राम तब, हृदयँ माझ सर तानि।।**

(मानस ४/८)

अशा प्रकारे हृदयामध्ये बाण मारणे, हृदयापासून हार मानणे असे शब्दप्रयोगही रामचरितमानसमध्ये पहावयास मिळतात. संतांच्या हृदयाची तुलना निर्मल जलाबरोबर केलेली आहे -

**संत हृदय जस निर्मल बारी।**
**बाँधे घाट मनोहर चारी।।** (मानस ३/३८/७)
**सरिता सर निर्मल जल सोहा।**
**संत हृदय जस गत मद मोहा।।** (मानस ४/१५/४)
**संत हृदय नवनीत समाना।**
**कहा कबिन्ह परि कहै न जाना।।** (मानस ७/१२४/७)

शबरीला उपदेश देताना भगवंत म्हणाले-

**नवम सरल सब सन छलहीना।**
**मम भरोस हियँ हरण न दीना।।** (मानस ३/३५/५)

भक्तीची नववी पायरी आहे सर्वभावे समर्पित होणे. हृदयामध्ये केवळ परमेश्वरावर भरवसा असू दे.

मानसरोवर रूपकाबद्दल गोस्वामी तुलसीदास सांगतात -

**सुमति भूमि थल हृदय अगाधू।**
**वेद पुरान उदधि घन साधू।।**
**रणहिं राम सुजस बर बारी।**
**मधुर मनोहर मंगलकारी।।** (मानस१/३५/३-४)

सुंदर बुद्धि ही भूमीसमान आहे. त्या बुद्धीच्या अंतरंगात खोलवर हृदय स्थित आहे. वेद-पुराण हे सागराप्रमाणे आहेत व त्यातील जल हे परमेश्वराचे मधुर, मनोहर, मंगलमय व सुयशरूपी जल आहे ज्याची वर्षा मेघरूपी संतजन करतात.

सारांश, परमेश्वर हृदयात असतात, रावणाची मूर्खता हृदयात होती, उपदेशांना ग्रहण हृदयात केले जाते, बाण हृदयात मारला जातो, सृष्टींतील सर्व कृत्ये हृदयच संचालित करते.

वास्तविक 'हृदय' हा यौगिक शब्दकोशातील शब्द आहे, जो वैदिक, गीतोक्त धर्मशास्त्रांमध्ये आढळतो. साधनेच्या प्रक्रियेच्या अंतर्गत महापुरूषांनी ज्या हृदयामध्ये परमेश्वराचा निवास असतो असे सांगितले आहे, त्या हृदयास समजून घेण्यासाठी तीन शरीरांमधील तीन हृदये लक्षात घेतली पाहिजेत.

स्थूल, सूक्ष्म व कारण अशी तीन शरीरे आहेत. संत कबीरांनीही ह्याच गोष्टीला दुजोरा दिलेला आहे -

**कबिरा कबिरा क्या करै, सोधो सकल शरीर।**
**आशा तृष्णा बस करै, सोइ दास कबीर।।**

कबीर सिद्धपुरूष आहेत, कबीर महापुरूष आहेत, महात्मा आहेत - अशाप्रकारे कबीर-कबीर असा घोष लावीत काय बसला आहेस. **'सोधो सकल शरीर'** - सकल म्हणजे सर्व, शरीरे बरीच आहेत, त्या सर्व शरीरांचा शोध घे. पहिले शरीर आहे स्थूल शरीर जे म्हणजे पंचमहाभूतांनी बनलेला हा पिंड होय, ज्यास आपण पाहू शकतो, स्पर्श करू शकतो. ह्या शरीरास संचालित करणारे दूसरे शरीर असते सूक्ष्म शरीर जे म्हणजे मनाचा विस्तार होय. मनाचा निरोध होताच जे आपल्याला दृष्टिगोचर होऊ लागते ते असते तिसरे शरीर - कारण शरीर - आत्म्याची ती शक्ति जी वृत्तीला धारण करते, सर्व कार्यास कारणीभूत असते, चेतनाशक्ति जीवात्मा म्हणून संबोधली जाते. तिचा परिचय होताच ईश्वरीय विभूतींनी विभूषित होऊन कारण शरीरही शांत होते व त्यांच्या अंतरंगात जे शेष राहते, तो म्हणजे परमात्मा. हृदयात इतक्या खोलवर परमात्म्याचा निवास असतो. त्याच्या दर्शनाने व स्पर्शाने प्रकृति कायमची विलीन होते व पुरूष स्वतःच्या सहज स्वरूपास प्राप्त करतो. ''**कहत कबीर सुनो भाई साधो, नहिं तहँ द्वैत बखेड़ा।**'' - येथे द्वैतभाव उरत नाही. कबीर म्हणतात की तिनही शरीरांचा शोध घ्यावयास हवा, परंतु आशा आणि कामना असताना हा शोध पूर्ण होऊ शकत नाही. म्हणून ''**आशा तृष्णा बस करै, सोइ दास कबीर**''- आशा व तृष्णा (कामना) ह्यांचा निरोध करून जो तिनही शरीरांचा शोध घेतो, तोच दास असतो, तोच कबीर असतो. जे मी केले, ते तुम्ही केलेत तर तुम्हीही कबीर व्हाल. ही स्थिति सर्वांसाठी सुलभ आहे, अभ्यासाने प्राप्त करता येते.

ह्याचेच चित्रण 'योगदर्शन' मध्ये महर्षि पतंजलींनीही केलेले आहे -

**कर्माशुक्लाकृष्णं योगिनस्त्रिविधमित रेषाम्।।** (४/७)

ध्यान धारणेच्या पश्चात् परमात्मप्राप्ति झालेल्या योगी पुरुषाचे लक्षण सांगताना महर्षि म्हणतात की योग्याचे कर्म अशुक्ल व अकृष्ण असते अर्थात योग्याच्या कर्माचा ना शुभ परिणाम होतो ना अशुभ संस्कार होतो.

भगवान श्रीकृष्णांनीही गीतेत म्हटले आहे -

**यस्त्वात्मरतिरेव स्यादात्मतृप्तश्च मानवः।**
**आत्मन्येव च सन्तुष्टस्तस्य कार्यं न विद्यते।।** (३/१७)

अर्जुना! जो आत्मतृप्त आहे, आत्मस्थित आहे, ज्याचा योग पूर्ण झालेला आहे, अशा पुरुषाला कर्म करून काही लाभ होत नाही अथवा कर्म न करण्याने काही क्षति पोहोचत नाही; कारण आता त्यास कोणतीही प्राप्त होण्यायोग्य गोष्ट अप्राप्त राहत नाही तर मग तो कोणाला व कशासाठी हाक मारेल? त्याच्यामध्ये कोणताही विकार शिल्लक नसतो तेव्हा तो नष्ट कोणाला करेल? परंतु महर्षि पतंजलींच्या अनुसार अन्य लोकांची कर्मे तीन प्रकारची असतात - कृष्ण, शुक्ल व मिश्रित - ज्याचे अनुक्रमे अशुभ, शुभ व शुभ-अशुभ मिश्रित असे परिणाम होतात व अनेक जन्मांपर्यंत कर्त्याचा पाठलाग करीत राहतात.

**जातिदेशकाल व्यवहितानामप्यातन्तर्यं**
**स्मृतिसंस्कारयोरेकरुपत्वात्।।** (योगदर्शन ४/९)

जाति म्हणजे जन्म, देश म्हणजे स्थान - प्राणी, वनस्पती, कोणतीही योनि व काळ म्हणजे वेळ - ह्या तिन्ही गोष्टींचा अडथळा असूनही कर्म संस्कार प्रकट होण्यामध्ये व्यवधान पडत नाही, कारण स्मृति व संस्कार ह्या दोन्हींचे स्वरूप एकच असते. स्मृतीमध्ये तेच उमटते जे संस्कारांमध्ये साठलेले असते. संस्कारांची गति बाधारहित असते. संस्कार अनेक जन्मांपर्यंत सर्वत्र कर्त्याच्या पाठोपाठ जात राहतात.

काकभुशुंडींना शंकराने आशीर्वाद दिला होता की हजार जन्मांच्या पश्चात् रामाची भक्ति प्राप्त होईल. अनेक जन्म मिळाले, अनेक देशांमधून (योनींमधून) हिंडले, काळरूपी चक्रातून फिरले परंतु कोठेही अडथळा आला नाही व शेवटी त्यांना अविरत रामभक्ति प्राप्त झाली.

**कवनेउँ जन्म मिटिहि नहिं ग्याना।**
**सुनहि सूद्र मम बचन प्रवाना।।** (मानस ७/१०८/८)

परंतु एखाद्याची स्मृति शुद्ध झाली असेल तर?

**स्मृतिपरिशुद्धौ स्वरूपशून्येवार्थमात्रनिर्भासा निर्वितर्का।**

(योगदर्शन १/४३)

जेव्हा चित्ताचे निजस्वरूप शून्य होते, त्या क्षणी स्मृति पूर्ण रूपाने शुद्ध होते. केवळ आभास राहतो. ही निर्वितर्क समाधीची अवस्था होय. जेव्हा वितर्क म्हणजेच कोणतेही संस्कार शेष नसतात तेव्हा स्मृति-पटलावर काय उमटणार? परंतु ह्या अवस्थेत संस्कारांचे बीज विद्यमान असते.

**निर्विचारवैशारद्येऽध्यात्मप्रसादः।** (योगदर्शन १/४७)

जेव्हा निर्वितर्क किंवा निर्विचार समाधि अत्यंत निर्मळ होऊन जाते, तेव्हा त्या योग्यामध्ये 'अध्यात्म प्रसादः'-आत्मिक विभूती चांगल्या प्रकारे प्रसादित होतात. अजन्मा, शाश्वत अशा ज्या ज्या विभूती सनातन पुरुषाकडे असतात, त्या सर्व विभूती योग्यास प्राप्त होतात, आत्म्याचे आधिपत्य स्थापित होते. आत्मिक विभूतींचा प्रसाद त्यास प्राप्त होतो. आता कोणतीही विभूती त्याच्यापासून वेगळी राहत नाही.

अशा वेळी बुद्धि ऋतंभरा होते, जणू काही शेत पेरणीसाठी पूर्णपणे तयार आहे. बी पेरायचाच अवकाश. ऋतंभरा अवस्था त्या ज्योतिर्मय परमात्म्यास धारण करण्याची क्षमता बाळगणारी असते, बुद्धि परमात्मस्वरूप होते. ही ऋतंभरा बुद्धीही अत्यंत निर्मळ होताच -

**तस्यापि निराधे सर्वनिरोधान्निर्बीजः समाधिः।**

(योगदर्शन १/५१)

त्या ईश्वराकडून संपूर्ण प्रसाद प्राप्त होतो. जोपर्यंत ही देवाण-घेवाण चालू असते तोपर्यंत हे कारण शरीर कार्य करीत राहते. जेव्हा ईश्वर पूर्णपणे प्राप्त होतो, तेव्हा तो सर्व संस्कार नष्ट करून टाकतो, शांत करून टाकतो. आता कारण शरीरही शांत होते. अशाप्रकारे संस्कारांचे बीजही सर्वथा नष्ट झाले की येणाऱ्या अवस्थेस निर्बीज समाधि म्हणतात. ह्यास कैवल्यपद, कैवल्यज्ञान असेही म्हणतात. कैवल्य समाधिही ह्याच अवस्थेचे नाव होय.

सारांश, प्रथम पंचमहाभूतांनी बनलेले हे स्थूल शरीर म्हणजे पिंड असतो. त्यामध्ये हृदय असते जे धक्-धक् करीत असते. हे हृदय जेव्हा

कार्य करणे बंद करते तेव्हा मृत्यु येतो. शरीराचे जिवंत राहणे-मरणे चालूच असते. **'वासांसि जीर्णानि यथा विहाय'**- ज्याप्रमाणे मनुष्य जुन्या वस्त्रांचा त्याग करून नवीन वस्त्र धारण करतो, भूतादिकांचा स्वामी एका शरीररूपी वस्त्राचा त्याग करून जे नवीन शरीररूपी वस्त्र धारण करतो त्यामध्ये तो पहिल्यासारखाच राहतो. जी व्यवस्था आधीच्या शरीरात प्राप्त होती तीच व्यवस्था नवीन शरीरातही विद्यमान असते. त्याने काही गमविलेले नसते. हे वस्त्र परिवर्तन अनंत काळापर्यंत चालतच राहते.

गीतेमध्ये भगवंत म्हणतात - अर्जुना! शरीर नाशिवंत आहे म्हणून तू युद्ध कर. तर मग काय पांडवांच्या पक्षातील योद्ध्यांची शरीरे अविनाशी होती? ह्या आदेशावरून हे सिद्ध होत नाही की केवळ कौरवांनाच मारावे. परिवारातील अर्धे लोक पांडव पक्षांमध्येही होते. जेथे शरीर दिसेल तेथे बाण मारायचा! शरीर तर नाशिवंतच असते.

हाही एक प्रश्न आहे की शरीर मारण्याने मरते का? इकडे एक शरीर सुटले तर दुसरे तयार असते! एक वस्त्र बदलले, दुसरे तयार! जोपर्यंत अंतिम संस्कार नष्ट होत नाहीत तोपर्यंत शरीरांचा क्रम अबाधित चालूच राहतो. अंतिम संस्कार मिटणे व पुन्हा शरीर निर्माण होण्याचे कारण मिटणे - ह्या घटना एकाच वेळी घडतात. हाच असतो शरीराचा अंत. अर्थात् मनाचा विरोध व मनाचे अचल स्थिर होणे आणि शरीरांच्या पुनर्निर्माणाचे कारण समाप्त होणे हे एकाच वेळी घडते.

ह्याबरोबरच तो परमेश्वर आपणामध्ये दृष्टि बनून संचारित होतो व समोर स्वतः असतोच. आपल्याला कळले नसले तरी आपोआप समजू लागते.

अशाप्रकारे शरीर एक स्थूल वस्त्र आहे. त्यामध्ये एक सूक्ष्म शरीर असते ज्यास हे शरीर वारंवार मिळते व ते म्हणजे मनाचा विस्तार. इंद्रिये व मनाच्या संयमानंतर सूक्ष्म शरीराचाही संयम होतो. तेव्हा 'कारण' शरीर दृष्टिगोचर होते. हे कारण शरीर म्हणजे परमात्म्याची ती शक्ति जी सर्व सृष्टीचे संचालन करते. आता तो आत्मा प्रसाद प्रसारित करावयास लागतो, विभूतींचा परिचय करून देतो. घेवाण-देवाण चालू असते तोपर्यंत तो मनुष्य साधक असतो. त्यानंतर बुद्धि सात्विकतेने भरून जाते व परमात्म्याला धारण

करावयाची क्षमता येते. हेही शांत झाल्यावर कैवल्यज्ञान प्राप्त होते, परमतत्त्व परमात्म्याची प्राप्ति होते. इतक्या खोल परमेश्वराचा निवास असतो. ह्याच हृदयात परमेश्वर राहतात.

अर्थात हृदयात तीन शरीरे आहेत. ह्यास यौगिक अर्थ आहे व त्यानुसार तीन शरीरे अशाप्रकारे आहेत - एक स्थूल शरीर ज्याचे जिवंत राहणे-मरणे चालू असते, त्यामध्ये परमेश्वर राहत नाहीत. ह्याचा अर्थ असा नव्हे की ते स्थान परमेश्वरापासून रिक्त आहे. ज्याप्रमाणे दुधामध्ये लोणी व अग्नीमध्ये लाकूड असूनही प्रत्यक्ष दिसत नाही त्याप्रमाणे ह्या स्थूल हृदयामध्ये परमेश्वर राहूनही केवळ साक्षीरूपात असतो. असे असले तरी साधना ह्या शरीराद्वारेच संपन्न होते - **'तन बिनु वेद भजन नहिं बरना।'** (मानस ७/९५/५) असे हे शरीर आहे.

दुसरे शरीर आहे सूक्ष्म शरीर. एक जरी संस्कार शिल्लक असला तरी तोपर्यंत सूक्ष्म शरीर विद्यमान असते - **'जिति पवन मन गो विरस करि मुनि ध्यान कबहुँक पावहीं।'** (मानस ४/९ छंद - २) पवन म्हणजे श्वास-उच्छवासाच्या गतीचा संयम करणे. श्वासामध्ये शुभ संकल्प निर्माण होतात तेव्हा वातावरण शुद्ध असते व वाईट संकल्प निर्माण होतात तेव्हा वातावरण अशुद्ध असते. शुभ व अशुभ अशा श्वासाच्या दोनच धारा वाहतात. ह्या श्वासाच्या गतिला थांबवून म्हणजेच मनात चांगले-वाईट संकल्प न उठू देता व ना बाहेरील संकल्पांना आत प्रवेश करू देता, प्राणांवर विजय मिळवून व इंद्रियांना निर्मळ करून सतत अभ्यासाच्या फलस्वरूप मुनिजन परमेश्वराला ध्यानामध्ये प्राप्त करतात. मनाचा निरोध करून, शरीराला निर्मळ करून केवळ एका शरीराच्या पलिकडे जातात.

मन व बुद्धीच्या निरोधाबरोबर सूक्ष्म शरीर समूळ शांत होते. चेतन आत्मा आपल्या अस्तित्वाची जाणीव देऊ लागतो. 'कारण' शरीरही ह्यानंतर शांत होते. त्यानंतर जे शेष राहते तो म्हणजे परमात्मा.

वैदिक वाङ्मयामध्ये व उपनिषदांमध्ये 'अङ्गुष्ठमात्र पुरुष' असे वर्णन आहे. ज्याचा प्रचलित अर्थ असा आहे की अंगठ्याच्या आकाराचा व त्या प्रमाणात परमेश्वर सर्वांच्या हृदयात निवास करतो. म्हणजे हत्तीच्या हृदयात

त्याच्या अंगठ्या एवढा, मुंगीच्या हृदयात तिच्या अंगठ्या एवढा असतो परंतु सापामध्ये केवढा असतो? त्याला तर अंगठाच नसतो मग असंख्य जिवाणूंमध्ये परमेश्वर नसतो का? तो तर सर्वत्र आहे. अणू-परमाणूंपेक्षाही लहानांमध्ये व मोठ्यात-मोठ्यांमध्येही असतो. वस्तूत: इंद्रिये, मन, बुद्धि, चित्त व अहंकार हे जेव्हा संकुचित होतात, योगाची अंगे-उपअंगे, यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारण, ध्यान व समाधि साध्य होतात, वृत्ति शांत होते, श्वास आत आला की 'ॐ' व बाहेर पडला की 'ॐ', अन्य संकल्पांचे स्फुरण न होता संयम साध्य होतो, तेथेच परमेश्वर असतो. हेच अङ्गुष्ठ प्रमाण होय. अङ्गुष्ठमात्रचा आशय आहे योगाची अंग-उपांगे साध्य होणे, पूर्ण होणे.

वास्तविक तीन शरीरांचे वर नमूद केलेले विश्लेषण हा महापुरुषांचा सूक्ष्म शोध आहे. ज्यांनी परमेश्वराला प्राप्त केले आहे त्यांनी असे खोलवर जाऊन त्याला शोधले आहे. इंद्रियांच्या संयमानेच स्थूल शरीर सिद्ध होते व साधक सूक्ष्म शरीरात प्रवेश करतो. पाच कर्मेंद्रिये, पाच ज्ञानेंद्रिये, मन, बुद्धि, चित्त, अहंकार, तेज व विचारशक्ति ह्या सोळा तत्त्वांनी बनलेले सूक्ष्म शरीर म्हणजे मनाचा विस्तार (माया) होय. मनाच्या निरोधाबरोबरच सूक्ष्म शरीरही सिद्ध होते. माया मनामध्ये बिंबीत असते. ज्या माध्यमाद्वारे माया कार्य करते ते असते मन! जेव्हा मायेचे राहण्याचे ठिकाणच नाहिसे होते, तेव्हा 'मन मिटा माया मिटी, हंसा बेपरवाह।' मनाच्या निरोधाबरोबरच सूक्ष्म शरीरही सिद्ध होते. ह्या अवस्थेनंतर कारण शरीर जे सर्वास कारणीभूत आहे ते साधकाच्या समक्ष येते.


भगवान श्रीकृष्ण म्हणतात - जड प्रकृति आठ प्रकारांची आहे व जीवात्मा ही माझी चेतनारूपी प्रकृति आहे जी सर्वांना धारण करून असते. ती म्हणजेच कारण शरीर होय. सूक्ष्म शरीर सिद्ध होताच म्हणजे मनाच्या निरोधाबरोबर ही कारण शक्ति, जी परमात्म्याची अशी शक्ति आहे की सर्वांना धारण करून असते ती परमात्म्याचा चांगल्याप्रकारे बोध करविते. प्रकृतीशी संबंध तुटतो व आत्मिक विभूतींशी परिचय होतो - जसे परमेश्वर कसा कणा-कणामध्ये व्यापलेला आहे, कसा ज्योतिर्मय आहे, कसा काळाच्या पलिकडे

गेलेला आहे? जोपर्यंत हे कार्य चालू असते तोपर्यंत कारण शरीर वेगळे असते व पूर्ण ज्ञान प्राप्त होताच कारण शरीरही शांत होते. आता जे शेष राहते, ते म्हणजे केवळ परमात्मा होय.


ही गोष्ट साधना केल्याने शक्य होते. आपण साधनेस प्रवृत्त झालात, तर एक-एक पायरी आपोआप पार होईल. आपणाला आणखी काही करावयाचे नाही. जोपर्यंत साधना (नामस्मरण) जागृत होत नाही, तोपर्यंत आपण केवळ आशावादी उमेदवार असता परंतु कोणा तत्त्वदर्शी सद्‌गुरूंच्या सान्निध्यात गीतोक्त साधना अवगत झाली व थोडा वरचा स्तर प्राप्त झाला की तो चेतनारूपी परमात्मा आपल्या मनात, अंत:करणात जागृत होऊन आपल्याला मार्गदर्शन करू लागतो. ह्या स्तरानंतर त्याच्या आदेशाप्रमाणे वागणे हीच साधना होय, हीच योग-साधना होय. अशाप्रकारे आदेशाप्रमाणे चालत असता परमतत्त्वाचा स्पर्श होऊन तो आदेश देणाराही शांत होतो व सहज स्वरूप शिल्लक राहते. बुद्धीच्या अंतराळात ही जी अगाधता आहे त्याचे नाव हृदय, परंतु त्याची जागृति कोणा तत्त्वदर्शी महापुरुषाद्वारेच संभव असते त्याचा संपूर्ण विधि गीतेत सांगितलेला आहे. 'गीता' संस्कृत भाषेमध्ये आहे जी सामान्य लोकांची भाषा आता राहिली नाही. म्हणून 'गीता' चांगल्याप्रकारे समजण्यासाठी 'यथार्थ गीता' हे त्याचे भाष्य अवश्य वाचावे. तेच मानवाचे आदि धर्मशास्त्र आहे. वेद इत्यादि समस्त शास्त्रांमध्ये त्याचेच विस्तारित वर्णन आहे. विविध भाषांमध्ये सृष्टीतील समस्त महापुरूषांनी हेच सांगितले आहे. 'ईश्वर एकच आहे' असे जे कोणी सांगतात ते गीतेचाच संदेश प्रसारित करतात.

॥ॐ॥


# आमची प्रकाशने





**यथार्थ गीता–**
'यथार्थ गीते' मध्ये श्रीकृष्णांच्या वाणीचा आशय चांगल्या प्रकारे, जसाच्या तसा समजाविला आहे. ही एक कालजयी कृति आहे
**२८ भाषांमध्ये**





**अंग क्यों फडकते हैं और क्या कहते हैं?–**
मानवी शरीराच्या विभिन्न भागांमध्ये होणाऱ्या स्पंदनांचे कारण आणि त्याद्वारे मिळणाऱ्या संकेतांचे विश्लेषण केले गेले आहे की जे साधना करताना सहाय्यक ठरते.
**४ भाषांमध्ये**




**जीवनादर्श एवं आत्मनुभूति–**
पूज्य गुरु परमहंस स्वामी श्री परमानंदजी महारांजांचे जीवन चरित्र, त्यांचे अनुभव तसेच त्यांच्या उपदेशांचे संकलन केले आहे. साधकांसाठी हा अतिशय उपयुक्त ग्रंथ आहे.
**४ भाषांमध्ये.**



**अनाकलनीय प्रश्न**
वर्ण, मूर्तिपूजा, ध्यान, हठ, चक्र-भेदन आणि योग अशा विषयांचे स्पष्टीकरण करुन, भ्रमात असले-ल्या समाजाला मार्गदर्शन केले आहे.
**३ भाषांमध्ये**




**शंका समाधान–**
समाजामध्ये प्रचलित असलेल्या सर्व वाईट रिती, रुढि, आवडंबर आणि अंधविश्वास ह्याबद्दल असलेल्या शंकांचे निरसन केले आहे
**५ भाषांमध्ये.**



**एकलव्याचा अंगठा–**
शिक्षण देणारा गुरु आणि सद्‌गुरु मधील फरक सांगितला आहे. शिक्षक हा लोकजीवनाची कला शिकवितो तर सद्‌गुरु जीवनामध्ये समृद्धि बरोबरच परम श्रेयाची जागृति आणि त्या परमपदाची प्राप्ति करवितो ज्यामुळे मनुष्याचा जन्म-मरणाच्या चक्रातून मुक्ति मिळते.
**३ भाषांमध्ये.**




**भजन कोणाचे करावे?**
धर्माच्या नावावर गाय, पिंपळ, देवी-देवता, भूत-भवानी ह्यांची पूजा लोक करीत आहेत. प्रस्तुत पुस्तकात ह्या सर्व भ्रातिंचे निवारण करुन स्पष्ट केले आहे की सनातन धर्म कोणता? इष्ट म्हणजे कोण? साधना कोणाची करावी व कशी करावी?
**६ भाषांमध्ये.**




**षोडशोपचार पूजा पद्धति–**
ह्या पुस्तकामध्ये हे सांगितले गेले आहे की एका परमात्म्यावर श्रद्धा स्थिर ठेऊन, त्या एका परमात्म्याचे चिंतन करायला शिकविणे म्हणजेच कर्मकांड होय.
**३ भाषांमध्ये.**


# आमची प्रकाशने



**योगशास्त्रीय प्राणायाम–**

योगशास्त्रीय प्राणायाम मध्ये आपण सांगितले आहेत की यम, नियम आणि आसन साध्य होताच श्वास–प्रश्वासाचे शांत प्रवाहित होणे म्हणजेच प्राणायाम होय. प्राणायाम नावाची वेगळी अशी कोणती क्रिया नाही. ही योग–चिंतनाची एक अवस्था आहे. त्याचेच निरसन ह्या पुस्तकात केले गेले आहे.


**३ भाषांमध्ये.**




**बारहमासी –**

आपले पूज्य गुरु श्रीपरमानंदजी महाराजांना आकाशवाणीने प्राप्त झालेले भजन (ईश्वरीय गायन) बारहमासीचे संकलन तसेच त्याचे विवेचन केले आहे. ह्यामध्ये लक्ष्यापर्यंत पोहोचण्याचा प्रवेशापासून ते पराकाष्ठेपर्यंतचा मार्ग दाखविला आहे.


**हिंदी भाषेमध्ये.**




**योगदर्शन– प्रत्यक्षानुभूत**

व्याख्या– महर्षि पतंजलि कृत ह्या पुस्तकात सांगितले गेले आहे की 'योग' प्रत्यक्ष दर्शन आहे, तो लिहिता किंवा सांगता येत नाही. क्रियात्मक होऊनच साधकाच्या लक्षात येते की जे काही महर्षिंनी लिहीले आहे त्याचा वास्तविक अर्थ काय आहे? साधनेस उपयोगी असे पुस्तक आहे.


**३ भाषांमध्ये.**




**ग्लोरिज ऑफ योग–**

**हठ, चक्र, भेदन आणि योग, प्राणायाम, ध्यान ह्या बद्दल पूर्ण माहिती.**


**इंग्रजी भाषेमध्ये.**



**प्रश्न समाज के उत्तर गीता से–**

ह्या पुस्तकामध्ये सामाजिक, आध्यात्मिक तसेच धार्मिक असे कोणतेही प्रश्न असतील, त्यांचे गीतेच्या दृष्टि कोनातून निरसन केले आहे.

**हिंदी भाषेमध्ये.**



**अहिंसे चे स्वरुप–**

अहिंसा एक गुंतागुंतीचा प्रश्न आहे. मूळतः हा यौगिक, आंतरिक साधनेचा शब्द आहे. ह्या पुस्तकात आपल्याला दिसेल की आपल्या पूर्वीच्या महापुरुषांनी अहिंसेला कोणत्या संदर्भात घेतले.

**४ भाषांमध्ये.**

MP3 ऑडियो सिडिज



**६ भाषांमध्ये**

श्री स्वामीजींच्या मुखातून निःसृत अमृतवाणीचे संकलन व्हात्युम १ ते ६० पर्यंत




**हिंदी भाषेमध्ये.**

# ‘श्रीमद्भगवद्गीता’ ची साधना

**उपद्रष्टानुमन्ता च भर्ता भोक्ता महेश्वरः ।**
**परमात्मेति चाप्युक्तो देहेऽस्मिन्पुरुषः परः ।।** (१३/२२)

हा पुरुष ‘**उपद्रष्टा**’ असतो, हृदयाच्या अत्यंत समीप असतो. हात-पाय मन जितके जवळ असतात त्यापेक्षाही अधिक समीप हा पुरुष द्रष्ट्याच्या स्वरूपात प्रकृतीमध्ये स्थित असतो. त्याच्या प्रकाशात-त्याच्या समोर चांगले करा अगर वाईट करा. त्यांच्याशी त्याला काही प्रयोजन नसते. तो फक्त त्या गुणांचा साक्षी म्हणून उभा असतो. तो केवळ साक्षी असतो. परंतु जर साधकाने योग्य क्रमाने साधना करून स्व:चा विकास करून घेतला व त्याच्याकडे वळला; तर मात्र द्रष्ट्या पुरुषाचाही क्रम बदलतो व तो ‘**अनुमन्ता**’ अनुमती द्यायला लागतो, अनुभव द्यायला लागतो. साधनेद्वारे आणखी समीप गेल्यावर तोच पुरुष ‘**भर्ता**’ बनून भरण-पोषण करू लागतो, त्यामध्ये आपल्या उदरनिर्वाहाचीही व्यवस्था करून देतो. साधना आणखी सूक्ष्म झाल्यावर तोच ‘**भोक्ता**’ बनतो. ‘**भोक्तारं यज्ञ तपसां**’ यज्ञ, तप जे काही बनते त्या सर्वांचे हा पुरुष ग्रहण करतो आणि जेव्हा तो ग्रहण करतो त्यानंतरची अवस्था ‘**महेश्वरः**’ महान ईश्वराच्या रूपात तो परिणत होतो. तो प्रकृतीचा स्वामी बनतो. परंतु अजून काही प्रमाणात प्रकृती जीवित आहे म्हणून तर तिला स्वामी आहे. साधक यापेक्षाही उन्नत अवस्थेमध्ये जातो तेव्हा त्याला ‘**परमात्मेतिचाप्युक्तो**’ परमात्म असे म्हणतात. जेव्हा साधक परमशी तद्रूप होतो तेव्हा त्याला परमात्मा असे म्हणतात. या प्रकारे शरीरात राहत असूनही हा पुरुष अर्थात आत्मा ‘परः’ आहे. या प्रकृतीच्या सर्वथा पलीकडे आहे. फरक इतकाच आहे की, सुरुवातीला तो द्रष्ट्याच्या स्वरूपात होता. क्रमशः विकास होत होत परमला स्पर्श करून परमात्म्याच्या रूपात तो परिणत होतो.

– ‘श्रीमद् भगवद्गीता’ भाष्य ‘यथार्थ गीता’ च्या सौजन्याने


## श्री परमहंस स्वामी अड़गड़ानन्दजी आश्रम ट्रस्ट

न्यू अपोलो ईस्टेट, गाळा नं. 5, मोगरा लेन,(रेलवे सब-वे च्या जवळ),

अंधेरी पूर्व, मुम्बई - 400069 भारत. • फोन : (091-22) 2825 5300

ईमेल : contact@yatharthgeeta.com • वेबसाइट : www.yatharthgeeta.com